

जनमाध्यम

आज वसुबारस

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार ५ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

अमेरिकन शेअर बाजारात जोरदार तेजीचे संकेत, चिन मार्केटमध्येही तेजीचा ट्रेंड

डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचा पराभव



वॉशिंग्टन /वृत्तसंस्था- अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचा पराभव झाला आहे. डेमोक्रेटसनं ट्रम्प यांच्या पक्षाला धोबीपछाड दिला आहे. ट्रम्प यांच्या गेल्या दोन वर्षांच्या कारभाराविरोधात अमेरिकन जनतेनं कौल दिल्याचं पाहायला मिळतंय. ट्रम्प यांच्या पक्षाचा पराभव होताच अमेरिकन शेअर बाजारात तुफान तेजी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासंदर्भात संकेत मिळत आहेत. आशियाई बाजारात देखील तेजी पाहायला मिळाली. भारतीय शेअर बाजारात तेजी दिसून आली, मात्र, त्याची कारणं वेगळी आहेत.

अमेरिकेतील मिडटर्म निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला मोठा धक्का बसला आहे. डेमोक्रेटिक पार्टीनं अमेरिकेतील संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमत मिळवलं आहे. सिनेट आणि प्रतिनिधी सभेत बहुमत डेमोक्रेटसला बहुमत मिळाल्यानं ट्रम्प यांचं टेन्शन वाढणार आहे. प्रतिनिधी सभेत डेमोक्रेटसला २२४ तर सिनेटमध्ये ५४ जागा मिळाल्या आहेत. तर, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे रिपब्लिकन पक्षाचे नेते आहेत. मध्यावधी निवडणुकीच्या निकालानंतर अमेरिकन शेअर बाजारात तेजीचे संकेत पाहायला मिळत आहेत. डाऊ फ्यूचरमध्ये जोरदार तेजी दिसत आहे. ७७० अंकांच्या तेजीसह ५२५५७ अंकांवर डाऊ फ्यूचर पोहोचला आहे. निकालापूर्वी डाऊ फ्यूचरमध्ये घसरण झाली होती.

चीनच्या मार्केटमध्ये तेजी

अमेरिकेमधील मध्यावधी निवडणुकांच्या निकालानंतर चीनच्या मार्केटमध्ये देखील तेजी पाहायला मिळत आहे. हेंग सेंगमध्ये १.६७ टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली. कोस्पीमध्ये ०.६२ टक्के तेजी दिसून आली. तर, ब्रिटनच्या मार्केटमध्ये देखील ०.३० टक्के तेजी पाहायला मिळतेय. भारतीय शेअर बाजारात सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये तेजी पाहायला मिळाली. भारतातील शेअर बाजारातील तेजीचं कारण कच्चा तेलाच्या दरात एक टक्क्यांची झालेली घसरण, लॉंग टर्म कॅपिटल गेन्स करातील कपातीचा दबाव यामुळं यामुळे शेअर बाजारात तेजीचं चित्र पाहायला मिळालं. निफ्टीमध्ये १०० अंकांची तेजी दिसून आली. सेन्सेक्स ३५० अंकांनी वधारल्याचं पाहायला मिळालं. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर मार्केटमध्ये बदलाचा ट्रेंड पाहायला मिळाला आहे. १९८२ नंतर ११ निवडणुकांच्या डेटावरुन असं दिसून येतं की आठ वेळा US बेंचमार्क एस अँड पी ५०० नं पुढील तीन महिन्यांमध्ये सरासरी १० टक्के परतावा दिला आहे.



जनतेत फूट पाडणारे राजकारण मतदारांनी नाकारले

वॉशिंग्टन /वृत्तसंस्था- अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पक्षाला बसलेल्या धक्क्यानंतर, माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी याला अमेरिकन जनतेचा एक स्पष्ट संदेश म्हटले आहे. ओबामा म्हणाले की, मतदारांना असे राजकारण हवे आहे जे लोकांमध्ये फूट पाडण्याऐवजी त्यांना एकत्र आणेल. जनतेला असे नेते हवे आहेत जे त्यांच्या दैनंदिन समस्यांवर ठोस उपाययोजनी करू शकतील. अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांचे निकाल रात्री जाहीर झाल्यानंतर एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ओबामा म्हणाले की हे निकाल राजकारणातील बदलासाठी अमेरिकन जनतेची इच्छा स्पष्टपणे दर्शवतात. अमेरिकन मतदारांनी विभाजनकारी राजकारण नाकारले आहे. त्यांनी याचे वर्णन एकत्रितपणे काम करणा-या शासनप्रणालीची, ठोस उपायांची आणि लोकांना प्राधान्य देणा-या नेतृत्वाची मागणी असे केले.

ओबामा यांनी विविध मतदारसंघांमधून निवडणूक लढवणा-या उमेदवारांची प्रशंसा केली. ते म्हणाले की, देशाच्या प्रत्येक प्रदेशात, ➪(पान २ वर)

सोनम वांगचुक यांच्या शाळेतील वर्ग थांबवण्याचे निर्देश



लेह/वृत्तसंस्था : लडाख प्रशासनाने सामाजिक कार्यकर्ते आणि संस्थेचे संस्थापक संचालक सोनम वांगचुक यांच्या हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह्ज (एचआयएएल) संस्थेला मोठा धक्का दिला आहे. लेह येथील डेझर्ट फ्लॉवर स्कूलचे सर्व उपक्रम तातडीने स्थगित करण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचा अंतिम निकाल येईपर्यंत या शाळेत कोणतेही उपक्रम चालवू नयेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.हे संपूर्ण प्रकरण जमिनीच्या वाटपावरून निर्माण झालेल्या कायदेशीर वादाशी संबंधित आहे. २०१८ मध्ये फ्यांग थांग परिसरातील सुमारे १,०७६ कनाल जमीन संस्थेला ४० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. मात्र, ऑगस्ट २०२५ मध्ये प्रशासनाने हे जमीनवाटप रद्द केले. जमीन रद्द करण्याच्या प्रशासकीय निर्णयाविरोधात न्यायालयात याचिका दाखल असून, सध्या हे प्रकरण उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.लेहच्या तहसीलदारांनी १ नोव्हेंबर रोजी एचआयएएलच्या सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गीतांजली जे. डॉ. गीतांजली जे. आंगमो यांना या संदर्भात अधिकृत नोटीस पाठवली आहे. डॉ. गीतांजली जे. आंगमो ➪(पान २ वर)

पवार पुन्हा ब्रीच कँडीमध्ये



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात तपासण्यांसाठी दाखल करण्यात आलं आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी यासंदर्भातील माहिती दिली आहे. शरद पवार यांना सकाळीच पुण्यातील रुबी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. आता मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात पुढील तपासण्यांसाठी शरद पवार यांना दाखल केलं असल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून दिली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी आम्ही बाबांना पुढील तपासण्यांसाठी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करत आहोत, असं स्टेटसच्या माध्यमातून कळवलं आहे. शरद पवार यांना आज सकाळीच पुण्यातील रुबी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. आता पुन्हा पुढील तपासण्यांसाठी ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांना अखेर आज रुबी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर पवारांना रुग्णालयातून सोडण्यात आलं. वातावरण बदलल्यामुळे शरद पवार यांना छातीत कफ झाला होता,यानंतर डॉक्टरांनी शरद पवार यांना आराम करण्याचा सल्ला दिला होता. शरद पवार हे दुष्काळ पाहणीसाठी दौऱ्यावरती होते, त्यादरम्यान त्यांना हवामान बदलामुळे कफ आणि अशक्तपणा जाणवू लागला होता. त्यामुळे त्यांचा दुष्काळ पाहणी दौरा रद्द करण्यात आला, त्यानंतर त्यांना रूबी हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी दाखल करण्यात आलं होतं. रुबी हॉस्पिटलमधून डिस्चार्ज घेतल्यानंतर शरद पवार यांना व्हील चेअरवरुन बाहेर आणण्यात आलं. यावेळी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांना हात उचांवून पवार यांनी इशारा केला. त्यानंतर सुप्रिया सुळे यांच्यासोबत ते मुंबईच्या दिशेनं रवाना झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोनवरुन शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केल्याची माहिती पवारांचे निकटवर्तीय विठ्ठल मणियार यांनी दिली.

२५% अग्निवीर नियमित सैनिक बनणार



नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिवाळीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने अग्निवीरांसाठी सेवा मुदतवाढ योजना जाहीर करून एक मोठी भेट दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, २५% अग्निवीर सर्व अग्निवीरांसाठी भारतीय संरक्षण दलात सामील होण्याचा मार्ग मोकळा केला आहे असेही चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी सांगितले.अग्निवीरांना दोन वर्षांची मुदतवाढ दिली जाईल. त्यांना त्यांच्या कामगिरीच्या मूल्यमापनाच्या आधारे भविष्यात कायमस्वरूपी पदे मिळण्याची संधी मिळू शकते. तसेच त्यांना वाढीव वेतन आणि भत्ते मिळतील. त्यांच्या कामगिरीचे सातत्याने मूल्यमापन केले जाईल. याचा वेळोवेळी आढावा घेतला जाईल. आता अग्निवीरांची पहिली तुकडी आपला चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्याच्या टप्प्यावर आहे. या चार वर्षांत केलेल्या कामगिरीच्या मूल्यमापनावरून, ➪(पान २ वर)

जनरल एन. एस. राजा सुब्रमणी म्हणाले, १४ जून २०२२ रोजी अग्निपथ योजना सुरू करण्यात आली होती. आजचा दिवस भारतीय संरक्षण दल आणि आपल्या अग्निवीरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मंत्रिमंडळाने नियमित सैनिक म्हणून नियुक्त केले जातील, तर उर्वरित ७५% अग्निवीरांना दोन वर्षांची सेवा मुदतवाढ दिली जाईल. यामुळे या अग्निवीरांचा सेवा कालावधी चार वर्षांवरून सहा वर्षांपर्यंत वाढणार आहे अशी माहिती चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी आज दिली.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सीडीएस

दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांना मदत

२ दिवसांत अग्रीम निधीचे ५००० उर्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यात येणार



मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्र सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली आहे. दिवाळीपूर्वी ५००० रुपये दुष्काळ मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ७३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले असून, उर्वरित रक्कम आज आणि उद्या जमा होईल. राज्यावर दुष्काळाचं सावटं आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने केंद्राच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांना अग्रिम रक्कम म्हणून ५ हजार रुपये देण्याची घोषणा केली होती. दिवाळीपूर्वीच ही रक्कम देणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं होतं. तर आज बैठकीनंतर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य शासनाच्यावतीने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत म्हणून पाच हजार रुपये हे देण्याचं आपण घोषित केलं होतं त्यानुसार आतापर्यंत ७३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे पोहोचलेले आहेत आणि पुढच्या दोन दिवसात जवळपास ९५३ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे पोहोचतील. पाच टक्के थोडे मागे पुढे होतात, कारण खात्यांमध्ये काही अडचणी असतात. पण आतापर्यंत जसं मी सांगितलं की ७३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात गेलेत आणि पुढच्या दोन दिवसात बहुतांश शेतकऱ्यांच्या खात्यात हे पैसे जातील त्याचप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जी आहे, या योजनेच्या अंतर्गत आज पुन्हा ४ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये ४७६४ ➪(पान २ वर)

फडणवीसांनी दिली माहिती

काँग्रेस खासदार बर्वेंनी खा.प्रतिभा धानोरकरांच्या गालावर मारली चापट



मुंबई/प्रतिनिधी- काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांकडून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सोनिया गांधी, के.सी वेणुगोपाल यांना ईमेल करून एक तक्रार केल्याचं वृत्त समोर आले. या तक्रारीनुसार पक्षाने १ नोव्हेंबरला व्होट बचाओ, देश बचाओ रॅलीचं दिल्लीत आयोजन केले होते. त्यात काँग्रेस खासदार श्यामकुमार बर्वे यांनी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गालावर चापट मारल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमुळे पक्षाची बदनामी होत असल्याचं पदाधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. मात्र आता या व्हिडिओवरून प्रतिभा धानोरकर आणि श्यामकुमार बर्वे दोघांनीही खुलासा केला आहे. या व्हिडिओबाबत खासदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या की, आम्ही सगळेजण रामलीला मैदानावर जाण्यासाठी बसमध्ये बसलो होतो. माझ्याशेजारी वर्षा गायकवाड होत्या. श्यामकुमार बर्वे नवीन कपडे घालून आले होते. आमच्यासोबत राजस्थानचे काही खासदार होते, त्यांनी बर्वे यांचे लग्न झालंय का असं विचारले. तेव्हा आम्ही ते पंचवीशीचे आहेत, ३१ वय झाल्यावर लग्न होणार आहे असं म्हटलं. तेव्हा श्यामभाऊ तिथे आले आणि म्हणाले, माझा मुलगा आता २२-२३ वर्षाचा झाला आणि तुम्ही माझ्या लग्नाचं बोलताय असं सांगत गालावर हलकीशी चापट मारली. त्यामुळे हा विषय वाढवायची गरज नाही. क्षुल्लक गोष्टीवरून बातम्या लावल्या जातात. भावा बहिणीसारखे आमचे नाते आहे. श्यामभाऊ माझ्या ➪(पान २ वर)

एमपीएससीच्या परीक्षेत पुन्हा कथीत गैरप्रकार



नागपूर/प्रतिनिधी- महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक (गट-क) पदाच्या परीक्षेची गुणांकन पद्धत (मार्किंग पॅटर्न) आधीच उघड झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या चौकशीत उत्पादन शुल्क विभागातील सह आयुक्तांसह काही अधिकारी दोषी आढळल्याची माहिती समोर आली आहे. नवी मुंबई गुन्हे शाखेच्या चौकशीच्या आधारे संबंधितांवर कारवाई करण्यासाठी अहवाल आयोगाकडे पाठवण्यात आल्याचे नागपूर पोलिसांच्या चौकशीत स्पष्ट झाले. ➪(पान२ वर)

नागपूरमध्ये होणार पहिले आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र



मुंबई/प्रतिनिधी- नागपूर येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मौजे दाभा येथील जागेवर उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्राच्या बांधकामास सुधारित प्रशासकीय मान्यता बुधवारी झालेल्या मंत्रिमडळ बैठकीत देण्यात आली. हे देशातील पहिले कृषी सुविधा केंद्र ठरणार आहे. या प्रकल्पाच्या टप्पा एक साठी मूळ २३५ कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेत ३४२.७२ कोटी रुपयांची वाढ करून एकूण ५७७.७२ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. प्रकल्पाच्या टप्पा दोन साठी ३०१.९१ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे.नागपूर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्राच्या माध्यमातून कृषी क्षेत्रातील ज्ञान, संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, कृषी प्रदर्शन आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संवादासाठी एकात्मिक व्यासपीठ विकसित करण्यात येणार आहे. कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान, संशोधनातील प्रगती, ➪(पान २ वर)

देशात ८५० फास्ट-ट्रॅक न्यायालयांची स्थापना होणार



नवी दिल्ली : केंद्र सरकारने बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये लैंगिक शोषण आणि बलात्काराच्या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी ८५० जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, वीज साठवण्यासाठी मंत्रिमंडळाने ९२ गिगावॅट-तास क्षमतेच्या ग्रिड-स्केल ऊर्जा साठवणूक क्षमतेच्या योजनेसाठी १४,५०० कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी दिली आहे. याशिवाय, डेटा संकलन प्रणाली अद्ययावत करण्यासाठी ४,३७१ कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच महत्त्वपूर्ण खनिजांच्या ➪(पान २ वर)

महाराष्ट्र सरकारची वाहन धारकांसाठी अभय योजना



मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्रातील नागरिकांना दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विशेष म्हणजे राज्यभरात दिवाळीचा उत्साह आहे. दिवाळीच्या पूर्वसंध्येला राज्यभरात बाजारपेठांमध्ये गर्दी बघायला मिळत आहे. या सगळ्या गडबडीत अनेक जण नो एन्ट्री असणाऱ्या रस्त्यांमध्ये आपली गाडी घेऊन जातात. फक्त दिवाळीतच नाही तर ऐरव्ही देखील अनेक जण नो एन्ट्रीमधून गाडी चालवतात. तसेच अनेक जण वेगवेगळ्या प्रकारे वाहतुकीचे नियमभंग करतात. त्यामुळे त्यांच्या वाहनांना दंड आकारला जातो. पण हा दंड नेमका कसा भरायचा, तसेच किती दंड भरावा लागेल, याबाबत अनेकांच्या मनात भीती देखील असते. पण अशा नागरिकांना दिलासा देणारी बातमी आहे. राज्य सरकारने अशा नागरिकांसाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य मंत्रिमंडळाची आज मुंबईतील मंत्रालयात अतिशय महत्त्वाची बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह जवळपास सर्वच खात्याचे मंत्री उपस्थित होते. या बैठकीत तब्बल १२ निर्णय घेण्यात आले आहेत. यापैकी एक निर्णय हा अभय योजनेचा आहे. वाहतुकीचा दंड भरण्यासाठी राज्य मंत्रिमंडळात अभय योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत वाहनांवरील दंडासाठी अभय योजना लागू केली आहे. नियमभंग केलेल्या वाहनावरील दंडासाठी महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना-२०२६ अशा योजनेची घोषणा करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून वाहन धारकांना चलनावरील प्रलंबित दंडाच्या रकमेवर एकवेळची बाब म्हणून वीस टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. या योजनेचा फायदा असा की वाहन धारकांना थकबाकी ➪(पान २ वर)



धर्मरक्षणासाठी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत समर्पित राहणार-एकनाथ शिंदे



वाराणसी/वृत्तसंस्था- सत्तेपेक्षा सिद्धांत मोठा, सत्तेपेक्षा सत्य मोठे आणि अधिकारापेक्षा धर्म व कर्तव्य श्रेष्ठ आहे. सनातन धर्म, संत समाज, भारतीय संस्कृती आणि धर्मरक्षणासाठी शरीरातील रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत समर्पित राहीन, असा ठाम निर्धार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. अखिल भारतीय संत समिती विविध धार्मिक संस्थांचे पदाधिकारी, महामंडलेश्वर आणि गंगा महासभेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिंदे यांचा 'सनातन मार्तंड पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यावेळी त्यांना 'धर्मध्वजाधारक' ही उपाधी देखील सन्मानपूर्वक बहाल करण्यात आली. वाराणसी येथील रुद्राक्ष कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ३ ते ५ नोव्हेंबरदरम्यान आयोजित 'संस्कृती संसद २०२६' मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. देशभरातून हजारो संत-महंत, धर्माचार्य, विचारवंत आणि युवक या तीन दिवसीय सांस्कृतिक महाकुंभात सहभागी झाले होते. यावेळी शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारून उपस्थित साधू संतावर पुष्पवृष्टी करून त्यांना वंदन केले. भारतीय संत समिती विविध धार्मिक संस्थांचे पदाधिकाऱ्यांनी केलेला हा सन्मान हा माझा एकट्याचा सन्मान नसून महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा, भावांचा, शेतकऱ्यांचा, वारकरी संप्रदायाचा आणि युवकांचा आहे. संत समाजाने दिलेला सन्मान सनातन धर्माच्या संवर्धनाची जबाबदारी अधिक दृढ करणारा असल्याचे शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

काशी ही भारताची आत्मा असून काशी आणि महाराष्ट्राचे नाते शतकानुशतकांचे आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतून, तर संत नामदेवांनी पंजाबपर्यंत भागवत धर्माची पताका नेऊन राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी काशीचे गागाभट्ट महाराष्ट्रात आले होते. छत्रपती संभाजी महाराजांनी धर्मरक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले; अमानुष अत्याचार सहन करूनही धर्मांतर स्वीकारले नाही, असे सांगत त्यांनी महाराष्ट्राच्या संत आणि शौर्यपरंपरेचा गौरव केला.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या 'गर्व से कहो हम हिंदू हैं' या हिंदुत्ववादी विचारांचा उल्लेख करत शिंदे म्हणाले की, पालघरमध्ये साधूंची हत्या झाल्यानंतर धर्मरक्षणासाठी आम्ही सत्तेचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. सत्ता नव्हे, तर सिद्धांत महत्त्वाचे आहेत. मुख्यमंत्री असतानाही आणि आज उपमुख्यमंत्री असतानाही मी कार्यकर्ता म्हणूनच काम करतो.महाराष्ट्रात गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय, व्यक्तीच्या नावापुढे आईचे नाव लावण्याचा निर्णय आणि लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांचा त्यांनी उल्लेख केला. गोसंवर्धनाला शेतकऱ्यांचे उत्पन्न, जैविक शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडून गोशाळा आत्मनिर्भर करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि धाराशिव ही नामांतरे तसेच प्रतापगड आणि विशाळगडच्या ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी केलेल्या कार्याचाही उल्लेख केला.अयोध्येतील श्रीराम मंदिर, काशी विश्वनाथ धाम, उज्जैनचा महाकाल कॉरिडॉर, चारधाम, सोमनाथ, द्वारका, रामेश्वरमचा विकास, योगाला आंतरराष्ट्रीय मान्यता आणि नमामि गंगे अभियान हे सनातन संस्कृतीच्या पुनरुत्थानाचे प्रतीक असल्याचे सांगत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे अभिनंदन केले. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा भव्य, दिव्य, सुरक्षित आणि स्वच्छ करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.मंदिरांसोबत रुग्णालये, तीर्थक्षेत्रांसोबत आधुनिक शाळा आणि विकासासोबत सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे. राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर आणि राणी लक्ष्मीबाई यांचा इतिहास, योग, संस्कृत, भगवद्गीता आणि नैतिक मूल्यांचे संस्कार नव्या पिढीला देण्याचे आवाहन त्यांनी केले. सनातन धर्म आणि लोकशाही संस्थांविरोधात अविश्वास व अराजकता निर्माण करणाऱ्या शक्तींविरोधात वैचारिक एकजूट आवश्यक असल्याचे सांगत संतांचे आशीर्वाद, युवकांची शक्ती आणि शासनाचा सेवासंकल्प यातून भारताला जागतिक महासत्ता बनविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. 'ना झुकेगा स्वाभिमान, ना बदलेगा विचार' या घोषणेसह त्यांनी 'हर हर महादेव, जय श्रीराम'च्या जयघोषात भाषणाचा समारोप केला.वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे आयोजित 'संस्कृती संसद २०२६' कार्यक्रमात अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत रवींद्र पुरीजी, अखिल भारतीय संत समितीचे अध्यक्ष जगद्गुरू पूज्य अविचल देवाचार्य महाराज, अखिल भारतीय संत समिती व गंगा महासभेचे राष्ट्रीय महामंत्री पूज्य स्वामी जितेंद्रानंद सरस्वती महाराज आणि कोषाध्यक्ष महामंडलेश्वर पूज्य जनार्दन हरिजी महाराज प्रामुख्याने उपस्थित होते.

पान १ व १० वरून

सोनम वांगचुक यांच्या

या सोनम वांगचुक यांच्या पत्नी आहेत. प्रशासनाकडे योग्य त्या परवानग्या किंवा मंजुरी न घेता डेझर्ट फ्लॉवर स्कूलमध्ये वर्ग आणि इतर शैक्षणिक उपक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

काँग्रेस खासदार बर्वेंनी

मोठ्या भावासारखे आहेत. त्यामुळे महिला खासदाराची बातमी करणे आणि न्यूज व्हायरल करणे हे कुणाची सुपारी घेऊन करायला लावले याची शहानिशा केली पाहिजे असं त्यांनी म्हटलं.

जनतेत फूट पाडणारे राजकारण

अगदी डेमोक्रॅटिक उमेदवारांसाठी पूर्वी कठीण मानल्या जाणा-या भागांमध्येही, सशक्त उमेदवार पुढे आल्यामुळे हा निकाल शक्य झाला. ओबामांच्या मते, या उमेदवारांची पार्श्वभूमी वेगवेगळी होती आणि राजकीय विचारही भिन्न होते, परंतु ते समान मूल्ये, लोकसेवेवरील विश्वास आणि आपल्या मतदारसंघातील लोकांना प्राधान्य देण्याच्या वचनबद्धतेने एकत्र आले होते.

माजी राष्ट्रपतींनी निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी मदत करणा-या हजारो निवडणूक अधिकारी आणि स्वयंसेवकांचेही आभार मानले. ते म्हणाले की दोन्ही राजकीय पक्षांच्या अधिका-यांनी आणि स्वयंसेवकांनी निवडणुकीच्या यशात योगदान दिले. ओबामांनी याला लोकशाहीच्या सर्वात आवश्यक कार्यांपैकी एक म्हटले आहे. आपल्या निवेदनात, ओबामांनी पुढे म्हटले की, सध्याच्या प्रशासनाकडे अजून दोन वर्षे शिल्लक आहेत. त्यामुळे, त्यांच्या पक्षाने आणि मित्रपक्षांनी कंबर कसून कामाला लागले पाहिजे. जिथे जिथे बदल घडवण्याची शक्ती त्यांच्याकडे आहे, तिथे त्यांनी बदल घडवले पाहिजेत, पुढील नुकसान टाळले पाहिजे आणि भविष्यासाठी तयारी केली पाहिजे.

२५% अग्निवीर नियमित

त्यांच्या कामाबद्दल आम्हाला अत्यंत सकारात्मक अभिप्राय मिळाले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.गुणवत्तेच्या आधारावर २५% अग्निवीरांना नियमित सैन्यात समाविष्ट केले जाणार आहे. उर्वरित ७५% अग्निवीरांसाठी अशी तरतूद होती की, ते शिस्तबद्ध आणि प्रेरित तरुण म्हणून समाजात परततील; मात्र, केंद्रीय मंत्रिमंडळाने आता यात बदल करण्यास मंजुरी दिली आहे. सुधारित आणि अद्ययावत योजनेनुसार, उर्वरित ७५% अग्निवीरांना दोन वर्षांची अतिरिक्त सेवा मुदत दिली जाईल. हा दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यावर इच्छुकांना एका निश्चित निवड प्रक्रियेद्वारे सशस्त्र दलांमध्ये समाविष्ट करून घेतले जाईल असेही एन. एस. राजा सुब्रमणी यांनी नमूद केले.

दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांना मदत

कोटी रुपये हे आपण जमा केलेले आहेत, आज आपण जमा केले आहेत यापैकी सर्वाधिक शेतकरी मराठवाड्यातले आहेत, आज जवळपास मराठवाड्यातल्या दोन लाख ७६,००० शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये कर्जमाफीचे पैसे हे राज्य सरकारच्या वतीने जमा करण्यात आलेले आहेत, अशी माहिती देखील त्यांनी दिली.

एमपीएससीच्या परीक्षेत पुन्हा

मात्र, पोलिसांचे अहवाल आणि उमेदवारांच्या तक्रारी समोर येऊनही आयोगाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नसल्याने आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.'एमपीएससी'च्या परीक्षेशी संबंधित गोपनीय दस्तऐवज उघड झाल्याचा आरोप करीत रवींद्र दिनकर इंगोले यांच्यासह १५ उमेदवारांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने नागपूर शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे चौकशीसाठी अर्ज पाठवण्यात आला. नागपूर पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासासाठी नवी मुंबई गुन्हे शाखेशी संपर्क साधला असता, संबंधित तक्रारीची चौकशी पूर्ण झाल्याचे त्यांना सांगण्यात आले. उत्पादन शुल्क विभागातील सह आयुक्तांसह काही अधिकारी या चौकशीत दोषी आढळल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी अहवाल आयोगाकडे पाठवण्यात आल्याची माहितीही देण्यात आली. दरम्यान, 'एमपीएससी'ने ९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्धिपत्रक जारी करून या प्रकरणी स्पष्टीकरण दिले होते. मात्र, पोलिसांच्या चौकशीत महत्त्वाची माहिती समोर आल्यानंतरही आयोगाकडून परीक्षेच्या भवितव्याबाबत कोणताही ठोस निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवरील कारवाई, परीक्षेची वैधता आणि उमेदवारांच्या हिताबाबत आयोग नेमकी कोणती भूमिका घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नागपूरमध्ये होणार पहिले

आधुनिक कृषी पद्धती आणि जागतिक स्तरावरील कृषी विषयक घडामोडींचे आदान- प्रदान करण्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण ठरणार आहे. टप्पा एकच्या मूळ प्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान केंद्राच्या प्रभावी संचालनासाठी आवश्यक असलेल्या विविध अनुषंगिक सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये एकात्मिक प्रदर्शन सभागृह, प्रशासकीय कार्यालये, सेवा क्षेत्रे, व्हीआयपी लाउंज, कॅफेटेरिया आणि हॉस्पिटॅलिटी सुविधांचा समावेश आहे. त्याचबरोबर उच्च दर्जाची एचव्हीएसी प्रणाली, एकात्मिक इमारत बांधकाम व्यवस्थापन यंत्रणा, अत्याधुनिक सुरक्षा व निगराणी व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अंतर्गत सजावटीची कामे करण्यात येणार आहेत.प्रकल्पाच्या टप्पा दोन अंतर्गत ३०१.९१ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या टप्प्यात २ हजार ५०० आसन क्षमतेचे भव्य सभागृह, कॉन्फरन्स हॉल, सेमिनार हॉल्स, व्हीआयपी कक्ष आणि इतर पूरक सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. या सुविधा केंद्राच्या संचालनासाठी व्यावसायिक आराखडा तयार करण्याकरिता स्वतंत्र व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्याचे मुख्य सचिवांच्या स्तरावर नियामक समिती स्थापन करण्यास तसेच या केंद्राच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांना कार्यान्वयन यंत्रणा म्हणून काम करण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

देशात ८५० फास्ट-ट्रॅक

प्रक्रियेसाठीही एका योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की ९२ जीडब्ल्यूएच ग्रिड-स्केल ऊर्जा साठवणूक क्षमता योजनेला मंजुरी देण्याचा उद्देश मोठ्या प्रमाणावर वीज साठवणे हा आहे, जेणेकरून गरजेच्या वेळी तिचा वापर करता येईल. यामुळे सौर आणि इतर नवीकरणीय ऊर्जेचा अधिक चांगला उपयोग करता येईल. ते पुढे म्हणाले ऊर्जा साठवणुकीमुळे वीज पारेषण वाहिन्यांच्या क्षमतेचाही अधिक चांगला वापर होईल. उदाहरणार्थ, एखाद्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी १० मेगावॅटची पारेषण क्षमता निर्माण केली असेल, तर रात्री सौर वीज निर्माण होत नसल्यामुळे तिचा पूर्ण वापर करता येत नाही. मात्र, साठवणुकीची सुविधा असल्यास दिवसा साठवलेली वीज नंतर वापरता येऊ शकते.

महत्त्वपूर्ण खनिजांच्या प्रक्रियेला मंजुरी

मंत्रिमंडळाने महत्त्वपूर्ण खनिजांच्या (क्रिटिकल मिनरल्स) प्रक्रियेच्या योजनेला मंजुरी दिली आहे. याचा उद्देश खाणींमधून काढलेल्या किंवा कच्च्या खनिजांवर अशा प्रकारे प्रक्रिया करणे हा आहे की त्यांचा थेट उत्पादन प्रक्रियेत वापर करता येईल. त्यांनी सांगितले की, ही योजना ओळखण्यात आलेल्या सर्व २४ महत्त्वपूर्ण खनिजांवर लागू होईल. यामध्ये खाणींमधून मिळणा-या खनिजांसोबतच पुनर्वापरातून मिळणा-या खनिजांचाही समावेश आहे.

महाराष्ट्र सरकारची वाहन

भरून वाहन दंडमुक्त करता येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अभय योजनेसह १२ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये पशुवैद्यकी विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णयदेखील समाविष्ट आहे. महाराष्ट्र पशू आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे.

सहकारी संस्थांबाबत मोठा निर्णय- राज्यात सध्या कोल्हापूर दूध संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरुन वातावरण तापलं आहे. असं असताना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल ५०० कोटींहून जास्त आहे, अशा सहकारी संस्थांमध्ये संचालक मंडळात शासन नामनिर्देशित पाच सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. अधिकाऱ्याला मताचा अधिकार नसेल पण इतर चौघांना संचालक मंडळात मताचा अधिकार असेल. असं असलं तरी संस्थेच्या पदाधिकारी पदाच्या निवडणुकीत ते पात्र राहणार नाहीत, असा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

अमरावतीत काँग्रेसला शिक्षक

केली जाईल. या समितीला आपला सविस्तर अहवाल तीन आठवड्यांच्या आत महाराष्ट्राचे काँग्रेस प्रभारी डॉ. सिरीवेल्ला प्रसाद यांच्याकडे सादर करायचा आहे. या अहवालाची एक प्रत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनाही देण्यात येणार आहे. त्यामुळे या अहवालातून निवडणुकीतील कामगिरीबाबत पक्षांतर्गत नेमके कोणते निष्कर्ष समोर येतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, निवडणुकीच्या निकालात काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी नागपूर विभागीय पदवीधर मतदारसंघातून पुन्हा विजय मिळवत आपले वर्चस्व कायम राखले. महाराष्ट्रातील प्रतिष्ठेच्या मतदारसंघांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या मतदारसंघातील विजय काँग्रेससाठी महत्त्वाचा ठरला. दुसरीकडे, पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपला मोठा धक्का बसला. भाजपच्या उमेदवार स्मिता योगेश जाधव यांचा महाविकास आघाडीच्या हर्षदा देशमुख यांनी पराभव केला.

अमरावती शिक्षक मतदारसंघात मात्र शिंदे गटाच्या विद्यमान आमदार किरण सरनाईक यांनी पुन्हा विजय मिळवला. काँग्रेस उमेदवार अदिती पोहरे पराभूत झाल्या. या निकालांमुळे महाविकास आघाडीला तीन जागांवर यश मिळाले, तर भाजप, शिंदेसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश असलेल्या महायुतीला दोन जागांवर समाधान मानावे लागले.

या निकालांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने नियुक्त केलेली समिती केवळ निवडणुकीतील आकडेवारीचा आढावा घेणार की पक्षाच्या संघटनात्मक कार्यपद्धतीतही बदल सुचवणार, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

गोदामातून १,०९४ पोती

यांना घटनेची माहिती दिली. चोरी गेलेल्या मालात सोयाबीनची ८८२ आणि तुरीची २१२ पोती आहेत. या मालाचे एकूण वजन सुमारे ५७ टन असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. एवढा माल हलविण्यासाठी दोन ट्रक आणि १५ ते २० मजुरांचा वापर करण्यात आला असावा, अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे या चोरीमागे अनेक दिवसांपासून नियोजन करणारी टोळी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलीस ठाण्याचे निरीक्षक हनमंत उरलागोंडावार पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे डीव्हीआर ताब्यात घेतले आहेत. गोदाम व्यवस्थापक कल्पेश प्रकाश काळे यांच्या तक्रारीवरून तपास सुरू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गोदामाच्या सुरक्षेसाठी तीन शिफ्टमध्ये सुरक्षा रक्षक तैनात असल्याची माहिती आहे. असे असतानाही शेकडो पोती गोदामातून बाहेर काढली जात असताना सुरक्षारक्षकांना त्याची कल्पना कशी आली नाही, हा तपासाचा महत्त्वाचा मुद्दा ठरणार आहे.

दिवाळीसाठी रघुवीरची ब्रह्मस्वर्ण

त्यांनी सांगितले की 'रघुवीर - हिस्सा हर खुशी का' या ध्येय वाक्यासह रघुवीरने प्रत्येक आनंदाच्या क्षणात सहभागी होण्याची आपली परंपरा कायम ठेवली आहे. याच परंपरेतून तयार 'स्वर्ण शंख' मिठाई चव, सौंदर्य आणि शाही सादरीकरणाचा अनोखा संगम आहे. राजस्थानच्या कुशल कारागिरांनी तयार केलेल्या या विशेष मिठाईमध्ये उच्च दर्जाचे मामरा बदाम, पिसोरी पिस्ता, शुद्ध केशर आणि २४ कॅरेट सोन्याचे वर्क वापरण्यात आले आहे. देवी महालक्ष्मीला अर्पण केल्या जाणाऱ्या प्रसादाच्या संकल्पनेतून प्रेरित होऊन या मिठाईचे नाव 'स्वर्ण शंख' ठेवण्यात आले आहे. राजापेठ पोलीस स्टेशनजवळील रघुवीर आणि स्टेट बँकेजवळ दस्तूर नगर रोडवरील शाखेत ही शाही मिठाई २४ हजार रुपये प्रति किलो दराने उपलब्ध आहे.या मिठाईच्या निर्मितीमध्ये वापरण्यात येणारे २४ कॅरेट सोन्याचे वर्क प्रमाणित प्रयोगशाळेत तपासले जाते, तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सर्व नियमांचे पालन करूनच दिवाळी स्पेशल मिठाईमध्ये त्याचा वापर केला जातो. अशा प्रकारे शाही अंदाजा सोबतच गुणवत्ता आणि खाद्य सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाते.

पेढी नदीत बुडून नऊ

कळविण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून ग्रामस्थांच्या मदतीने शोधमोहीम राबविली. रात्री अंधार वाढल्याने शोधकार्यात अडचणी निर्माण झाल्या. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा शोध व बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. पथकाने नदीपात्रात शोध घेतला; मात्र रात्री उशिरापर्यंत बालकाचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे कुटुंबीय आणि ग्रामस्थांची प्रतीक्षा अधिकच अस्वस्थ करणारी ठरली. मंगळवारी सकाळी सहा वाजता पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली. काही वेळातच शिवाचा मृतदेह नदीपात्रात आढळून आला. त्याला तातडीने ग्रामीण रुग्णालय, भातकुली येथे नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे आमझरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातील नागरिकांनीही हळहळ व्यक्त केली. या प्रकरणी भातकुली पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद मर्ग क्रमांक २३/२०२६, कलम १९४ बीएनएसएस अन्वये केली आहे.

पाटबंधारे विभागाचा कारभार

अधिकारी-कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे नाहक हेलपाटे मारावे लागत असून वेळ आणि पैशांचाही अपव्यय सहन करावा लागत आहे.शासकीय कार्यालये ही जनतेच्या सेवेसाठी असतात की अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सोयीनुसार चालवली जातात? गैरहजर कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणारे वरिष्ठ अधिकारी नेमके काय करीत आहेत? या गैरहजेरीबाबत वरिष्ठांना माहिती आहे का? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत.आता वरिष्ठ अधिकारी या प्रकाराची दखल घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करणार का? कार्यालयीन वेळेत अनुपस्थित राहणाऱ्यांवर कारवाई होणार का? की नागरिकांना असाच त्रास सहन करावा लागणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

जनतेच्या करातून वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनी किमान कार्यालयीन वेळेचे भान ठेवावे, एवढीच अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

जिल्ह्यात १२ डिसेंबरला

यांनी केले आहे. या लोकअदालतीमध्ये सहभागी होण्यासाठी पक्षकारांना कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क किंवा फी भरावी लागणार नाही. तडजोड झालेल्या प्रकरणांचा अंतिम निकाल त्याच दिवशी लावला जाईल. कोर्टाच्या फेऱ्यांमधून सुटका होऊन दोन्ही पक्षांचे वाद संपुष्टात येतील. प्रकरण लोकअदालतीमध्ये ठेवण्यासाठी संबंधित न्यायालयात त्वरित अर्ज करावा किंवा जवळच्या जिल्हा अथवा तालुका न्यायालय विधी सेवा समितीकडे संपर्क साधावा, असे प्रसिद्धी पत्रात सांगण्यात आले आहे.

भाजपचे 'लोकशाही वाचवा'

भाजपला ५ थेट सवाल केले आहेत. त्यामध्ये

विदर्भातील शेतकऱ्याचे काय? विदर्भ - नागपूर, अमरावती, यवतमाळ, अकोला, वर्धा येथील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी आज मरणाच्या दारात आहे. कापसाला भाव नाही, सोयाबीनला हमीभाव नाही, अतिवृष्टीने नुकसान, तरीही मदत नाही. शेतकरी आत्महत्या थांबत नाहीत आणि तुम्ही दिल्लीत रॅली काढता?

मराठवाड्याचा दुष्काळ आणि पाणी प्रश्नाचे काय? बीड, लातूर, धाराशिव, जालना, छत्रपती संभाजीनगर येथे आजही पाण्यासाठी वणवण आहे. मराठवाड्याला कायमस्वरूपी पाणी देण्याचा शब्द तुम्हीच दिला होता, त्याचं काय झालं? यासह उत्तर महाराष्ट्र नाशिक, कळवण, सटाणा, मालेगावचा शेतकरी अडचणीत आहे. नाशिक जिल्ह्यातील कांदा, द्राक्ष, टोमॅटो उत्पादक शेतकरी निर्यातबंदी आणि भाव पडल्यामुळे उद्ध्वस्त झाला आहे. त्याच्यावर तुम्ही एक शब्द बोलत नाही. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राबाबत कोकणातील आंबा, काजू उत्पादक, मासेमार बांधव, तसेच पश्चिम महाराष्ट्र - कोल्हापूर, सांगली, सातारा येथील ऊस उत्पादक शेतकरी, दूध उत्पादक आज अडचणीत आहेत. महागाईने कंबरडे मोडले आहे. मुंबई-पुण्यातील तरुण बेरोजगार आहेत, एमआयडीसीत नोकऱ्या नाहीत, पेपरफुटी होत आहेत. मुंबईतील मराठी माणूस घरासाठी झगडतोय, पण तुम्हाला फक्त रॅलीचे राजकारण सुचते.

५७१ गंभीर आजारी

मागणी केली. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालकमंत्री महोदयांनी दुष्काळ कामावर खर्च करण्याचे आदेश असल्याचे सांगितल्यामुळे निधी देण्यास विलंब होत असल्याबाबत सांगितले, परंतु प्रकाश साबळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांच्यासमोर परखड मत मांडले की सदर पात्र रुग्ण हे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर असून त्यांना औषध उपचारासाठी दिवाळीपूर्वी मदत करणे म्हणजे प्रशासनाने संवेदनशीलता दाखविणे आहे, करिता याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व सत्य परिस्थिती जाणून घेऊन योग्य निर्णय घेण्याबाबत सुचविले.

शहरातील कचरा संकलन

दुपारी कर्मचाऱ्यांनी अचानक पुकारलेल्या संपामुळे मनपामध्ये एकच खळबळ उडाली आहे. साफसफाईचा ठेका कोणार्क कंपनीला देण्यात आला आहे. या कंपनीअंतर्गत काम करणाऱ्या कचरा संकलन व वहन करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर या तीन महिन्यांचे वेतन देण्यात यावे या मागणीसाठी आज काम बंद आंदोलन केले. कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या मुद्द्यावरून कोणार्क कंपनीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, आतापर्यंत महानगरपालिकेकडून बिल अदा करण्यात आलेले नाही. बिल न दिल्यामुळे वेतना बाबत समस्या निर्माण होत आहे. मनपा प्रशासनाने बिल न दिल्याने संकट ओढवले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले. बिल निघताच कर्मचाऱ्यांचे वेतन दिले जाईल, असे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे हा विषय आता आणखीनच गंभीर झाल्याचे दिसत आहे. या संदर्भात प्रशासनाकडून काय निर्णय घेतला जातो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विद्यापीठातील संस्कृत विभाग

प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास भारत सरकारच्या संबंधित योजनांमधून अंदाजे ११० ते १२० लाख रुपयांचा निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रस्तावाला प्रशासकीय सहकार्य देऊन प्राधान्याने कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शिवाय संस्कृत विभागामार्फत राबविण्यात येणारे मूल्यवर्धित अभ्यासक्रम (Value Added Courses) विद्यापीठातील सर्व विभागांसह संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरू करावे. यामुळे विद्यार्थ्यांना अतिरिक्त ज्ञान व कौशल्य मिळण्याबरोबरच अभ्यासक्रमांच्या शुल्कातून विभागाला उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल, असे निवेदनातून सूचविण्यात आले.

यावेळी रा. स्व. संघाचे महानगर संघचालक व संस्कृत भारतीचे संयोजक उल्हास बपोरीकर, आमदार तथा राज्यपाल नामित सिनेट सदस्य प्रताप अडसड, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव अविनाश असनारे, विद्यापीठ विकास मंचाचे संयोजक व सिनेट सदस्य राजेंद्रप्रसाद पाण्डे, संस्कृत भारतीच्या उपाध्यक्ष प्रा. डॉ. संयोगिता देशमुख, प्रा. श्रीकांत काळीकर, सुनील तिप्पट, गिरीश शेरेकर, उज्ज्वल बजाज उपस्थित होते.

शेतमजूर युनियनची निदर्शने

अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. दिवाळी कशी साजरी करायची ही चिंता त्यांना सतावत आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतमजुरांना दिलासा मिळावा यासाठी तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दुष्काळी परिस्थिती पाहता प्रत्येक शेतमजुराला ३० हजार रुपये नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावे. भूमिहीन शेतमजुरांना ईक्लास, गायरान, देवस्थान जमिनीचे वाटप करण्यात यावे. जिल्ह्यात मनरेगाची कामे तात्काळ सुरू करण्यात यावीत. मजुरांना दररोज १ हजार रुपये मजुरी मिळावी. हातात लाल बावटा असलेले फलक घेऊन त्यांनी घोषणाबाजी केली. निवेदन देताना दिलीप शापामोहन, पुंडलिक बावनकर, मोहिनी शापामोहन, गेडाम, रेखा यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अप्पर वर्धा धरणाच्या

झाली नाही. म्हणुन जिथे मोटर लावलेली आहे तेथे मोटर पाहण्याकरीता गेले असता त्यांना टेक्स्मो कंपनीच्या मोटरला लावलेला कॉपरचा ४०० फुटचा केबल तेटलेला दिसला.शेजारी असणा-या शेतक-यांना विचारपुस केली तर त्यांचे मोटरचे सुध्दा केबल तुटलेले दिसले.यावेळी गणेश दस्सुलालजी खटोले, मंगेश रमेशचंद्रजी साबु, मोहन रामरावजी ठाकरे, चंद्रशेखर रामभाऊ श्रीराव,अविनाश गंगाबिसन अग्रवाल सर्व रा.मोर्शी हे तेथे येऊन बघितले असता त्यांच्या मोटरला लावलेला कॉपरचा केबल तुटलेला दिसला.

अप्पर वर्धा जलाशयातुन झीरो पॉईटचे बाजुला टेक्समो कंपनीची १२.५० एचपी पॉवरची मोटारचा ४०० फुट कॉपरचा केबल किं. अं.१५००० रु.,गणेश दस्सुलालजी खटोले रा. मोर्शी यांचे मोटरचा ४०० फुटचा कॉपरचा केबल किं.अं.१५००० रु., मंगेश रमेशचंद्रजी साबु रा.मोर्शी यांचे मोटरचा ४०० फुटचा कॉपरचा केबल किं.अं. १५००० रु.,मोहन रामरावजी ठाकरे रा. मोर्शी यांचे मोटरचा ४०० फुटचा कॉपरचा केबल किं.अं.१५००० रु., चंद्रशेखर रामभाऊ श्रीराव रा.मोर्शी यांचे मोटरचा ४०० फुटचा कॉपरचा केबल किं.अं.१५००० रु., अविनाश गंगाबिसन अग्रवाल रा.मोर्शी यांचे मोटरचा ४०० फुटचा कॉपरचा केबल किं.अं. १५००० रु.,असा एकुण ९०००० रु.चा केबल कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेला. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे.

चार वर्षांच्या मुलासह

सहा वर्षांचा मुलगा आहे.१ नोव्हेंबर रोजी सदर महिला आपल्या २० वर्षीय परिचित महिलेसोबत अंजनगाव सुर्जी तालुक्याचे सासेगांव येथे आली होती. या दरम्यान दुपारी सुमारे २ वाजता ती आपल्या चार वर्षीय मुलाला घेऊन अचानक कुठेतरी निघून गेली. फोनद्वारे कुटुंबियांना याबाबत माहिती मिळाली.महिला आणि मुलगा बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच कुटुंबियांनी नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडे त्यांचा शोध घेतला, मात्र दोघांचाही कोणताही पत्ता लागला नाही. अखेर कुटुंबियांनी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

तक्रारीच्या आधारावर अंजनगाव सुर्जी पोलिसांनी संबंधित कलमान्वये अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस बेपत्ता महिला आणि चार वर्षीय मुलाच्या शोधात गुंतले आहेत. दरम्यान, कुटुंबियांनी दोघांसोबत काही अघटित घडले असावे अशी भीती व्यक्त केली आहे.

PULSES RESEARCH CENTRE,
DR. PANJABRAO DESHMUKH KRISHI VIDYAPEETH, AKOLA
Walk-in Interview

The walk-in interview will be conducted for filling up the post of Young Personal (one), purely on temporary/contractual basis under ICAR-AICRP-KP (Pigeonpea and MULLaRP) Project and Agency /Product testing trials for 2026-27 at Pulses Research Centre., Dr. PDKV., Akola. The eligible candidates should appear with relevant documents (original and attested photocopies) for walk-in interview on dated 16/11/2026 at 10.00 AM onwards. For detail advertisement, visit on http://www.pdkv.ac.in in the recruitment section.

Sd/-
Senior Research Scientist
Pulses Research Centre
Dr. P.D.K.V., Akola

क्र./विमाका/अम/जाही/५८४

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ गुरुवार, ५ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

गावोगावी आरोग्यक्रांती घडविण्यासाठी पंचायत समिती सरसावली!

'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' कृती दल समितीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न
गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्यदायी गावनिर्मितीच्या कृती आराखड्यावर चर्चा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अधिक सुदृढ व्हावे, गावपातळीवर आरोग्यविषयक सुविधांचा विस्तार व्हावा, स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृतीला चालना मिळावी, तसेच प्रत्येक गाव आरोग्याच्या दृष्टीने सक्षम व्हावे, या उद्देशाने शासनाच्या 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पंचायत समिती स्तरावर हालचालींना वेग आला आहे. याच अनुषंगाने बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी गटविकास अधिकारी श्री. रवींद्र सोनोने यांच्या अध्यक्षतेखाली कृती दल समितीची महत्त्वपूर्ण बैठक त्यांच्या दालनात पार पडली.



ग्रामीण भागातील आरोग्यविषयक प्रश्न केवळ आरोग्य विभागापुरते मर्यादित न ठेवता ग्रामपंचायत, पंचायत समिती, आरोग्य यंत्रणा आणि इतर संबंधित विभागांच्या समन्वयातून सोडविण्याची आवश्यकता या उपक्रमातून अधोरेखित होत आहे. गावातील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य तपासणी, माता-बाल आरोग्य, संसर्गजन्य आजारांबाबत जनजागृती आणि प्रतिबंधात्मक आरोग्य उपाययोजना या बाबींना विशेष महत्त्व आहे. या बैठकीला तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. महेशचंद्र चापे, अनसिंग येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. लक्ष्मीकांत राठोड, पीएमयू अकोला विभागाचे श्री. सोनटक्के, उपअभियंता श्री मार्के,समिती सदस्य पत्रकार अजय ढवळे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी विठ्ठल ठाकरे, विनायकराव बोरचाटे, अमर झळके, वैद्यकीय अधिकारी डॉ. कोमल टाफे आणि आरोग्य निरीक्षक नितीन व्यवहारे यांची उपस्थिती होती.

विभागीय समन्वयातून आरोग्यदायी गावांचा संकल्प!

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबापर्यंत आरोग्यविषयक सुविधा आणि जनजागृती पोहोचविण्यासाठी विविध विभागांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे. गावातील आरोग्यविषयक परिस्थिती सुधारण्यासाठी केवळ शासकीय यंत्रणेवर अवलंबून न राहता ग्रामपंचायत पदाधिकारी, आरोग्य कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांचा सहभागही महत्त्वाचा ठरणार आहे.

'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हा उपक्रम केवळ शासकीय अभियान न राहता लोकसहभागातून गावाच्या आरोग्याचा चेहरामोहरा बदलणारी चळवळ व्हावी, अशी अपेक्षा या उपक्रमामागे आहे. गाव स्वच्छ असेल, पिण्याचे पाणी सुरक्षित असेल आणि नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता असेल, तरच खऱ्या अर्थाने आरोग्य संपन्न गावाची संकल्पना साकार होऊ शकते.


आरोग्यदायी गावनिर्मितीसाठी कृती दलाची भूमिका महत्त्वाची!

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कृती दल समितीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. विविध विभागांमध्ये समन्वय साधून गावपातळीवरील आरोग्यविषयक उपक्रमांना गती देणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे आणि आरोग्य संपन्न गावनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य करणे, ही या समितीसमोरील महत्त्वाची जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील आरोग्याचा प्रश्न हा थेट नागरिकांच्या जीवनमानाशी निगडित असल्याने या उपक्रमाच्या माध्यमातून गावोगावी आरोग्यविषयक सकारात्मक परिवर्तन घडविण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

आडोळ प्रकल्पातील अवैध पाणी उपशावर प्रशासनाचा दणका!

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धडक कारवाई; आठ पाण्याच्या मोटारी जप्त, विद्युत खांबांवरील इन्सुलेटरही काढले

■ प्रतिनिधी | रिसोड ■



आडोळ पाणी प्रकल्पातील पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी अखेर प्रशासनाने कठोर पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रकल्पातून बेकायदेशीररीत्या पाणी उपसा करणाऱ्या मोटारी जप्त करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार आज, दि. ४ नोव्हेंबर रोजी आडोळ प्रकल्प परिसरात प्रशासनाच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई करत तब्बल आठ पाण्याच्या मोटारी जप्त केल्या. तसेच विद्युत खांबांवरील इन्सुलेटर काढून वीजपुरवठ्याच्या माध्यमातून होणारा अवैध पाणी उपसा रोखण्याची कार्यवाही करण्यात आली.

रिसोड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश शेवदा, महावितरणचे अभियंता ठाकरे तसेच जलसंपदा विभागाचे उपअभियंता एस. पी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही संयुक्त कारवाई करण्यात आली.

या कारवाई पथकामध्ये नगरपरिषदेचे पाणीपुरवठा अभियंता नंदकिशोर डाखोरे, जलसंपदा विभागाच्या श्रीमती पूजा, श्रीवास गोपाल शिंदे, अमोल शिरसाट, नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे संदीप इंगळे, ईश्वर गायकवाड, गौरव कांबळे, ओम अंभोरे, पोलीस कर्मचारी गोपाल राजबिंडे, महावितरणचे अभियंता ठाकरे व तंत्रज्ञ बाविस्कर यांचा समावेश होता.प्रकल्पातील पाण्याचे नियोजन आणि उपलब्ध जलसाठ्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने ही कारवाई केली आहे. पाण्याचा अवैध उपसा करणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाने घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे संबंधितांमध्ये खळबळ उडाली असून यापुढे अशा प्रकारावर लक्ष ठेवून कारवाई केली जाणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे .

रिसोड नगर परिषदेत १८ महिन्यांपासून वेतन थकीत; उपोषणाचा इशारा!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड नगर परिषद प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेल्या कुशल व अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील तब्बल १८ महिन्यांपासून वेतन थकीत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

अनेक वर्षांपासून नगर परिषदेमध्ये प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या या कर्मचाऱ्यांना दीड वर्षापेक्षा अधिक काळ वेतन मिळाले नसल्याने त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कर्मचाऱ्यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन थकीत वेतन तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे.निवेदनानुसार, नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेले कुशल व अकुशल कर्मचारी अनेक वर्षांपासून आपली जबाबदारी नियमितपणे पार पाडत आहेत. नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक असलेली कामे ते चोखपणे व नियमितपणे करीत आहेत. मात्र, कामे नियमित करूनही मागील १८ महिन्यांपासून त्यांना वेतन अदा करण्यात आलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.वेतनाअभावी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह, घरखर्च, मुलांचे शिक्षण तसेच दैनंदिन गरजा भागविणे अत्यंत कठीण झाले आहे. एकीकडे महागाईचा वाढता बोजा आणि दुसरीकडे तब्बल १८ महिन्यांपासून वेतन रखडल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. नियमित सेवा देऊनही आपल्या हक्काचे वेतन मिळत नसल्याची खंत कर्मचाऱ्यांनी निवेदनातून व्यक्त केली आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी ग्रामपंचायतनिहाय विकास आराखडा तयार करा - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

जलसंधारण कामांसह पांदणरस्त्यांच्या कामांनाही चालना - आमदार रणधीर सावरकर

■ प्रतिनिधी | अकोला ■



शेतकऱ्यांना खते, बि-बियाणे, मशागतीचे यंत्रसामुग्री नेण्यासाठी दळणवळणाची सुविधा व्हावी तसेच शेतमाल बाजारपेठेत योग्यवेळी सुरक्षित पोहोचावा, यासाठी शेतकऱ्यांना पाणंद रस्त्यांची नितांत आवश्यकता भासते. ही गरज पूर्ण करण्यासाठी तसेच कमी पर्जन्यमानामुळे उद्भवलेल्या दुष्काळावर मात करण्यासाठी ग्रामपंचायतनिहाय विकास आराखडा तयार करावेत. या कामांसह गावांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील सात मुख्यमंत्री बळीराजा शेत-पांदण रस्त्यांचे ऑनलाइन उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज झाले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, महापौर शारदा खेडकर, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर, महापालिका आयुक्त सुनील लहाने, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, नाम फाउंडेशनचे कार्यकारी अध्यक्ष गणेश थोरात व जिल्हा समन्वयक राजा शेळके यांच्यासह महसूल व भूमी अभिलेख विभागाचे जिल्हा प्रमुख शेतकरी वर्ग यावेळी उपस्थित होते. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, अल निनोच्या प्रभावामुळे तसेच कमी पर्जन्यमानामुळे राज्यात सर्वत्र दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळाच्या या परिस्थितीत पाणी बचत, चारा टंचाईवर मात करण्यासाठी नदी नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, मुरघास व ठोब्यांच्या वितरणातून चारा लागवड, जुन्या बंधारे पुनर्जीवन आदी कामे हाती घेण्यात आली आहेत. शेतकऱ्यांची रक्तवाहिनी असलेल्या पाणंद रस्ते सुध्दा शेतकऱ्यांसाठी महत्वाचे आहे. पाणंद रस्ते निर्मिती करणे ही राज्य शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रम आहे. शेती मशागतीचे साहित्य तसेच शेतमालाची ने-आण करण्यासाठी पाणंद रस्त्यांची निर्मिती होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील पाणंद रस्ते निर्मितीसाठी रस्त्यांचे सिमांकण करणे, अतिक्रमण हटवून अचूक मोजणी करणे या कामांसह रस्त्यांच्या दुर्तफा झाडे लावणे आदी कामे प्राधान्याने करावीत. यासाठी जिल्हा नियोजन समिती योजना, सीएयआर फंड व अन्य योजनांमधून निधी तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. आमदार सावरकर म्हणाले की, दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणासह मृदा संधारणासाठी शेतकरी, नागरिक व यंत्रणांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

रेशनपासून वंचित नागरिकांना न्याय द्या- जतिन सोनोने

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



मंगरूळपीर तालुक्यातील अनेक नागरिकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मिळणारे स्वस्त धान्य बंद झाल्याची बाब समोर येत असून, त्यामुळे गरीब व गरजू कुटुंबांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. स्वस्त धान्य हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन असताना पात्र लाभार्थ्यांना धान्य मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे कोणत्याही पात्र नागरिकाला तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे त्याच्या हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहावे लागू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर मंगरूळपीर तालुका प्रशासनाने रेशन बंद झालेल्या लाभार्थ्यांची माहिती संकलित करून प्रत्यक्ष पडताळणी करावी, बंद झालेल्या रेशन कार्डाचे कारण स्पष्ट करावे. विशेष म्हणजे, शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून असलेल्या अनेक कुटुंबांना नियमित धान्य मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे कोणत्याही पात्र नागरिकाला तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे त्याच्या हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहावे लागू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर मंगरूळपीर तालुका प्रशासनाने रेशन बंद झालेल्या लाभार्थ्यांची माहिती संकलित करून प्रत्यक्ष पडताळणी करावी, बंद झालेल्या रेशन कार्डाचे कारण स्पष्ट करावे.

महालॅबची प्रयोगशाळा व रक्तनमुना संकलन सेवा बंद; गरीब व गरजू रुग्णांची हेळसांड



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र राज्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच 'आपला दवाखाना' या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये महा लॅबच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रयोगशाळा तपासणी व रक्तनमुना संकलन सेवा बंद झाल्याने गरीब व गरजू रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. संबंधित ष्ठ्य कंपनीची शासनाकडील मागील दोन वर्षांपासूनची देयके प्रलंबित असल्यामुळे या सेवा बंद झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या आरोग्य सेवा बंद असल्याबाबत नागरिकांकडून लोकप्रतिनिधींकडे सातत्याने तक्रारी व विचारणा केली जात असून, सेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्याची मागणी होत आहे. सध्या राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत खासगी रुग्णालये व प्रयोगशाळांमधील वैद्यकीय तपासण्यांचा खर्च परवडत नसल्याने गरीब व गरजू रुग्णांना आवश्यक आरोग्य सुविधा मिळविताना अडचणी येत आहेत. शासकीय आरोग्य संस्थांमधून उपलब्ध होणाऱ्या प्रयोगशाळा तपासणी व रक्तनमुना संकलन सेवा सर्वसामान्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे शासनाने ष्ठ्य कंपनीची प्रलंबित देयके तातडीने अदा करून राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि 'आपला दवाखाना' या शासकीय आरोग्य संस्थांमधील महा लॅबच्या प्रयोगशाळा तपासणी व रक्तनमुना संकलन सेवा त्वरित पूर्ववत सुरू कराव्यात, अशी मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे.

'भिंत ऊबदार माणुसकीची' उपक्रम सुरू

विघ्नहर्ता चॅरिटेबल ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दिवाळी हा आनंदाचा सण प्रत्येकाच्या दारी जावा आणि गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा.

या उदात्त हेतूने मालेगाव येथील विघ्नहर्ता चॅरिटेबल ट्रस्ट (मालेगावचा लाडका महागणपती विघ्नहर्ता) च्या वतीने एक महत्त्वपूर्ण व मानवी मूल्यांची जाणीव करून देणारा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. 'भिंत ऊबदार माणुसकीची' या उपक्रमांतर्गत नागरिकांना कपडे व इतर वस्तू दान करण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

काय आहे ही मोहीम?

या मोहिमेअंतर्गत नागरिकांकडे सध्या वापरात नसलेल्या, परंतु चांगल्या आणि सुस्थितीत असलेल्या वस्तू दान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील वस्तूदान करता येतील: शर्ट आणि पँट, जॅकेट आणि स्वेटर, ब्लँकेट, सलवार-कमीज, साड्या, लहान मुलांचे कपडे असे बरेच काही. 'नको असेल ते द्या... हवे असेल ते घेऊन जा...!' या सुंदर संकल्पनेवर हा उपक्रम आधारित असून, यामुळे गरजू व वंचितांना दिवाळीच्या दिवसात उबदार कपडे व मदत मिळू शकणार आहे.

संपर्क व सहकार्य

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी किंवा वस्तू दानासंदर्भात संपर्क साधण्यासाठी ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

दिवाळीच्या सणासुदीत खासगी ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांची आर्थिक लूट थांबवा

■ प्रतिनिधी | वाशिम ■



दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पुणे, मुंबई, यासह इतर महत्त्वाच्या मार्गांवर धावणाऱ्या खासगी प्रवासी ट्रॅव्हल्सकडून प्रवास भाड्यात मोठ्या प्रमाणात वाढ केली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. सणासुदीच्या काळात गावी येणाऱ्या विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि सर्वसामान्य प्रवाशांना अवाजवी भाडे देऊन प्रवास करावा लागत असल्याने त्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे या गंभीर बाबीची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी वाशिम यांना निवेदन देऊन खासगी प्रवासी ट्रॅव्हल्सच्या भाडेवाढीवर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे. सणासुदीच्या काळात खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून मनमानी पद्धतीने भाडेवाढ आकारले जात असून, यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे पुढे निवेदनात म्हटले आहे की रेल्वे आणि एसटी बसचे तिकीट वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना, नोकरदारांना आणि सर्वसामान्य प्रवाशांना नाईलाजास्तव खासगी बसचा आधार घ्यावा लागतो मात्र अशा ऐनवेळच्या गरजेचा फायदा उठवून खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून चालवली जाणारी ही लूट अत्यंत क्लेशदायक आणि बेकायदेशीर आहे असे हिवराळे यांनी नमूद केले.

परिवहन प्रशासनाने या समस्येची गंभीर दखल घेऊन भाडेवाढ करणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स चालकावर आपल्या विभागामार्फत तातडीने आणि कडक कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी हिवराळे यांनी निवेदनातून केली आहे. याबाबत मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी वाशिम यांनी या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून संबंधीतावर योग्य कारवाई करु असे आश्वासन दिले आहे.

दिवाळी पहाट कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक कार्यात अग्रसेर असलेल्या वाशीम शारदा मारवाडी महिला समितीव्दारा अखिल भारतीय महिला सम्मेलन अंतर्गत संस्काराचे बिजारोपण व्हावे या हेतूने बुधवार ४ नोव्हेंबर रोजी स्थानिक महेश भवन येथे सुर दर्शन म्युझीकल ग्रुप वाशीम कलावंतांच्या उपस्थितीत दिवाळी पहाट कार्यक्रम उत्साहात पार पडला.

स्थानिक महेश भवन येथे आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमाचे उद्घाटन उद्घाटीका न.प. सभापती सौ. श्रध्दा अमोल इंगोले यांच्याहस्ते दिपप्रज्वलन व भगवान महेश यांच्या प्रतिमेच्या पुजनाने करण्यात आले. यावेळी समाजसेवी उद्योजक गिरधारीलाल सारडा, ॲड. विनोद बियाणी, समाजसेवक अमोल इंगोले, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमाणी, शारदा मारवाडी महिल सम्मेलनाच्या अध्यक्षा सौ. पायल छापरवाल, सचिव सौ. दिपाली मंत्री, कोषाध्यक्ष सौ. अंजली अग्रवाल यांची उपस्थिती होती. यावेळी गायक सौ. मंजुताई कांबळे, मो. इबरीस, अमोल पाटील यांनी भक्तीगित, दिवाळी गिते, भावगिते, मराठी व चित्रपट गिते सादर करून उपस्थितांना जिंकले.

गॅरेजमुळे फुटला दुचाकी चोरीचा भांडाफोड

■ प्रतिनिधी | मानोरा ■



शहरातील घरासमोरून चोरीला गेलेल्या मोटारसायकलीचा शोध घेत असताना गॅरेजमधून मिळालेल्या माहितीच्या आधारे मानोरा पोलिसांनी दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. या प्रकरणात दोन आरोपींना ताब्यात घेऊन चोरीची मोटारसायकल व गुन्ह्यात वापरलेले दुसरे वाहन असा एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल ४ नोव्हेंबर जप्त करण्यात आला आहे.

गोकुळ कॉलनी येथील फिर्यादी सागर काळे यांची यामाहा कंपनीची मोटारसायकल ४ ते ५ जून दरम्यान घरासमोरून अज्ञात चोरट्याने लंपास केली होती.

याप्रकरणी मानोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान चोरीची मोटारसायकल शहरातील गणेश ऑटो एजन्सीजवळील गॅरेज परिसरात दिसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी गॅरेज मालकाकडे चौकशी केली असता संबंधित मोटारसायकल विक्रम उर्फ विक्की आडे याने दुरुस्तीसाठी आणल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी विक्रम आडे यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर त्याचा साथीदार गौरव गजानन चव्हाण याचाही शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्यात आले. दोन्ही आरोपींकडून सुमारे ४५ हजार रुपये किमतीची चोरीची मोटारसायकल तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेले ६० हजार रुपये किमतीचे बजाज प्लल्सर मोटारसायकल असा एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक निखिल खाटमोडे (पाटील), अपर पोलिस अधीक्षक मृदुलता फड व उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार नैना पोहेकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत राधेश्याम महल्ले, रोहन तायडे, चेतन भोयर व फिरोज शेख यांनी सहभाग घेतला असून पुढील तपास जमादार गणेश राठोड करीत आहेत.

जनमाध्यम

E-paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा, गुरूवार ५ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.००■ पृष्ठे ४ ■ वर्ष - १४ ■ अंक- ३३८

खरीपने रडविले, आता रब्बीही अडचणीत

पाण्याअभावी शेतकरी हवालदिल, १.०२ लाख हेक्टरचे नियोजन; प्रत्यक्षात केवळ ७ हजार हेक्टरवर पेरणी

वर्धा / जनमाध्यम

यंदा पावसाने पाठ फिरविल्याने खरीप हंगामात आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांपुढे आता रब्बी हंगामाचेही संकट उभे ठाकले आहे. अल्प पर्जन्यमान, पावसातील दीर्घ खंड आणि भूजल पातळीतील घसरण यामुळे रब्बीच्या पेरणीला अपेक्षित गती मिळत नसल्याचे चित्र जिल्ह्यात निर्माण झाले आहे. कृषी विभागाने यंदा एक लाख दोन हजार हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांच्या लागवडीचे नियोजन केले असताना प्रत्यक्षात आतापर्यंत केवळ सात हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे.



खरीप पिकांची काढणी झाल्यानंतर शेतकरी रब्बीच्या पेरणीसाठी शेतजमिनी तयार करतात. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जमिनीत अपेक्षित ओलावा निर्माण झालेला नाही. त्यातच पावसाने मोठा खंड दिल्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला आहे. भूगर्भातील पाणीपातळीही खालावल्याने विहिरी आणि बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

रब्बी पिकांच्या उगवणीसाठी आणि सुरुवातीच्या वाढीसाठी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक असते.

मात्र, सध्याच्या परिस्थितीत पेरणी केल्यानंतर पिकांना पुढील टप्प्यात पाणी कसे उपलब्ध करायचे, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. उपलब्ध पाण्याच्या भरवशावर पेरणी करून पीक वाया जाण्याचा धोका पत्करण्यापेक्षा अनेक शेतकरी परिस्थितीचा अंदाज घेत आहेत. काही शेतकऱ्यांनी मर्यादित पाण्याच्या आधारे थोड्याफार क्षेत्रावर पेरणी केली असली तरी मोठ्या क्षेत्रावरील पेरणी अद्याप रखडली आहे.

जिल्ह्यातील जलाशयांमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याच्या वापरावरही मर्यादा आल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी जलाशयातील पाणी प्राधान्याने पिण्यासाठी उपलब्ध करून देण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे जलाशयांच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांनाही रब्बी पिकांसाठी सिंचनाचे पाणी मिळण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

२७०० किलो प्रतिबंधित 'अफ्रिकन थाई मागूर' मासे नष्ट

आर्वी तालुक्यात मत्स्यव्यवसाय विभागाची धडक कारवाई

वर्धा / जनमाध्यम

आर्वी तालुक्यातील मौजा निंबोली (शेंडे) परिसरात मत्स्यव्यवसाय विभागाने दोन दिवस विशेष मोहिम राबवून प्रतिबंधित 'अफ्रिकन थाई मागूर' माशांच्या अवैध मत्स्यपालनावर मोठी कारवाई केली. या कारवाईत शेततळ्यांमधून सुमारे २ हजार ७०० किलो जिवंत मागूर मासे जप्त करून त्यांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.



मत्स्यव्यवसायचे प्रादेशिक उपआयुक्त सुनील जांभुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मत्स्यव्यवसाय, महसूल व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने ही कार्यवाही केली. ही मोहिम मत्स्यव्यवसायचे सहाय्यक आयुक्त स्वप्नील वालदे, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी राहुल जाधव, आर्वीचे पोलिस उपनिरीक्षक महेश राठोड, हवालदार मंगेश वाघाडे, चेतन बोरकर, नेरीचे तलाठी अमोल खंडारे, महसूल सेवक अमोल शेंडे, निंबोली (शेंडे) येथील उपसरपंच सुरेखा कदम यांच्या समक्ष पार पडली.

अफ्रिकन थाई मागूर हा मासा दूषित पाण्यात वाढणारा व निकृष्ट खाद्य खाणारा मासा आहे. या माशाच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम संभवतात. मांसाहारी व आक्रमक प्रवृत्तीच्या या माशामुळे स्थानिक प्रजातींना व नैसर्गिक परीसंस्थांना मोठा धोका निर्माण होतो. या माशामुळे स्थानिक प्रामाणिक मत्स्यपालकांना योग्य बाजारपेठ आणि न्याय मिळण्यास अडचण निर्माण होते.

पर्यावरण व मानवी आरोग्यास घातक असणाऱ्या थाई मागूरचे पालन किंवा विक्री प्रतिबंधात्मक आहे. त्यामुळे या माशाची पैदास किंवा विक्री करू नये आणि जिल्ह्यात इतर ठिकाणी कोणी थाई मागूरचे पालन किंवा विक्री करत असल्यास योग्य कार्यवाहीसाठी मत्स्यव्यवसाय कार्यालयास कळवावे, असे सहाय्यक आयुक्त स्वप्नील वालदे यांनी कळविले आहे.

संत विचारांचा गावोगावी जागर करणाऱ्या अनिल सालंकारांचा मोझरीत गौरव

राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या सेवाकार्याची दखल

विरूळ आकाजी/ जनमाध्यम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार, त्यांचे समाजप्रबोधन आणि संतविचारांचा वारसा गावोगावी पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्य करणारे राष्ट्रसंत भजन स्पर्धेचे वर्धा जिल्हा प्रमुख अनिल सालंकार यांचा मोझरी येथे गौरव करण्यात आला. राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत ५८ व्या महाराज पुण्यतिथी सोहळ्यात त्यांना शाल, श्रीफळ आणि गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



मोझरी येथे आयोजित या धार्मिक आणि सामाजिक सोहळ्यात सर्वाधिकारी वाघ महाराज, माजी खासदार पुष्पा बोंडे, आमदार कीर्ती भांगडिया, लक्ष्मणदास काळे महाराज, प्रभाकर गायकवाड आणि गोपाल कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सत्कार पार पडला.

राष्ट्रसंतांचे भजन, प्रबोधन आणि सामाजिक एकतेचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्याच्या त्यांच्या योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे त्यांच्या सेवाकार्याला नवी प्रेरणा मिळाली आहे.

नवरत्न गुरुदेव सेवा मंडळ आणि ग्रामस्थांनी अनिल सालंकार यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

चार एकरांतील कपाशी रानडुकरांनी केली उद्ध्वस्त

शेतातील नुकसान पाहताच शेतकऱ्याला भोवळ; तासभर राहिला बेशुद्ध, ब्राम्हणवाडा शिवारातील घटना वनविभागाकडून पंचनामे करून तातडीने भरपाई देण्याची मागणी

आष्टी (शहीद)/ जनमाध्यम

आधीच पाणीटंचाई आणि वाढत्या उत्पादन खर्चाने शेतकरी मेटाकुटीला आला असताना आता वन्यप्राण्यांच्या उपद्रवाने त्याच्या संकटात भर घातली आहे. कारंजा घाडगे तालुक्यातील ब्राम्हणवाडा शिवारात रानडुकरांच्या कळपाने चार एकरांतील कपाशी पिकाची अक्षरशः नासधूस केली. आयुष्यभराची मेहनत एका रात्रीत उद्ध्वस्त झाल्याचे दृश्य पाहून शेतकरी नरेश अशोकराव घोडे यांना जबर मानसिक धक्का बसला. त्यांना शेतातच भोवळ येऊन ते कोसळले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



बुधवारी, ४ नोव्हेंबरच्या पहाटे ही घटना घडली. ब्राम्हणवाडा येथील नरेश घोडे यांच्या सर्वे क्रमांक ११३ (के) मधील चार एकर शेतात रानडुकरांच्या कळपाने प्रवेश केला. कळपाने कपाशी पिकाची मोठ्या प्रमाणात नासधूस केली. सकाळी शेतात पोहोचलेल्या घोडे यांना पिकाची अवस्था पाहून मोठा धक्का बसला. डोळ्यांसमोर उभे पीक उद्ध्वस्त झालेले पाहून त्यांना चक्कर आली आणि ते जमिनीवर कोसळले. तब्बल तासाभरानंतर शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी घरी जाऊन कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली.

या घटनेची माहिती खासदार अमर काळे यांना दूरध्वनीद्वारे देण्यात आली. वनविभागालाही कळविण्यात आल्यानंतर विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली. मात्र, चार एकरांतील पिकाची झालेली वाताहत पाहून घोडे यांना अश्रू अनावर झाले. शेतातच त्यांनी हंबरडा फोडत आपल्या व्यथा मांडल्या. व्हॉट्स?प कॉलद्वारेही संबंधितांना नुकसानीची माहिती देण्यात आली.

एकीकडे पाण्याची टंचाई, दुसरीकडे महागडा उत्पादन खर्च आणि त्यात वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव, अशा तिहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. कर्ज काढून, रात्रंदिवस मेहनत करून जगविलेल्या कपाशी पिकावर रानडुकरांनी एका रात्रीत पाणी फेरले. आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा प्रश्न घोडे यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

वनविभागाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार भरपाई द्यावी. तसेच रानडुकरांच्या उपद्रवावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी नरेश घोडे यांनी केली आहे.

खात्यांतून परस्पर आर्थिक व्यवहार करून फसवणूक

कर्ज मंजुरीच्या आमिषाने दोघांनी उघडली मेडिकल व्यावसायिकाची बँक खाती

वर्धा / जनमाध्यम

मेडिकल व्यवसायाच्या विस्तारासाठी कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका मेडिकल व्यावसायिकाची दोन बँक खाती ताब्यात घेऊन त्यांचा गैरवापर केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात तन्मय भगत (रा. समतानगर, वर्धा) आणि आकाश ढोरे (रा. देवळी) या दोघांविरुद्ध वर्धा शहर पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, कुणाल जगदीशराव तिखे (वय ३०, रा. मुंदडा कॉलनी, नाचणगाव रोड, पुलगाव) यांचे पुलगाव येथील आर. के. शाळेजवळ श्री गजानन मेडिकल अँड जनरल स्टोअर्स नावाचे दुकान आहे. व्यवसाय वाढविण्यासाठी त्यांना कर्जाची आवश्यकता होती. मात्र, बँकेकडून कर्ज मिळत नसल्याने त्यांनी मित्र आकाश ढोरे याच्याकडे मदत मागितली. आकाशने तन्मय भगत हा कर्ज मंजूर करून देऊ शकतो, असे सांगितले.

त्यानंतर २ जुलै २०२५ रोजी तिखे हे आकाशसोबत वर्ध्यात आले. समतानगर येथील तन्मय भगत याची भेट घेतल्यानंतर त्याने कर्जासाठी बँक खाते उघडण्यास सांगितले. त्यानुसार महाराष्ट्र बँकेच्या वर्धा शाखेत ऑनलाइन खाते उघडण्यात आले. या खात्याच्या डिपॉझिटची रक्कम तन्मयने फोन-पेद्वारे पाठविली. मात्र, त्यानंतर त्याने तिखे यांच्याकडून पासबुक, एटीएम कार्ड आणि बँक खात्याशी संलग्न असलेले सिमकार्ड ताब्यात घेतले.

दरम्यान, कर्जासाठी करंट खाते आवश्यक असल्याचे सांगून आकाश ढोरे याने तिखे यांना आयसीआयसीआय बँकेच्या पुलगाव शाखेत खाते उघडण्यास सांगितले. २५ मार्च २०२६ रोजी आकाशने मेडिकल दुकानात येऊन या खात्याचे चेकबुक, एटीएम कार्ड आणि बँकेशी संलग्न सिमकार्डही ताब्यात घेतले.

दोघांकडून कर्ज मंजुरीबाबत केवळ वेळकाढूपणा होत असल्याने तिखे यांनी आपले बँक साहित्य परत मागितले. मात्र, दोघेही टाळाटाळ करू लागले. १० मे रोजी आयसीआयसीआय बँकेचे कर्मचारी मेडिकल दुकानात येऊन खात्याबाबत चौकशी करून गेले. त्यानंतर ४ जुलै रोजी बँक व्यवस्थापकाने दुकानात येत संबंधित खात्यात संशयास्पद व्यवहार झाल्याचे सांगितले. त्यामुळे खाते गोठविण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, २२ सप्टेंबर २०२६ रोजी पुलगाव पोलिसांकडून नोएडा येथून आलेली नोटीस मिळाल्यानंतर तिखे यांना आपल्या बँक खात्यांचा गैरवापर झाल्याचे समजले.

सावंगीत घरफोडी करणारे दोघे जेरबंद; ४.६२ लाखांचा ऐवज जप्त

वर्धा/ जनमाध्यम

घरात कोणी नसल्याची संधी साधून दरवाजातून प्रवेश करत सोन्याच्या दागिन्यांवर हात साफ करणाऱ्या दोन आरोपींना सावंगी पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी त्यांच्याकडून तब्बल ४ लाख ६२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत केले. या कारवाईमुळे सावंगी परिसरातील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला आहे.



सावंगी (मेघे) येथील प्रियंका विठ्ठल चौधरी यांच्या घरी ही चोरी झाली होती. अज्ञात चोरट्यांनी घराच्या मागील दरवाजातून प्रवेश करून आलमारीत ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र, लांब पोत, पोहेहार, मिनी मंगळसूत्र, कानातील दागिने आणि अंगठ्या असा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी सावंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक विनोद गिरी यांनी गुन्हे शोध पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढत प्रफुल केशव दोड (४२) आणि अमोल केशव दोड (४६), दोघेही रा. सावंगी (मेघे) यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्याकडून चोरीतील ४ लाख ६२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महादिक यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक विनोद गिरी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

पथकात पोलिस उपनिरीक्षक गोपाल शिंदे, संजय पंचभाई, वीरेंद्र कांबळे, अनिल वैद्य, निखिल फुटाणे, हर्षवर्धन मुन, अमोल जाधव आणि आकाश गोरे यांचा समावेश होता.

न्यायालयाचे निर्बंध कागदावर, बजाज चौकात फटाक्यांचा बार

न्यायालयाचे आदेश धाब्यावर; बजाज चौकात पोलिसांच्याच परवानगीने फटाक्यांची आतषबाजी, फायर शोच्या नावाखाली अर्धा तास वाहतूक ठप्प; उच्च न्यायालयाच्या निर्बंधांची अंमलबजावणी कोण करणार?

वर्धा / जनमाध्यम

न्यायालयाचे आदेश सर्वसामान्यांसाठीच आहेत का? कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेले प्रशासनच नियमांना बगल देत असेल, तर नागरिकांनी दाद मागायची कुणाकडे? असा संतप्त प्रश्न उपस्थित करणारी घटना बुधवारी रात्री बजाज चौकात घडली. स्व. जमनालाल बजाज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित फायर शोच्या नावाखाली भरवस्तीत फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. विशेष म्हणजे, सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास निर्बंध असतानाही शहराच्या मध्यवर्ती आणि वर्दळीच्या चौकात हा प्रकार घडला. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाला प्रशासनानेच हरताळ फासला का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने २२ सप्टेंबर २०२६ रोजी सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यासंदर्भात निर्बंध घातले आहेत. मात्र, बुधवारी रात्री साडेसातच्या सुमारास बजाज चौकात फायर शोच्या नावाखाली फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. न्यायालयाचे निर्बंध असताना हा कार्यक्रम आयोजित करण्यास परवानगी कशी मिळाली, हा आता कळीचा प्रश्न बनला आहे.



या शोसाठी जवळपास अर्धा तास बजाज चौकातील वाहतूक रोखण्यात आली होती. आधीच वर्दळीचा असलेला हा चौक फायर शोमुळे ठप्प झाला. शो संपल्यानंतर वाहतूक सुरू होताच वाहनांच्या रांगा लागल्या. नागरिकांना आणि वाहनचालकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागला. एका कार्यक्रमासाठी सार्वजनिक रस्त्यावरील वाहतूक रोखण्याचा निर्णय कोणाच्या आदेशाने घेण्यात आला, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

वाहतूक पोलिसांनी दाखवले शहर पोलिसांकडे बोट

या प्रकाराबाबत वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता, संबंधित कार्यक्रमाला शहर पोलिसांकडून परवानगी देण्यात आल्याचे सांगण्यात आले. एवढेच नव्हे, तर वाहतूक अधिकाऱ्यांनी शहर पोलीसांकडे बोट दाखवून पळवाट काढत वाहतूक थांबण्यासाठी सरसावले त्यामुळे परवानगी देणारे कोण आणि न्यायालयाच्या निर्बंधांचा विचार करण्यात आला होता का, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

एसपी म्हणतात, पडताळणी करतो

या गंभीर प्रकारासंदर्भात पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्याशी संपर्क साधला असता, प्रकरणाची पडताळणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. मात्र, न्यायालयाचे आदेश असताना परवानगी देण्यामागील नेमकी भूमिका काय होती, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही.

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांनीच नियमांच्या चौकटीबाहेर निर्णय घेतला असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणार का? आता पोलीस प्रशासन या प्रकरणात काय कारवाई करते, याकडे वर्धेकरांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

दिवाळीत विद्यार्थ्यांची चांदी!

वसतिगृहात राहणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांना सरकार देणार भेट



मुंबई -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याचा विकास, विद्यार्थ्यांचे कल्याण, न्यायव्यवस्था आणि सामान्य नागरिकांसाठी अनेक मोठे आणि अभूतपूर्व निर्णय घेण्यात आले आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांना सरकारने दिवाळी भेट दिली आहे. त्यांच्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. याबाबत ओबीसी मंत्री अतुल सावेंनी महत्त्वाची माहिती दिली आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने घेतलेल्या या निर्णयांचा थेट फायदा पशुपालक शेतकरी, विद्यार्थी, वाहन मालक आणि कृषी क्षेत्राशी संबंधित लोकांना होणार आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि इतर मंत्री उपस्थित होते. वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या इतर मागासवर्गीय (ओबीसी), विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी हा एक मोठा दिलासा आहे.

या विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता दुप्पटीहून अधिक करण्यात आला आहे. आता विभागीय स्तरावरील वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १,५०० आणि जिल्हास्तरीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १,३०० मिळतील.

याचा इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमातीं आणि विशेष मागास प्रवर्गांतील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृह योजनेंतर्गत निर्वाह भत्ता वाढीस मंजूरी देण्यात आली आहे.

तर अंतिम वर्षाच्या पशुवैद्यकशास्त्र विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप विद्यावेतन वाढ करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठात पशुवैद्यकशास्त्राचा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल. यामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये स्वयंसेवा करण्यास प्रोत्साहन मिळेल. ज्यामुळे शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना त्यांच्या जनावरांची काळजी घेण्यास मदत होईल.तर पालघर जिल्ह्यात तीन ग्राम न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तळसरी, मोखाडा आणि विक्रमगड येथे ग्राम न्यायालय स्थापन केले जातील. प्रत्येक न्यायालयासाठी पाच याप्रमाणे एकूण १५ सहाय्यक पदांना आवश्यक अर्थसंकल्पासह मंजुरी देण्यात आली आहे.

वाहनावरील चलनात २० टक्के सूट



मंत्रिमंडळात अभय योजनेला मान्यता

मुंबई - नियमभंग केलेल्या वाहनांवरील थकीत दंड भरून वाहन दंड मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलन अभय योजना-२०२६ राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली. या निर्णयानुसार प्रलंबित दंडाच्या रकमेवर वीस टक्क्यांची सवलत मिळणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मोटार वाहन कायदा १९८८ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहन चालक, मालक यांच्याकडून दंड आकारण्यात येतो.

या दंडाच्या आकारणी व वसुलीसाठी राज्यामध्ये चलन देण्याकरिता ३० जानेवारी २०१९ पासून वन स्टेट वन चलन प्रकल्प सुरू केला आहे. याअंतर्गत नियम भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ई-चलनाद्वारे दंड आकारण्यात येतो. याबाबत संबंधित वाहन चालकांना त्यांच्या मोबाईलवर चलान पाठविण्यात येते. या दंडाच्या वसुलीसाठी वाहतूक वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. तरीही नागरिकांचा प्रतिसाद तुलनेने कमी राहिला आहे. या दंडाची वसूली व्हावी आणि वाहतूक नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी देशातील अन्य राज्यात दंडाच्या रकमेमध्ये सूट देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील तडजोड पात्र थकीत दंडाच्या रकमेवर एकवेळची सवलत म्हणून २० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी तीन टप्प्यांमध्ये 'महाराष्ट्र वाहतूक पोलीस अभय योजना-२०२६' राज्यामध्ये राबविण्यात येणार आहे.

टप्पा-१ महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक २१ जानेवारी २०२६ पासून ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत बजावलेल्या आणि वसूलीसाठी प्रलंबित असलेल्या तडजोडपात्र चलानावरील एकूण प्रलंबित दंडाच्या रकमेवर एकवेळची सवलतम्हणून २० टक्केपर्यंत सवलत देण्यात येणार आहे. या सवलतीचा कालावधी ३० दिवस राहणार आहे.

टप्पा-२ १ नोव्हेंबर २०२६ पासून पुढे बजावलेल्या चलनावरील दंडाची रक्कम संबंधित वाहनधारक किंवा मालकाने चलन बजावल्यापासून पुढे ४५ दिवसांच्या आत भरल्यास अशा सर्व चलनांवर लवकर भरणा सवलत (अर्ली पेमेंट एण्ड्रर्डी) म्हणून २०३ सवलत देण्यात येणार आहे. या सवलतीचा कालावधी एक वर्ष असेल.

टप्पा-३ ३० जानेवारी २०१९ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत बजावलेल्या आणि वसूलीसाठी न्यायालयात दाखल असलेल्या तडजोडपात्र चलानावरील एकूण थकीत दंडाच्या रकमेवर २० टक्केपर्यंत सवलत देण्यात येणार आहे. या सवलतीचा कालावधी ३० दिवस असेल.

दरम्यान, या अभय योजनेचा कालावधी संपल्यानंतर वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम २१ नुसार तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार परवाना निलंबन, वाहनाचे व्यवहार रोखणे, वाहन जप्ती अशा प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे. या अभय योजनेची अधिसूचना काढण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

भव्य विवाह रद्द, शेतकऱ्यांसाठी १ कोटी दिले



छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात पाणी टंचाई आणि पिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडले आहेत. अशा कठीण परिस्थितीत समाजाप्रती आपली बांधिलकी जपत राज्याचे मंत्री अतुल सावे यांनी एक अत्यंत महत्त्वाचा आणि कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. आपल्या मुलाचा होणारा भव्यदिव्य विवाह सोहळा रद्द करत त्यांनी अत्यंत साधेपणाने विवाह उरकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी या सोहळ्यासाठी होणारा खर्च वाचवून तब्बल १ कोटी रुपयांची मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सुपूर्द केली आहे.येत्या २५ नोव्हेंबर रोजी मंत्री अतुल सावे यांचे चिरंजीव अनुराग आणि ईशा यांचा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात पार पाडण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, संपूर्ण मराठवाड्यात आणि राज्यात बळीराजा तसेच सर्वसामान्य जनता भीषण दुष्काळ आणि पाणी टंचाईने होरपळत असताना भव्य उत्सव साजरा करणे मनाला पटणारे नाही, अशी भूमिका वधू आणि वर अशा दोन्ही पक्षांच्या पित्यांनी घेतली.

प्रेमप्रकरणाच्या संशयातून दोघांना अमानुष मारहाण

धाराशिव : जिल्ह्यातील तुळजापूरात प्रेम प्रकरणाच्या संशयातून २ तरुणांना बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.



या मारहाणीत समीर जब्बार पटेल या युवकाचा मृत्यू झाला असून अरबाज अफसर सय्यद हा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर धाराशिव येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, पोलिस या घटनेचा तपास करीत आहेत. मात्र, जखमी अरबाज सय्यद यांच्या अंगावरील जखमांचे फोटो आणि व्हिडिओ चांगलेच व्हायरल झाले आहेत. अरबाज सय्यद हा तुळजापूर शहरात चहा पीत बसला असताना तिघांनी त्याला बळजबरीने वाहनात बसवून शिंदे महाराज यांच्या शेतात नेले. तेथे त्याच्या तोंडावर आणि पाठीवर बेदम मारहाण करण्यात आली. दरम्यान, या प्रकरणात तुळजापूर पोलिसात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा पोलीसांकडून शोध घेतला जात आहे.

महाराष्ट्रात परतणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुरक्कर



मुंबई : गुजरातमधील सुरत आणि परिसरात रोजगार, व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील हजारो नागरिकांना सणासुदीला गावी परतताना रेल्वे स्थानकांवरील गर्दीचा सामना करावा लागतो. ही गर्दी नियंत्रित करण्यासाठी पश्चिम रेल्वेने उधना स्थानकावर ४० कोटी रुपये खर्चून स्वतंत्र प्रवासी सुविधा केंद्र उभारले आहे. एकाच वेळी २५ ते ३० हजार प्रवाशांची क्षमता असलेल्या या केंद्रामुळे महाराष्ट्रासह उत्तर, दक्षिण आणि ईशान्य भारतात जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळेल.दिवाळी आणि छठपूजेच्या काळात गुजरातमधील रेल्वे स्थानकांवर उसळणारी प्रवाशांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी पश्चिम रेल्वेने उधना स्थानकावर स्वतंत्र प्रवासी सुविधा केंद्र सुरू केले आहे. तसेच हिवाळी आणि उन्हाळी हंगामामधील गर्दी विभाजित करता येणार आहे. गाड्यांच्या वेळेनुसार प्रवाशांना टप्प्याटप्प्याने फलाटावर प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे गर्दीचे नियोजन होईल.

बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठीचे पात्रता निकष शिथिल

मुंबई: भारतीय परिचर्या परिषदेने आठवडाभरापूर्वी बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठीचे पात्रता निकष शिथिल करण्याचे आदेश जारी केले होते. मात्र पर्सेंटाईल कितीपर्यंत कमी करणार याबाबत काहीही स्पष्टता नव्हती. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केलेल्या प्रवेश वेळापत्रकात पात्रता निकष शून्य करण्यात आला आहे. त्यामुळे प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.राज्य सरकारने यंदा सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जीएनएम) देणाऱ्या आठ महाविद्यालयांचे पदवी परिचर्या महाविद्यालयांत रूपांतर केले. तसेच वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न असलेल्या ५ परिचर्या पदवी महाविद्यालयांमधील विद्यार्थी क्षमतेत वाढ केल्याने राज्यातील बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या जागांमध्ये एक हजार जागांची वाढ झाली.

मनसेच्या नेत्याने सोडली साथ, काँग्रेसमध्ये मोठा पक्षप्रवेश



पुणे - राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे. मनसेला मोठा धक्का बसला आहे. रणजित शिरोळे यांनी मनसेची साथ सोडली आहे. त्यांनी काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. हा पुण्यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसाठी मोठा धक्का मानला जात आहे. मनसेचे राज्य सरचिटणीस म्हणून देखील रणजित शिरोळे यांनी पक्षाचं काम केलं होतं. मात्र त्यानंतर आता त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी २००९ मध्ये मनसेकडून लोकसभा निवडणूक देखील लढवली होती. रणजित शिरोळे यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीमध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

रणजित शिरोळे हे पुण्यातील मनसेचे एक प्रमुख नेते आहेत. त्यांनी मनसेचे राज्य सरचिटणीस म्हणून देखील पक्षाचं काम पाहिलं आहे. त्यांनी २०२४ मध्ये आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. रणजित शिरोळे हे मनसेच्या स्थापनेपासून पक्षासोबत होते. पुण्यातील शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात त्यांनी पक्षाचं काम केलं. मार्च २०२३ मध्ये राज ठाकरे यांनी त्यांची मनसेच्या राज्य सरचिटणीसपदी नियुक्ती केली होती. एवढंच नाही तर २००९ मध्ये मनसेने त्यांना पुणे लोकसभा मतदारसंघामधून उमेदवारी देखील दिली होती. या निवडणुकीमध्ये त्यांना ७५ हजार मतं पडली होती. ते या मतदारसंघामधून तिसऱ्या क्रमांकाचे उमेदवार होते.

रणजित शिरोळे यांचे वडील, पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष होते. दरम्यान या पक्षप्रवेशावर प्रतिक्रिया देताना रणजित शिरोळे यांनी म्हटलं की, या पक्षाशी माझ्या कुटुंबाचे जुनेच संबंध आहेत. एक व्यक्ती म्हणून काम करायचं आहे, त्यासाठी मी आता काँग्रेस हे माध्यम निवडलं आहे.

देशाच्या जडणघडणीत या पक्षाचं मोठं योगदान आहे. आज ज्या पद्धतीने राहुल गांधी यांनी वादळ उभे केले आहे, त्या वादळाचा एक भाग होण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यात मी आता जोडलो गेलो आहे आता पक्षाचे काम करेल, पक्ष जास्तीत जास्त लोकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करेल असं यावेळी सिरोळे यांनी म्हटलं आहे. दरम्यान हा मनसेसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

धर्माच्या नावारवील भ्रष्टाचार रवपवून घेणार नाही : रोहित पवार



नाशिक -शहरात कुंभमेळाच्या नावाखाली जो पैसा खर्च केला जातोय, त्या कामा बाबतीत आम्ही नाराज आहोत. कुंभमेळयासाठी ३५ हजार कोटींचा खर्च सांगतायत पण ३५ हजार कोटींची कामे प्रत्यक्षात दिसत नाहीत. जे रस्ते चागले होते, ते उकरण्यात आले आहेत. पावसाळ्यात प्रवास करणाऱ्या १५ ते १६ नागरिकांचा प्राण त्यांनी गमावला, नाशिककरांनी विकास कामात सुरू असणारा भ्रष्टाचार यावर आक्षेप घेतला आहे. इथे काम व्हावे आमची सर्वांची इच्छा आहे. पण त्यात भ्रष्टाचार होऊ नये, ही आमची भावना आहे. आम्ही देखील मंदिरात जातो, मात्र त्याचे भांडवल करत नाही. श्री राम, गंगा, गोदावरी, अनेक धार्मिक स्थळाचे भक्त आहेत. पण धर्माच्या नावावर भ्रष्टाचारचा खडा टाकला तर तो आम्ही मान्य करणार नाही, असा इशारा देत कुंभमेळ्याच्या विकास कामासंदर्भात आमदार रोहित पवारांनी आक्षेप नोंदवला आहे.

अन्यथा कुंभमेळ्याला येणाऱ्या साधू-संतांना केमिकलचं पाणी मिळेल

दरम्यान, ३५ हजार कोटीची कामे सुरू आहे, ते कुठे सुरू आहे, त्याचा शोध आम्ही घेणार आहोत. मी देखील कुंभमेळात गेलो होतो, एका दिवसात १६ कोटी लोक आले. ७ हजार कोटी रुपयांचा खर्च झाला. इथे ३५ हजार कोटी चा खर्च आहे. महाकुंभ मेळाव्याचे महत्व गोदावरीचे पणीं आहे, त्या लोकांना पाणी बघायचे आहे. पण ते पाणी इथे दिसत नाही. खालच्या बाजूला बंधारा बांधला पाहिजे. एमआयडीसी आणि प्रदूषण विभाग याना २० दिवस मुदत देतो, जिथे केमिकलचे पाणी कंपनी मधून टाकले जात आहे त्यावर काम केले नाहीत तर महागात पडेल. कुंभमेळ्याला येणाऱ्या साधू-संतांना केमिकलचं पाणी मिळेल, आजारांची शक्यता व्यक्त करत आमदार रोहित पवारांनी या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे.



नवी दिल्ली - पंजाब विधानसभेच्या निवडणुकीनिमित्त काँग्रेस विरुद्ध आम आदमी पक्ष असा संघर्ष पेटण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे नेते, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यावर जोरदार हल्लाबोल

'त्यांच्या तोंडाला दारूचा वास यायचा'- राहुल गांधी टीका

काँग्रेस वि. आप संघर्ष पेटणार?

केला. पंजाबमधील अमली पदार्थांविरोधात लढाई लढण्यात ते अपयशी ठरल्याचा ठपका ठेवताना राहुल गांधी म्हणाले की, भगवंत मान जेव्हा लोकसभेत यायचे तेव्हा त्यांच्या तोंडाला दारूचा वास येत असे.

पंजाबच्या संगुर येथे 'इन्साफ रॅली'ला संबोधित करत असताना राहुल गांधी यांनी आम आदमी पक्षावरही टीका केली. 'आप' सरकारला दिल्लीतून नियंत्रित केले जात असल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी त्यांच्या अमली पदार्थविरोधी लढ्यातील क्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

भगवंत मान मुख्यमंत्री होण्यापूर्वी पंजाबमधून खासदार म्हणून निवडून आले होते. तेव्हाच्या दिवसांची आठवण सांगताना राहुल गांधी म्हणाले, 'भगवंत मान तेव्हा लोकसभा सभागृहात आमच्या शेजारी बसायचे आणि हास्यविनोद करायचे. त्यावेळी सकाळी ११ वाजेपर्यंत त्यांच्या तोंडाला दारूचा वास येत असे.'

ही आठवण सांगितल्यानंतर राहुल गांधी पुढे म्हणाले की, मद्य घेणे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे.

गोकुळमध्ये कायदा बदलणे हुकुमशाहीचे लक्षण : चव्हाण

कोल्हापूर/ सातारा : राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी गोकुळमध्ये संचालक वाढीचा निर्णय, ऊस दर आंदोलन यासंदर्भात भाष्य केलं आहे. गोकुळमध्ये कायदा बदलणं हे हुकुमशाहीचं लक्षण असल्याचा हल्लाबोल पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी गोकुळबाबतचा निर्णय सरळसरळ हुकुमशाहीचा,दादागिरीचा असल्याचं म्हटलं. निवडून आलेल्या लोकांचे अधिकार काढून घेऊन आपल्या विचारांची माणसं तिथं बसवणं, आर्थिकदृष्ट्या उत्कृष्टपणे चाललेल्या संस्थेवर आपण जबरदस्ती कब्जा करणं हे सगळं चाललेलं आहे.लोक याला सहन करतील का नाही हे माहिती नाही. कोर्ट कचेरी होईल, पण शेवटी सरकार आहे, असं मत पृथ्वीराज चव्हाण यांनी मांडलं.

'त्या' सहकारी संस्थांमध्ये ५ शासन नियुक्त संचालक नेमणार



मुंबई - राज्यातील ज्या सहकारी संघिक संस्थांची वार्षिक उलाढाल पाचशे कोटींहून अधिक आहे, अशा संस्थांच्या समित्यांवर शासन नामनिर्देशित पाच सदस्यांची नियुक्ती होणार आहे. यात एक सहाय्यक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी आणि संस्थेच्या कार्याचा अनुभव असलेल्या चार व्यक्तींची नियुक्ती होईल. शासकीय अधिकाऱ्याला मताचा अधिकार नसेल. इतर चौघांना संचालक मंडळात मताचा अधिकार देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठक पार पडली. त्यात विविध निर्णय घेण्यात आले.

सहकार विभागाच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०च्या कलम ७३ अ (२) च्या नियमांमध्ये नवीन नियम समाविष्ट करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार ५ शासन नियुक्त सदस्यांपैकी अनुभव असलेल्या ४ सदस्यांना संचालक मंडळात मताचा अधिकार असेल. पण ते संस्थेच्या पदाधिकारी पदाच्या निवडणुकीस पात्र राहणार नाहीत. ही सुधारणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना लागू राहणार नाही असं शासनाने स्पष्ट केले आहे.

पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यामध्ये वाढ. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा. ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयाच्या ठिकाणी सेवा देण्यासाठी प्रोत्साहन मिळणार. पशुधनाची काळजी घेण्यासाठी शेतकऱ्यांना, पशुपालकांना मदत होणार. (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मस्त्यव्यवसाय विभाग)वाहनांवरील दंडासाठी अभय योजना. नियमभंग केलेल्या वाहनावरील दंडासाठी महाराष्ट्र वाहतुक पोलीस चलान अभय योजना-२०२६. चलनावरील प्रलंबित दंडाच्या रकमेवर एकवेळची बाब म्हणून वीस टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार. वाहन धारकांना थकबाकी भरून वाहन दंडमुक्त करता येणार. (गृह विभाग)

वसतिगृहात राहणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमातीं व विशेष मागास प्रवर्गांतील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ. विभागस्तरीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना महिन्याला पंधराशे, तर जिल्ह्याच्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना तेराशे रुपये मिळणार. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृह योजनेंतर्गत निर्वाह भत्ता वाढीस मंजूरी. (इतर मागास बहुजन कल्याण विभाग)

पालघर जिल्ह्यात तीन ग्राम न्यायालये स्थापन करण्यास मंजूरी. तलासरी, मोखाडा व विक्रमगड येथे ग्राम न्यायालय स्थापन होणार. या न्यायालयांसाठी प्रत्येक पाच अशा एकूण पंधरा अनुषंगिक पदांना मान्यता. त्यासाठीच्या आवश्यक खर्चाच्या तरतुदीस मंजूरी. (विधि व न्याय विभाग)

नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापनेस मंजूरी. यापूर्वी मंजूर जोड न्यायालयाऐवजी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे नियमित न्यायालय स्थापन होणार. या न्यायालयासाठी आवश्यक पदांना, व त्याकरिताच्या खर्चाच्या तरतुदीस मंजूरी. (विधि व न्याय विभाग)

नागपूर जिल्ह्यातील नगर पंचायत बिडगाव तरोडी (खुर्द) पांढुर्णा (ता. कामठी) यांना १ हेक्टर ८६ आर जमीन देण्यास मंजूरी. नगर पंचायतीला प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी जमीन देण्याचा निर्णय.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

ट्रम्प यांची परीक्षा

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांच्या निकालांकडे संपूर्ण जगाच्या नजरा खिळल्या आहेत. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लोकप्रियतेची चाचणी म्हणून या निवडणुकांचे महत्त्व आहेच; पण त्यांच्या एकाधिकारशाहीकडे झुकणाऱ्या राजकीय कार्यपद्धतीवर अमेरिकन लोकशाही कितपत नियंत्रण ठेवू शकते, याचीही कसोटी आहे. प्रतिनिधिगृह अथवा सिनेटमध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे बहुमत संपुष्टात आले, तर राजकीय समीकरणे बदलतील. निकालांचे परिणाम अमेरिकेपुरते मर्यादित राहणार नाहीत.व्यापार, आयात शुल्क, स्थलांतर, तंत्रज्ञान, संरक्षण सहकार्य आणि पश्चिम आशियातील संघर्ष अशा अनेक मुद्द्यांवर भारताच्या हितसंबंधांशी त्यांचा थेट संबंध आहे. अमेरिकेच्या संसदेत प्रतिनिधिगृह आणि सिनेट अशी दोन सभागृहे आहेत. सध्या दोन्ही सभागृहांवर रिपब्लिकन पक्षाचे नियंत्रण आहे. सिनेटमध्ये १०० जागा आहेत. सध्या रिपब्लिकन पक्षाकडे ५३, तर डेमोक्रॅटिक पक्षाकडे ४५ जागांसह आणि २ अपक्षांचा पाठिंबा आहे. सिनेटच्या ३५ जागांसाठी निवडणूक होत आहे. पैकी २२ जागा रिपब्लिकनकडे, तर १३ जागा डेमोक्रॅटिककडे आहेत. सिनेटमध्ये स्पष्ट बहुमतासाठी डेमोक्रॅटिक पक्षाला किमान ४ जागांचा निव्वळ फायदा मिळवावा लागणार आहे. अमेरिकन संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधिगृहात एकूण ४३५ जागा आहेत. येथे बहुमतासाठी २१८ जागा लागतात. या सर्व ४३५ जागांसाठी मतदान होत आहे. सध्या रिपब्लिकन पक्षाचे २१८, तर डेमोक्रॅटिक पक्षाचे २१४ सदस्य आहेत. उर्वरित जागांपैकी २ रिक्त असून, १ अपक्ष सदस्य रिपब्लिकन पक्षासोबत काम करतो. निवडणुकीत रिपब्लिकन पक्षापुढे दोन्ही सभागृहांतील बहुमत कायम राखण्याचे आव्हान आहे. एका सभागृहात जरी डेमोक्रॅटिक पक्षाने बहुमत मिळवले, तरी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उर्वरित कार्यकाळातील निर्णयप्रक्रियेवर त्याचा परिणाम होऊ शकतो. प्रतिनिधिगृहातील अत्यल्प बहुमत आणि सिनेटमधील चुरशीच्या लढती लक्षात घेता सत्तासंतुलन बदलण्याची शक्यता अधिक आहे.ट्रम्प यांच्याबद्दल नाराजी, महागाई, स्थलांतरितांविरुद्धची कठोर कारवाई आणि इराण युद्धाचे आर्थिक परिणाम हे मुद्दे निर्णायक ठरणार आहेत. रॉयटर्स आणि इप्सॉसच्या पाहणीनुसार ट्रम्प यांच्या कामगिरीला मिळणारा पाठिंबा ३२ टक्क्यांपर्यंत घसरला. ही आकडेवारी सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचे अभूतपूर्व आर्थिक स्वरूप. यंदा प्रचारावर सुमारे ११.९ अब्ज डॉलर खर्च झाला. उद्योगसमूह, धनाढ्य व्यक्ती आणि राजकीय हितसंबंध असलेल्या संघटनांचा निवडणूक प्रक्रियेतील वाढता प्रभाव हा अमेरिकन लोकशाहीसमोरील गंभीर प्रश्न आहे. जगाला लोकशाहीचा उपदेश करणाऱ्या अमेरिकेतच आर्थिक विषमता राजकीय निर्णयप्रक्रियेवर किती प्रभाव टाकते, याचेही या निवडणुकीच्या निमित्ताने परीक्षण होणार आहे. इतिहासात मध्यावधी निवडणुकांनी अमेरिकेच्या अध्यक्षांच्या सत्तेला अनेकदा मर्यादा घातल्याचे दिसते. २०१० मध्ये बराक ओबामा अध्यक्ष असताना रिपब्लिकन पक्षाने प्रतिनिधिगृहात ६३ अतिरिक्त जागा मिळवल्या होत्या. २०१८ मध्ये ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात डेमोक्रॅटिक पक्षाने प्रतिनिधिगृहात ४० जागांची निव्वळ वाढ नोंदवून बहुमत मिळवले होते. यातून महत्त्वाची बाब समोर आली, ती म्हणजे अमेरिकन मतदार अध्यक्षीय निवडणुकीत एखाद्या पक्षाला सत्ता देतात; परंतु मध्यावधी निवडणुकीत त्याच सत्तेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्नही करतात. यामुळे अमेरिकेच्या राज्यघटनेतील सत्ताविभाजन आणि परस्पर नियंत्रणाची व्यवस्था अधिक अर्थपूर्ण ठरते. मध्यावधी निवडणुकीत टेक्सास, ओहायो, नॉर्थ कॅरोलिना, मिशिगन आणि मेन या पाच राज्यांतील सिनेटच्या लढती अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. तेथील निकाल सिनेटमधील सत्तासंतुलन ठरवण्यात निर्णायक भूमिका बजावू शकतात. न्यूयॉर्क टाईम्स आणि सिएना यांनी या पाच राज्यांसह एकूण ७ राज्यांत केलेल्या सर्वेक्षणात ६ राज्यांमध्ये डेमोक्रॅटिक उमेदवार आघाडीवर असल्याचे दिसून आले आहे. प्रतिनिधिगृहात बहुमत गमावल्यास ट्रम्प यांना करकपात, स्थलांतर आणि आयात शुल्कासंबंधी नवे कायदे मंजूर करताना डेमोक्रॅटिक पक्ष अडथळे निर्माण करू शकतो. धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांना विरोधकांशी तडजोड करावी लागू शकते. इराणविरुद्धचे युद्ध आणि मोठ्या प्रकल्पांसाठी निधी मंजुरीत डेमोक्रॅटिक पक्ष कठोर अटी घालू शकतो.ट्रम्प यांच्याविरोधात महाभियोगाची प्रक्रियाही चालवली जाऊ शकते; मात्र, त्यासाठी सिनेटमध्ये दोनतृतीयांश सदस्यांचा पाठिंबा लागतो. गैरव्यवहारांची चौकशी सुरू झाल्यास ट्रम्प प्रशासनावर राजकीय आणि संस्थात्मक दबाव वाढू शकतो. अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना कायद्यांवर नकाराधिकार असतो. अनेक परराष्ट्र आणि प्रशासकीय निर्णय स्वतंत्र घेण्याची मुभाही असते. त्यामुळे डेमोक्रॅटिक विजयी झाल्यास राजकीय संघर्ष, तडजोडी, निर्णयप्रक्रियेत विलंब वाढू शकतो. उलट रिपब्लिकन पक्षाचे दोन्ही सभागृहांवरील नियंत्रण कायम राहिले, तर ट्रम्प यांना आणखी चालना मिळेल. पण जगाच्या चिंतेत भर पडेल. भारताच्या दृष्टीने विचार करता सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न व्यापाराचा आहे. ट्रम्प यांनी आयातशुल्काचा वापर दबावाचे साधन म्हणून केला. भारतीय निर्यातदारांसाठी ही अनिश्चितता चिंताजनक आहे. वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी उत्पादने, औषधनिर्मिती, इतर निर्यातप्रधान क्षेत्रांवर शुल्क धोरणाचा परिणाम होऊ शकतो. डेमोक्रॅटिक पक्षही मुक्त व्यापाराचा निर्विवाद समर्थक आहे, असे नाही. अमेरिकन रोजगाराचे संरक्षण, स्थानिक उत्पादनाला प्राधान्य आणि चीनवरील आर्थिक अवलंबित्व कमी करणे या बाबतीत दोन्ही प्रमुख पक्षांत लक्षणीय साम्य आहे. तथापि, युद्ध घोषित करण्याचे आणि संरक्षण खर्चाला मंजुरी देण्याचे संवैधानिक अधिकार कायदेमंडळाच्या हाती असल्याने, डेमोक्रॅट्स??चे वर्चस्व असलेले काँग्रेस प्रशासन वॉर पॉवर्स ॲक्टच्या माध्यमातून ट्रम्प यांच्या एकतर्फी लष्करी हस्तक्षेपाची व्याप्ती मर्यादित करू शकते. यामुळे पश्चिम आशियातील संघर्षाला लगाम बसून जागतिक ऊर्जा सुरक्षेला काही प्रमाणात स्थैर्य मिळू शकते. पाच कोटींहून अधिक झालेले आगाऊ मतदान अमेरिकन समाज स्वतःच्या राजकीय भवितव्याबाबत किती जागरूक आहे हे स्पष्ट करणारे आहे. या मतदारांनी अपेक्षेप्रमाणे कायदेमंडळात सत्तापालट घडवून आणला, तर दुभंगलेले शासन ट्रम्प यांच्या लहरी, आत्मकेंद्री आणि आक्रमक परराष्ट्र धोरणाला आंतरराष्ट्रीय नियमांवर आधारित व्यवस्थेकडे वळण्यास भाग पाडेल. पण ट्रम्प यांच्यासारखा आडमुठा आणि न्यायालयीन निकालांनाही धाब्यावर बसवणारा राष्ट्राध्यक्ष जनादेशाचा आदर करून धोरणांमध्ये बदल करणार का, हा खरा प्रश्न आहे.

उत्तम शेतीची कनिष्ठ शेती का झाली?

ग्रामीण संस्कृतीवर झालेला परिणाम

एकीकडे विकसीत भारताचे नियोजन व स्वप्नांची चर्चा होत असताना, दुसरीकडे खेडी भकास का होत आहे? याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. या विषयाचे विश्लेषण करताना, गांधी-विनोबा,बाबासाहेब-ज्योतीबा,मार्क्स-रोझा लूक्झेम्बर्ग यांच्या विचारांच्या व मार्गदर्शनाच्या माध्यमातूनच उत्तर शोधता येईल यात शंकाच नाही...

भारतात सोन्या-चांदीच्या खाणी नाहीत तरी सोन्याचा धूर निघणारा देश अशी भारत देशाची ख्याती होती.युरोपमध्ये बाष्प इंजीनचा शोध लागण्यापूर्वी भारतातून शेतीत तयार झालेले मसाले,इतर उत्पादन व हस्तकलेतून तयार झालेले कपडे निर्यात होत होते.त्या बदल्यात सोने व चांदी आपल्या देशात येत होते.याच कारणांमुळे मुगल भारतात आले.जेव्हा युरोपमध्ये बाष्प इंजीन (Steam Engine) चा शोध लागला व उद्योगीकरणाला यंत्राची साथ मिळाली. तेव्हा युरोपने आशिया व अफ्रिकेच्या देशांना गुलाम केले. भारतातही इंग्रजांनी मुगलांना बाजूला केले व आम्ही इंग्रजांचे गुलाम झालो.

'खेड्याकडे चला'

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला.त्या काळात भारत हा कृषीप्रधान देश होता.शेती हा केवळ अन्नधान्याचा उत्पादन करण्याचा व्यवसाय नाही तर भारतीय अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था आणि संस्कृतीचा मुलभूत आधार आहे, अशी मान्यता होती. शेतकरी हा समाजाचा अन्नदाता मानला जात असे.शेतीतून मिळणारे उत्पन्न मर्यादित असले तरी त्यांच्या जीवनात स्वाभिमान,स्वावलंबन आणि सामाजिक प्रतिष्ठा होती. गाव हे केवळ घरे आणि रस्ते यांचा समूह नव्हते.ते परस्पर सहकार्य,नातीगोती, लोककला आणि सामूहिक जीवन यांचे केंद्र होते. म्हणूनच राष्ट्रपीता महात्मा गांधींनी स्वतंत्र भारतात खेड्याकडे चला'असा संदेश दिला होता.या संदेशाच्या मुळात असलेली भावना बापूंनी नियुक्त केलेले प्रथम सत्याग्रही विनोबा भावेंनी अंत्यत सोप्या शब्दात मांडली आहे.एका अर्थाने विनोबांनी या शब्दांच्या माध्यमातून गांधीजींच्या स्वप्नातील स्वतंत्र भारत मांडला. विनोबा म्हणतात,'भारत स्वतंत्र गावांचा स्वतंत्र देश होता,मुगल आले तेव्हा हा देश स्वतंत्र गावाचा गुलाम देश झाला.इंग्रज आले तेव्हा हा देश गुलाम गावाचा गुलाम देश झाला.इंग्रज गेल्यावर हा देश गुलाम गावाचा स्वतंत्र देश झाला.आम्हाला स्वतंत्र गावाचा स्वतंत्र देश करायचा आहे.' भारत स्वतंत्र होवून ८० वर्ष होत आली तरी बापू-विनोबांचे स्वप्न पूर्ण झालेले नाही.

'शेतक-यांच्या आसूड'मधील विचार

शेती करणारा माणूस आर्थिक शोषणाचे चटकेच भोगतो आहे.शेतक-यांच्या मुलामुलींना शेती करण्यापेक्षा नोकरी करणे अधिक प्रतिष्ठेचे वाटते.उत्तम शेतीची कनिष्ठ शेती का झाली? याचे उत्तर डॉ. बाबासाहेब-महात्मा ज्योतीबा फुलेंच्या विचारातून व मार्गदर्शनातून मिळत आहे.भारतरत्न बाबासाहेबांनी गांधी-विनोबा यांच्या उलट आवाहन केले.'शहरांकडे चला'.बाबासाहेबांच्या या विचारांच्या मुळात महात्मा ज्योतीबांच्या 'शेतक-यांच्या आसूड'मधील विचारांचा व मार्गदर्शनाचाच आधार आहे.

आज शेतकरी-शेतमजूर बारा बलूतेदार यांची मुलेमुली शहरांकडे पलायन करीत आहे. ग्रामिण अर्थव्यवस्थेची लूट गोऱ्या इंग्रज सरकारच्या धोरणांमुळे कशी होत आहे,अत्यंत सोप्या शब्दात याची मांडणी, 'शेतकयांच्या आसूड' मध्ये करण्यात आली आहे. शेतक-यांचा आसूड-प्रकरण तिसरे,वाक्य पहिले-'आर्य ब्राम्हण इराणांतून कसे आले व शुद्र शेतकरी यांची मूळ पीठीका व हल्लीचे आमचे सरकार, एकंदर सर्व आपले कामगारास मन मानेल तसे पगार व पेन्शन देण्याच्या इराद्याने नाना प्रकारचे नित्य नवे कर शेतक-यांच्या बोडक्यावर बसवून, त्यांचे द्रव्य (capital accumuletion-भांडवल संचय माव-र्स चा विचार) मोठ्या हिकमतीने गोळा कर लागल्यामुळे शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत.' उत्तम शेतीची कनिष्ठ शेती व कनिष्ठ नोकरीची उत्तम नोकरी का होत आहे याचे उत्तर महात्मा जोतीबांनी १८८३ मध्येच दिलेले आहे. यालाच शेती व बिगर शेती क्षेत्रातल्या अर्थकारणाची विसंगती म्हणता येईल.

शेती कनिष्ठ होण्याचे कारण

शेती कनिष्ठ होण्याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे शेतमालाच्या किंमती व उत्पादन खर्च यांच्यातील वाढती तफावत. शेतकरी बियाणे, खते, कीटकनाशके, मजूरी, वीज, पाणी आणि यंत्रसामग्री यावर खर्च करतो. परंतू घरी पीक किती येईल?याची खात्री नाही. बाजारात भाव काय मिळेल याचीही खात्री नाही.ज्या प्रमाणात उत्पादन खर्च वाढतों त्याच प्रमाणात भाव वाढत नाही. जास्त उत्पादन झाले तर भाव पडतात (मागणी-पुरवठा) व कमी उत्पादन झाले तर आयात करून भाव पाडतात. कधी कधी भाव असतो पण मालच नसतो!

यामुळेच शेतीत कष्ट करणारा माणूस अधिक कष्ट करूनही आर्थिक दृष्ट्या मागे पडतो. ही केवळ शेतक-यांची समस्या नाही तर आर्थिक रचनेतील गंभीर विसंगती आहे. आम्ही शेतकरी संघटनेच्या मंचावर म्हणायचो,'शेतीचा व्यवसाय म्हणजे १०० के ६० करना और बाप का नाम चलाना'

महागाईनुसार वेतन व भत्ते

सरकारी नोकर,संघटीत क्षेत्रातील कामगार आणि अनेक औद्योगिक व्यवसायांना महागाईनुसार वेतन वाढ,भत्ते किंवा इतर संरक्षण मिळू शकते.पहिल्या वेतन आयोगापासून आठव्या वेतन आयोगाची सुरक्षा सरकारी कर्मचा-यांना मिळू शकते. परंतू शेतकरी-शेतमजूरांना महागाई नुसार उत्पन्न वाढीची (Income) तशी कोणतीच हमी



नसते. डिझेल, बियाणे, खते, किटकनाशके महाग झाली तरी त्याच्या मालाला त्या प्रमाणात वाढीव भाव-मजूरी मिळेल अशी व्यवस्थाच नाही.

शेतकरी आपल्या उत्पादनातून कच्चामाल उत्पादीत करतो.त्यावर प्रक्रीया करणारे उद्योग व्यापारी आणि विक्रेते पुढील मुल्य साखळीतून नफा-उत्पन्न मिळवतात. शेतक-यांच्या वाट्याला किती मुल्य येते? याचे उत्तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सोप्या शब्दात दिले आहे,'कच्चा माल मातीच्याच भावे, पक्का होताच चौपटीने घ्यावे-ग्राम जन सुखी कसे व्हावे' (रोझा लूक्झेम्बर्ग).

याचाच अर्थ असा की समाजातील इतर घटकांना त्याच्या श्रमाचा मोबदला वाढवण्याची संधी मिळत असेल,तर अन्न निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याला पण त्याच्या श्रमाचा योग्य मोबदाला मिळाला पाहिजे, म्हणूनच शेतकरी संघटनेची घोषणा होती,'भीक नको हवे घामाचे दाम'. आज ज्यांचे सरकार आहे त्या भाजपच्या मातृसंस्थेच्या भारतीय मजदूर संघाची घोषणा आहे,'देश के लिये करेंगे काम - काम के लेंगे पूरे दाम' हा न्याय शेतकरी शेतमजूरांना केव्हा मिळणार?

हरित क्रांतीमुळे उत्पादनात वाढ पण..

या प्रश्नाचे उत्तर देशाच्या आर्थिक धोरणातच आहे.आम्ही स्वतंत्र झालो तेव्हा ८०टक्के जनता खेडयात होत. शेती-शेतमजूरी,बारा बलुतेदारी यावर गावाचे व्यवहार होते. भारताची लोकसंख्या ४० कोटी होती. पण अन्नधान्याचा तुटवडा होता. म्हणून स्वतंत्र भारतात अन्नधान्य उत्पादनवर भर देणाऱ्या योजना तयार झाल्यात. औद्योगीकी करणासाठी मजूर,धान्य स्वस्त पाहिजे म्हणूनच धान्य उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात आला. हरित क्रांतीमुळे गहू-तांदूळ उत्पादनात मोठी वाढ झाली. सिंचन, सुधारित बियाणे, रासायनिक खते आणि यांत्रिकी करणामुळे शेतीच्या प्रती एकरी उत्पादनात वाढ झाली.शेतक-यांचे उत्पादन वाढले पण उत्पन्न वाढते नाही, तसेच हरितक्रांतीचे फायदे सुरवातीला झाले पण, जिथे सिंचन, भांडवल आणि बाजारपेठ उपलब्ध असलेल्या प्रदेशात मर्यादित होते, कोरडवाहू शेतकऱ्यांना पावसाच्या लहरीपणावरच अवलंबून राहावे लागले.

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाड्या सारख्या भागात पावसाची अनिश्चितत्ता, कापूस-सोयाबीन भावातील चढ़-उतार आणि वाढता उत्पादन खर्च.राहणीमानाचा खर्च यामुळे शेतक-यांच्या अडचणी तीव्र होतात. त्यामुळे कृषी धोरणात केवळ उत्पादन वाढ नव्हे तर लाभदायक किंमत,जोखीम संरक्षण आणि शेतक-यांच्या निव्वळ उत्पन्नाचा विचार केन्द्रस्थानी असलाच पाहिजे. याकरीता स्व. लालबहादूर शास्त्री यांनी, कृषी मूल्य आयोगाची स्थापना करून शेतक-यांना MSP (कमीत कमी किंमत) ची हमी दिली होती. पण दुर्देवाने त्यांचा कार्यकाळ फक्त १८ महिन्याचाच राहला व जय जवान। जय किसान।। चा विसर पडला.

नवीन आर्थिक धोरण व जागतिकीकरण

१९९० च्या नवीन आर्थिक धोरण व जागतिकीकरण यांच्या पार्श्वभूमीवर MSP च्या सुरक्षेची गरज वाढली होती. कारण आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमती बाजाराशी सबंध वाढला होता. आयात-निर्यात धोरण, रुपयाचे मूल्य जागतिक उत्पादन, परदेशातील शेतीचे अनुदान, आंतरराष्ट्रीय किंमती याचा भारतीय शेतमालाच्या किंमतीवर परिणाम होत आहे. जगात भाव पडते तर आपल्याकडे भाव पडतात. पण विकसीत (श्रीमंत) देशातील शेतक-यांना सरकार कडून मिळणाऱ्या संरक्षणाची आपण चर्चाच करीत नाही याचा अर्थ व्यापार नको असा नाही.आपण जागतिक व्यापारात पुढे होतो म्हणूनच सोने-चांदी देशात आली.आजच्या स्थितीत जर व्यापार करायचा असेल तर शेतक-यांना तंत्रज्ञान, पायाभूत सोयी, कर्ज, विमा, आणि योग्य किंमत यांचे सरक्षण अत्यंत आवश्यक आहे.

बाजार भावातील अनिश्चीतता

शेतक-यांना बाजाराचे स्वातंत्र्य देतानाही त्याचा लाभ मिळावा म्हणून आर्थिक पाठबळही हवे,नाही तर स्वातंत्र्य कागदावरच राहते आणि जोखमीचा भार शेतकरी उत्पादनावर पडतो.बाज़ार भावातील अनिश्चीतता तर कर्जबाजारी वाढवितेच पण वातावरण बदलामुळे जोखीम वाढत आहे. शेतीचा उद्योग खुल्या आसमानाखाली आहे. पेरणी पासून तर पीक कापणीपर्यंत शेतकरी खर्च करतो म्हणजे तो मातीतच पैसा टाकत असतो. उत्पन्न नष्ट झाले तर सर्वमातीतच! त्यात बाजारभाव पडले तर दुहेरी नुकसान. म्हणून त्याला पुढील हंगामासाठी पुनः कर्ज घ्यावे लागते.अशा परिस्थीतीत शेतकरी गरीब होत नाही तर त्याचा परिणाम कौटुंबिक संबंधावर व मानसिक स्वास्थ यावर होतो.

विदर्भ-मराठवाडयातील शेतकरी आत्महत्या

विदर्भ-मराठवाडयातील शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न या संकटाची गंभीरता दाखवतो.मी २००६ ला पूर्व प्रधानमंत्री डॉ मनमोहनसिंग माझ्या गावात आले होते.तेव्हा त्यांना म्हणालो होतो,'गावातला माणूस मरत नाही म्हणून जगतो आहे.'या सर्वांचा परिणाम ग्रामिण भागातील संस्कृतीवर, एकमेकांना मदत करण्याच्या भावनांवर पण होत याहे.

तरूण पीढी गावात न राहण्याचे महत्वाचे कारण म्हणजे श्रमाला न मिळणारा योग्य मोबदला. त्यामुळे श्रमाला प्रतिष्ठा नाही.शहरात जाऊन हॉटेलमध्ये काम करणे, ऑटो-टॅक्सी चालवणे, बांधकामावर काम करणे प्रतिष्ठेचे होत आहे, याचमुळे गांव भकास होत आहे. पूर्वी असे म्हणायचे की गांवात निवृत माणस राहतात आता असे म्हणायची वेळ आली आहे की, गावात फक्त डोक्यांने विचार करू न शकणारी माणेसच राहू शकतात.

'गावात इतर गरजूंना मदत करण्याची समजदारी होती. आता स्वतःची गरज पूर्ण होत नाही तर इतरांना मदत कोण करणार?'पहिले गांवात सण साजरे व्हायचे. पोळा, लोकगीते, भारूड, किर्तन, जत्रा यांची सबंध शेतीच्या चक्राशी होता, आता बैलच नाही तर बैल पोळा कसा? पैसाच नाही तर सण कसे साजरे करणार? याचा परिणाम सामूहिक सहभागावर तर झालाच आहे पण, कुंटुंबातील ताणतणाव वाढला आहे.

आज ५०टक्के जनता शहरात आहे.५०टक्के गावात आहे. भारताची लोकसंख्या १४० कोटी आहे.म्हणजेच ७० कोटी गावात आहे. १९४७ साठी लोकसंख्या ४० कोटी होती. ८० टक्के गावात होते. म्हणजे ३२ कोटी, आज ७० कोटी आहे. तरी शेतीत कामाला माणस नाही. यांत्रिकीकरण वाढत आहे, पण ही जी गावात माणस आहेत त्यांना रोजगार आहे का?उत्तर नाही. उरलेल्यांना शहरात आणले तर तिथेही रोजगार नाही. कारण यंत्र मानव येत आहे. विकासाची व्याख्या बदलण्याची वेळ आली आहे.

थोडक्यात,ज्यादिवशी शेतक-याला श्रमाचा योग्य मोबदला मिळेल, मुलामुलींच्या भविष्याची खात्री येईल त्या दिवशी उत्तम शेती पुन्हा उत्तम असेल.शेतीची प्रतिष्ठा पुनस्थापित झाली तर ग्रामीण संस्कृतीच्या निर्जिवपणा सजीव झाल्याशिवाय राहणार नाही.सरते शेवटी एकच मंत्र

'चांगले पीक चांगले भाव !
गावात उरणार नाही
गरीबीला वाव!!'

विजय जावंधिया
शेतकरी संघटना पाईक
मो. ९४२१७२७९९८

बदल स्वीकारल्याशिवाय प्रगती शक्य नाही!

शेती हा केवळ अनुभवावर चालणारा व्यवसाय नाही, तर तो सतत निरीक्षण, प्रयोग, अभ्यास आणि बदल स्वीकारण्याचा प्रात्यक्षिक विषय आहे.आपण दरवर्षी शेतात वेगवेगळ्या पिकांची लागवड करतो. त्यामध्ये काही नवीन पद्धतींचा अवलंब करतो. काही प्रयोग यशस्वी होतात, तर काही अपेक्षित परिणाम देत नाहीत. काही नवीन बदलांमुळे उत्पादनात सुधारणा दिसून येते, तर काही ठिकाणी पूर्वीच्या चुका पुन्हा घडतात.

मात्र, प्रत्येक हंगाम आपल्याला काहीतरी नवीन शिकवून जातो. मागील हंगामात आपण काय चांगले केले, कुठे चुका झाल्या, कोणत्या गोष्टी बदलायला हव्या होत्या आणि पुढील हंगामात कोणते नवीन प्रयोग करता येतील, याचा विचार करणे गरजेचे आहे.शेतीत बदल हा पर्याय नाही, तर काळाची गरज आहे.

निसर्ग आपल्याला मात देऊ शकतो;पण आपण निसर्गाला आपल्या इच्छेनुसार बदलू शकत नाही. हवामान, पाऊस, तापमान, पाण्याची उपलब्धता आणि बाजारपेठ या अनेक गोष्टी आपल्या नियंत्रणाबाहेर आहेत.एखाद्या पिकाचे हवामानामुळे किंवा अन्य नैसर्गिक कारणांमुळे नुकसान झाले, तर संपूर्ण वर्षाचे आर्थिक गणित बिघडू नये, यासाठी शेतीच्या नियोजनात बदल करणे आवश्यक आहे.

एकाच पिकावर संपूर्ण अवलंबून न राहता पीक विविधीकरण, आंतरपीक पद्धती, पूरक व्यवसाय आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून शेतीची जोखीम कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.लक्षात ठेवा, मागील वर्षी जे यशस्वी झाले ते यावर्षीही यशस्वी होईलच असे नाही. म्हणून जुन्या अनुभवांचा आदर करा; पण नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि प्रयोगांसाठी आपले विचार खुले ठेवा.

शेतीत फक्त पीक बदलून चालणार नाही, तर परिस्थितीनुसार आपली विचारपद्धती, नियोजन आणि शेती करण्याची पद्धतही बदलली पाहिजे.कारण यशस्वी शेतकरी तोच, जो निसर्गाशी संघर्ष करण्याऐवजी निसर्ग समजून घेतो आणि प्रत्येक परिस्थितीतून मार्ग काढण्याची तयारी ठेवतो!

एक वाचक

खरंच हास्यास्पद आहे हे सगळं!

सत्तेत बसून ED आणि CBI सारख्या तपास यंत्रणांचा वापर राजकीय सोयीसाठी होत असल्याचे आरोप होतात, न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेवर प्रश्न उपस्थित होतात,पक्ष फोडले जातात, निष्ठा आणि विचारसरणी खुंटीला टांगली जाते. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांनाच सत्तेच्या गंगेत स्नान घालून शुद्ध करून घेतले जाते!

कालपर्यंत ज्यांना भ्रष्टाचारी म्हणत होता, आज त्यांनाच मांडीला मांडी लावून सत्तेत बसवायचे. कालपर्यंत ज्यांच्या विरोधात चौकशांची भाषा करायची, आज त्यांच्याच स्वागताला पायघड्या घालायच्या. विचारधारा फक्त भाषणापुरती आणि तत्त्वे फक्त निवडणुकीच्या जाहीरनाम्यापुरती ठेवायची!आणि एवढे सगळे करून पुन्हा लोकशाही संकटात आहे, अशी बोंब ठोकायची!

अहो, लोकशाहीला धोका नेमका कुणापासून आहे,याचा आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. कारण लोकशाही केवळ विरोधकांनी प्रश्न विचारल्याने धोक्यात येत नाही; सत्तेच्या सोयीसाठी संस्थांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले, राजकीय निष्ठांची खुलेआम खरेदी-विक्री झाली आणि विचारसरणीचा बाजार मांडला गेला, तेव्हाही तिच्या पायाला तडे जातात.सत्ता तुमची, यंत्रणा तुमच्या सोयीच्या, पक्षफोडीचे राजकारण तुमचे, तत्त्वांशी तडजोड तुमची आणि लोकशाही धोक्यात असल्याचा कांगावा मात्र दुसऱ्यांच्या नावाने!याला लोकशाहीचे रक्षण म्हणायचे की लोकशाहीच्या नावाने चाललेला राजकीय विनोद?खरंच, यापेक्षा मोठी मस्करी दुसरी कोणती असू शकते?

साभार व्हॉट्स

गुरूवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

आधी पेट्रोलपंपाचे अतिक्रमण हटवा, मगच शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण!

प्रशासनाच्या भूमिकेवर सरोज देशमुख यांचा सवाल, आमरण उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



उमरखेड, दि. ४ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोरील पेट्रोलपंपाच्या कथित अतिक्रमणाचा प्रश्न आता चांगलाच तापला आहे. अतिक्रमणाचा मुद्दा निकाली काढल्याशिवाय पुतळ्याचे अनावरण करू देणार नाही, अशी ठाम भूमिका घेत जिजाऊ ब्रिगेडच्या सरोज देशमुख यांनी १४ नोव्हेंबरपासून पुन्हा आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.

स्थानिक विश्रामगृहात ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. आंदोलनकर्त्यांच्या दाव्यानुसार, २१ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशात पेट्रोलपंपाच्या इंधन टाक्या रस्त्याच्या १२ व १५ मीटर मर्यादित अतिक्रमणात येत असल्याचा उल्लेख करून त्या हटविण्याची प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले होते. २९ जूनच्या पाहणीतही अतिक्रमणाचा पंचनामा झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, १२ ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने टाक्या अतिक्रमणात नसल्याचा नवा अहवाल तयार केल्याचा आरोप करण्यात आला. मग अहवाल बदलला कुणाच्या दबावाखाली? असा थेट सवाल देशमुख यांनी उपस्थित केला. पूर्वी अतिक्रमण असल्याचे नमूद करणाऱ्या विभागाने अचानक वेगळी भूमिका का घेतली? नव्या मोजणीवेळी तक्रारदारांना विश्वासात का घेतले नाही? १६ सप्टेंबरच्या पहाटे झालेल्या पडताळणीत त्यांना सहभागी का करून घेतले नाही? असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले. पेट्रोलपंपाला अभय देण्यासाठी राजकीय दबाव किंवा आर्थिक देवाणघेवाण झाली आहे का, याची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी करावी. तसेच संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. प्रशासनाने सात दिवसांत समाधानकारक कार्यवाही न केल्यास गावागावांत जनजागृती करून आंदोलन तीव्र केले जाईल, असा इशाराही देण्यात आला. शिवरायांच्या स्मारकाचा सन्मान राखायचा असेल, तर आधी अतिक्रमणाचा प्रश्न सोडवा आणि त्यानंतरच अनावरण करा, अशी ठाम भूमिका सरोज देशमुख यांनी मांडली. पत्रकार परिषदेला ललिता खंदारे, दिनेश रावते, स्वप्निल कनवाळे यांच्यासह शिवप्रेमी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सायबर गुन्ह्यांच्या जाळ्यापासून विद्यार्थ्यांनी सावध राहावे!

ओटीपी, अनोळखी लिंक आणि ऑनलाइन प्रलोभनांपासून दूर राहण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. ४ : डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे जाळे विस्तारत असताना विद्यार्थीही ऑनलाइन फसवणुकीचे लक्ष्य ठरत आहेत. सोशल मीडियाचा वाढता वापर, अनोळखी लिंक, बनावट फोन कॉल आणि आर्थिक प्रलोभनांच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीपासून विद्यार्थ्यांनी वेळीच सावध राहावे, असे आवाहन महागावचे पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी केले.

पोलीस स्टेशन महागावच्या वतीने ३ नोव्हेंबर रोजी श्री. मनोहरराव नाईक महाविद्यालय, गुंज आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गुंज येथे विद्यार्थी सुरक्षा व सायबर सुरक्षेवर मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक वानखडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय समजावून सांगितले. ऑनलाइन आर्थिक फसवणूक, बनावट प्रोफाइल, सोशल मीडिया अकाउंटचा गैरवापर, ओटीपीची मागणी आणि संशयास्पद लिंकच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक केली जाते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ओटीपी, पासवर्ड, बँक खात्याची माहिती अथवा वैयक्तिक तपशील अनोळखी व्यक्तींना देऊ नये. आकर्षक ऑनलाइन प्रलोभनांना बळी पडू नये, असा इशाराही त्यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक सुरक्षिततेवर भर देताना अनोळखी व्यक्तींपासून सावध राहण्याचे आणि अडचणीच्या प्रसंगी तातडीने मदत मागण्याचे आवाहन करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२ या पोलीस हेल्पलाइनचा वापर करण्याची माहितीही देण्यात आली. केवळ डिजिटल सुरक्षिततेतच नव्हे, तर शिक्षण, शिस्त, मेहनत आणि निश्चित ध्येयाच्या जोरावर उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेशही वानखडे यांनी विद्यार्थ्यांना दिला. ऑनलाइन जगात निष्काळजीपणाची एक चूक आर्थिक आणि वैयक्तिक नुकसान घडवू शकते. त्यामुळे सायबर सुरक्षितता ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून प्रत्येक विद्यार्थ्याची गरज आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

थोडक्यात


पशु चिकित्सालयाचा कारभार एकाच डॉक्टरच्या खांद्यावर!

दोन वर्षांपासून पदे रिक्त,पशुपालकांची गैरसोय,प्रशासन व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

मुकुटबन : मुकुटबन येथील श्रेणी-१ पशु चिकित्सालयात मागील दोन वर्षांपासून कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने संपूर्ण दवाखान्याचा कारभार एका वैद्यकीय अधिकाऱ्याच्या भरवशावर सुरू आहे. उपचारांपासून ते दवाखान्यातील दैनंदिन कामकाजापर्यंतची जबाबदारी एकाच डॉक्टरवर पडत असल्याने पशुपालकांची गैरसोय होत आहे. रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी परिसरातील पशुपालकांनी केली आहे. या पशु चिकित्सालयांतर्गत मुकुटबन, सावळी, मेंडाळा, मांगली, राजूर, हिरापूर, जुने व नवीन, रुईकोट, पिंपरडवाडी, बैलमपूर आणि पिंपरड अशा गावांचा समावेश आहे. या परिसरातील जनावरांचे लसीकरण, तपासणी आणि उपचारांची जबाबदारी या केंद्रावर आहे. सध्या वैद्यकीय अधिकारी म्हणून आनंद जेऊघाले कार्यरत असून त्यांच्याकडे पाटण पशु चिकित्सालयाचाही अतिरिक्त प्रभार आहे. दरम्यान, पशुधन पर्यवेक्षक, ड्रेसर आणि शिपाई ही पदे रिक्त असून परिचाराचे पदही भरलेले नाही. त्यामुळे मर्यादित मनुष्यबळात संपूर्ण यंत्रणा चालविण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे, रिक्त पदांबाबत वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित आमदारांना कळवूनही अद्याप नियुक्त्या झालेल्या नाहीत. जनावरांच्या आरोग्याची जबाबदारी केवळ एका डॉक्टरच्या खांद्यावर टाकून प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे? रिक्त पदे तातडीने भरून पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

मलंग शहा बाबा यांची संदल मिरवणूक उत्साहात संपन्न.

बाभुळगाव : तालुक्यातील कोपरा जानकर येथे मलंग शहा बाबा यांची



संदल मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. या मिरवणुकीत परिसरातील सर्व धर्मीय समाज बांधव सहभागी झाले होते.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मलंग शहा बाबा यांची संदल मिरवणूक मोबीन अली कोपरेकर यांच्या निवास स्थानावरून काढण्यात आली. सायंकाळी निघालेली ही संदल मिरवणूक गावातील प्रमुख मार्गाने फिरून मलंग शहा बाबा यांच्या दर्जेवर पोहचली. या वेळी मोबिन अली यांनी झेंडा फडकविला त्या नंतर दर्गेवर फुलांच्या व कापडी चादरी चढविण्यात आल्या. रात्री आयोजित केलेल्या महाप्रसादाचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला.

जिल्हा नियोजन समितीवर पिदूरकर यांची वर्णी

वणी : महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाकडून यवतमाळ जिल्हा



नियोजन समितीवर विजय पिदूरकर यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून नियूक्ती करण्यात आली, या नियूक्तीमूळे जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध विषयावर भूमिका मांढण्याची आणि स्थानिक प्रश्नांना नियोजनाच्या व्यासपिठावर स्थान मिळवून देण्याची जवाबदारी त्यांच्यावर आली आहे. जिल्हा नियोजन समिती ही जिल्ह्यातील विकासकामाची दिशा निश्चित करणारी महत्वाची यंत्रणा मानली जाते,विविध भागातील मूलभूत सूविधा,पायाभूत विकास,सार्वजनिक हितांची कामे तसेच स्थानिक पातळीवरील प्राधांन्यक्रम ठरवण्याची प्रक्रियेत या समितीची भूमिका महत्वाची असते,त्यामूळे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयभाऊ पिदूरकर यांची नियूक्ती ही केवळ पदाची जवाबदारी नसून जिल्ह्यात विकास प्रक्रियेत योगदान देण्याची संधी ढरणार आहे,या नियूक्तीबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत असून पूढील वाढचालीस शूभेच्छा दिल्या जात आहेत,

घराच्या बाथरूममध्ये ठेवलेला क्विंटलभर कापूस लंपास.!

शेतकऱ्याला १० हजारांचा फटका..

महागाव : महागाव तालुक्यातील डोंगरगाव येथे चोरट्यांनी आता घराच्या आवारातील बाथरूमलाही लक्ष्य केल्याची घटना समोर आली आहे. घरात सुरक्षित ठेवलेला तब्बल एक क्विंटल कापूस अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने शेतकऱ्याचे सुमारे १० हजार रुपयांचे नुकसान झाले. ऐन कापूस हंगामात घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. डोंगरगाव येथील सय्यद मुसवीर सय्यद जमील यांनी सुनील माणिकराव कदम यांचे अडीच एकर शेत मक्त्याने घेतले होते. या शेतातील कापूस वेचून घराच्या आवारातील बाथरूममध्ये ठेवण्यात आला होता. १ नोव्हेंबरच्या रात्री कुटुंबीय झोपल्यानंतर चोरट्याने संधी साधली. २ नोव्हेंबर रोजी पहाटे पाचच्या सुमारास काळा शर्ट व निळी पँट घातलेला इसम घराच्या भिंतीवरून उडी मारून पळताना दिसल्याची माहिती सय्यद मोहसीन यांनी दिली. त्यानंतर पाहणी केली असता बाथरूम मधील कापूस गायब असल्याचे उघड झाले. घटनेची माहिती मिळताच पोफाळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार निलेश शेंबडे यांनी घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरुवात केली.

दिवाळीच्या नावाखाली खासगी ट्रॅव्हल्स तर्फे प्रवाशांची लूट..! आरटीओचा कानाडोळा कशासाठी?

दुप्पट-तिप्पट भाडेवाढीसह कालबाह्य वाहनांचाही रस्त्यांवर सुळसुळाट..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. ४ : दिवाळी सणासाठी गावी परतणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून पुसदसह प्रमुख मार्गांवर दुप्पट-तिप्पट भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

आधीच रोजगारासाठी स्थलांतर करणारे मजूर, विद्यार्थी आणि नोकरदार आर्थिक अडचणीत असताना प्रवासाच्या नावाखाली त्यांची अतिरिक्त आर्थिक पिळवणूक होत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे. या मनमानी भाडेवाढीकडे उपप्रादेशिक परिवहन विभागाचे लक्ष आहे की नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. पुसद-पुणे, पुसद-मुंबई, पुसद-नागपूर, पुसद-छत्रपती संभाजीनगर आणि यवतमाळ मार्गांवर प्रवाशांकडून अवाजवी भाडे वसूल केले जात असल्याचा आरोप आहे. सणासुदीच्या गर्दीचा गैरफायदा घेणाऱ्या ट्रॅव्हल्स चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरटीओने भाडेदराची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. केवळ भाडेवाढीचाच नव्हे, तर प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न गंभीर बनला आहे. काही खासगी ट्रॅव्हल्सची मुदत संपलेली असतानाही त्या रस्त्यावर धावत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, रोड टॅक्स, पीयूसी, विमा आणि प्रत्यक्ष वाहनस्थिती यांची काटेकोर तपासणी करण्याची गरज आहे. यापूर्वी खासगी बसला आग लागून प्रवाशांचे जीव गेल्याच्या घटनांनी सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. दिवाळीच्या गर्दीत प्रवाशांची आर्थिक लूट आणि त्यांच्या जीवाशी खेळ सुरू असताना प्रशासन अपघाताची वाट पाहणार का? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. तातडीने विशेष तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

गावांतून अवैध ओव्हरलोड ट्रक-टिप्परची वाहतूक जोमात..!

बायपाससाठी ग्रामस्थ आक्रमक,अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी, दि. ४ : अडेगाव ते खडकी मार्गावरील गावांच्या मध्यवस्तीतून सुरू असलेल्या अवैध आणि ओव्हरलोड ट्रक-टिप्परच्या वाहतुकीने ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या अवजड वाहनांमुळे अपघाताची टांगती तलवार निर्माण झाली असून, शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांचा जीव धोक्यात आला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) यांच्यासह संबंधित विभागांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. गावाच्या मध्यवस्तीतून अवजड वाहनांची वाहतूक तातडीने बंद करून गावाबाहेर स्वतंत्र बायपास रस्ता तयार करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे. ओव्हरलोड वाहनांची तपासणी, वाहनांच्या परवानग्यांची चौकशी आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. विशेषतः शाळा परिसरात वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी करावी, असे निवेदनात नमूद आहे. गावातील रस्ते नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आहेत की अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. ग्रामस्थांच्या तक्रारीनंतरही प्रशासनाने ठोस पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. आता प्रशासन केवळ कागदी आश्वासन देणार की अपघातापूर्वीच वाहतुकीवर नियंत्रण आणणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळाचे संकट टाळायचे असेल, तर ज्वारीकडे वळा..!

कुपटी कृषी महाविद्यालयात डॉ. विजयराव माने यांचे मार्गदर्शन.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



उमरखेड, दि. ४ : यंदाच्या दुष्काळी परिस्थितीने शेतीसमोरील पाण्याचे संकट अधोरेखित केले असताना, भविष्यातील संकट टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत बदल करण्याची गरज आहे. उपलब्ध पाण्याचा विचार करून कमी पाण्यात येणाऱ्या ज्वारी पिकाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन डॉ. विजयराव माने यांनी केले. ३१ ऑक्टोबर रोजी कुपटी येथील कृषी महाविद्यालयात आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्वारी हे केवळ पारंपरिक पीक नसून आरोग्य, पशुखाद्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. दुष्काळात पाण्याचा अपव्यय परवडणारा नाही. शेतातील उताराच्या भागात दगडांनी भरलेले खड्डे तयार करून पावसाचे पाणी जमिनीत मुरवावे. संकट ओढवल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आताच जलसंधारण करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नामदेवराव देवकते होते. विविध मान्यवरांची उपस्थिती होती. संचालन सुनील वानखेडे यांनी केले, तर आभार प्राचार्य चिंतले यांनी मानले.

३१.५८ कोटींची मदत मंजूर,४१ हजार शेतकऱ्यांच्या पदरी दिलासा!

पीक नुकसानीपोटी ३० कोटी, मात्र प्रत्यक्ष खात्यात रक्कम जमा होण्याची प्रतीक्षा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ४ : जून ते ऑगस्ट २०२६ दरम्यान अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील ४१ हजार ६२० शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने ३१.५८ कोटी रुपयांची मदत मंजूर केली आहे. यामध्ये पीक नुकसानीसाठी ३०.०२ कोटी, तर शेतजमिनीच्या नुकसानीसाठी १.५६ कोटी रुपयांचा समावेश आहे.

याबाबत २ नोव्हेंबर रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला. अमरावती विभागातील चार जिल्ह्यांसाठी एकूण २०१ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. मात्र, निधी मंजूर होणे आणि तो प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणे यात फरक आहे. त्यामुळे मदत वितरणात विलंब होणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घेणे आवश्यक आहे. शासनाने मदत थेट बँक खात्यात जमा करण्याचे निर्देश दिले असून, निधी मंजूर होताच तो शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. मात्र, केवळ निधी मंजूर झाल्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. अनेक ठिकाणी पंचनामे चुकीचे झाल्याच्या तक्रारी आहेत. अनेक शेतकऱ्यांचे नुकसान ५० टक्क्यांपेक्षा जास्त असूनही त्यांना कमी मदत मिळाल्याचे समोर आले आहे. अनेक शेतकऱ्यांचे पंचनामे अद्याप झालेले नाहीत. त्यामुळे मदतीपासून अनेक शेतकरी वंचित राहण्याची शक्यता आहे. शासनाने मदत वाटपाची प्रक्रिया पारदर्शक आणि जलद करावी, अशी मागणी शेतकरी संघटनांनी केली आहे.

१,४४० डॉक्टरांची नियुक्ती,ग्रामीण आरोग्यसेवेला मिळणार बळ!

६७४ विशेषज्ञांसह ७६६ एमबीबीएस डॉक्टरांचा समावेश.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ४ : ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्यसेवेचा प्रश्न ऐरणीवर असताना राज्य शासनाने १ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ६७४ विशेषज्ञ डॉक्टर आणि ७६६ एमबीबीएस डॉक्टरांचा समावेश आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आज नियुक्ती आदेश वितरणाचा विशेष समारंभ आयोजित करण्यात आला.

राज्यातील वैद्यकीय अधिकारी संवर्गातील २ हजार ५१४ पदांपैकी १ हजार ४४० पदांसाठी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या नियुक्त्यांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण, उपजिल्हा आणि जिल्हा रुग्णालयांमधील मनुष्यबळाची कमतरता कमी होण्याची अपेक्षा आहे. विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास ग्रामीण रुग्णांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज कमी होऊ शकते. मात्र, केवळ नियुक्ती आदेश देऊन प्रश्न सुटणार नाही. प्रत्यक्ष दुर्गम भागात डॉक्टर रुजू होणे, नियमित उपस्थिती राखणे आणि आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. नियुक्त डॉक्टरांनी रुग्णकेंद्रित सेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. आता या नियुक्त्यांचे प्रत्यक्ष आरोग्यसेवेत किती प्रतिबिंब उमटते, याकडे ग्रामीण जनतेचे लक्ष लागले आहे.

बालसुरक्षेचे धडे शाळेतच,पॉक्सो कायद्याबाबत विद्यार्थ्यांना जागरूकतेचे बळ!

'नो-गो-टेल' मंत्रातून अनुचित प्रकारांना विरोध करण्याचा आत्मविश्वास.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि. ४ : बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी केवळ कायद्याची भीती पुरेशी नाही, तर बालकांमध्ये स्वतःच्या हक्कांची आणि सुरक्षिततेची जाणीव निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने केशरबाई चाहल स्मृती प्रतिष्ठानद्वारा संचलित श्री शारदा ज्ञानपीठ शाळेत सुरक्षित बचपन अभियानांतर्गत पॉक्सो कायदा २०१२ विषयी जागृती मोहीम राबविण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. रामकृष्ण पाटील होते. विशेष सरकारी वकील गुप्ता, एपीआय खंदारे, गहुकार मॅडम, ॲड. मसादे,ॲड. गोपाल मोहुर्ले, गटशिक्षणाधिकारी राजू मेश्राम यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना सुरक्षित व असुरक्षित स्पर्श, बालकांचे कायदेशीर अधिकार आणि अत्याचाराच्या घटनांविरोधात तक्रार करण्याच्या प्रक्रियेची माहिती देण्यात आली. एपीआय खंदारे यांनी एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया व पॉक्सो कायद्यातील तरतुदी स्पष्ट केल्या. ॲड. मसादे यांनी कायद्याचे महत्त्व विशद केले, तर ॲड. मोहुर्ले यांनी उदाहरणांद्वारे बालगुन्ह्यांचे गांभीर्य पटवून दिले. विशेष सरकारी वकील गुप्ता यांनी 'NO-GO-TELL' हा सुरक्षा मंत्र देत अनुचित प्रसंगात ठाम नकार द्या, तेथून दूर व्हा आणि विश्वासू व्यक्तीला तातडीने सांगा,असा संदेश दिला. बालसुरक्षा ही केवळ कायद्याची नव्हे, तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

पिण्याच्या पाण्यावर डल्ला,पंप जप्तीनंतरही उपशावर आळा बसणार का?

नगर परिषदेकडून मोटारपंप जप्त, उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाईचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि. ४ : पांढरकवडा शहरात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यावरच काहींकडून डल्ला मारला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे.

शहराच्या पाणीपुरवठ्याचा मुख्य आधार असलेल्या पिंपरी बंधाऱ्यातील पाणी पिण्यासाठी राखीव असतानाही अवैधरीत्या उपसा सुरू असल्याचे आढळल्याने नगर परिषद प्रशासनाने संबंधित शेतकऱ्याचा मोटारपंप जप्त केला. मात्र, केवळ पंप जप्तीने पाण्याची चोरी थांबणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाच्या निर्देशानुसार बंधाऱ्यातील पाणीसाठा बिगर सिंचन अर्थात पिण्याच्या वापरासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. याबाबत नगर परिषद प्रशासनाने यापूर्वीच शेतकऱ्यांना नोटिसा बजावून मोटारपंप न लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. तरीही मौजा सायखेडा, पिंपरी रोड परिसरात एका शेतकऱ्याकडून मोटारपपाद्वारे पाण्याचा उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले. मुख्याधिकारी पंकज गावंडे यांच्या आदेशानुसार पाणीपुरवठा विभागाच्या कल्याणी सोळंके, मोहन उयलवार, हंसराज चौधरी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन मोटारपंप जप्त केला. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असताना राखीव साठ्यावर होणारा अवैध उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने नियमित गस्त आणि कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा इशाराही मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

मेळघाटातील ३०० सिमेंट बंधारे मातीने बुजले!

कोट्यवधींचा निधी खर्च,मात्र पाणीटंचाई कायम
जुन्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची ग्रामस्थांची मागणी

मेळघाट/वार्ताहर

धारणी आणि चिखलदरा या दोन्ही तालुक्यांमध्ये मागील ३० वर्षांत शासनाच्या विविध विभागांमार्फत नदी-नाल्यांवर जवळपास ३०० सिमेंट प्लग व सिमेंट बंधारे बांधण्यात आले. मात्र, देखभाल व दुरुस्तीअभावी यातील बहुतांश बंधारे मातीने भरले असून काही बंधारे तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे जलसंधारणासाठी खर्च झालेल्या निधीचा अपेक्षित लाभ गावकऱ्यांना मिळत नसल्याचे चित्र आहे.

कृषी विभाग, ग्रामपंचायत, तालुका कृषी विभाग आणि जिल्हा परिषद पाटबंधारे विभागामार्फत ही कामे करण्यात आली. याशिवाय खासदार व आमदार निधीतूनही अनेक ठिकाणी बंधारे उभारण्यात आले. मात्र, बांधकामानंतर नियमित गाळ काढणे, स्वच्छता व दुरुस्ती करण्याकडे संबंधित विभागांनी दुर्लक्ष केल्याने अनेक बंधारे निरुपयोगी ठरत आहेत.

दरवर्षी जलसंधारणासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात असतानाही मेळघाटातील गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. वेळोवेळी बंधाऱ्यांमधील गाळ काढून दुरुस्ती केली असती, तर पावसाचे पाणी साठवून त्याचा उपयोग गावांना झाला असता.

यंदाही धारणी व चिखलदरा तालुक्यांतील अनेक गावांमध्ये पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे



नवीन बंधारे बांधण्याऐवजी अस्तित्वात असलेल्या बंधाऱ्यांचे सर्वेक्षण करून गाळ काढणे, तुटलेल्या भागांची दुरुस्ती करणे आणि नियमित देखभालीसाठी संबंधित विभागांना शासनाने आदेश द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

९ नोव्हेंबरला विभागीय लोकशाही दिन

अमरावती/का.प्र.

विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे, असे अपर आयुक्त संजय जाधव यांनी कळविले आहे.

विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail.com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

मनपाची थकबाकीदार मालमत्तांवर कारवाई

अमरावती/का.प्र.

अमरावती महानगरपालिकेच्या पूर्व झोन क्रमांक ३, दस्तूरनगर विभागामार्फत मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी धडक कारवाई करण्यात आली. थकीत मालमत्ता कराचा भरणा न केल्यामुळे मनपा प्रशासनाने जप्तीनाम्यानुसार तीन मालमत्ता सील केल्या आहेत.

मनपाच्या वॉर्ड C८ मधील एमआयडीसी औद्योगिक परिसरातील मालमत्ता क्रमांक १९५८, त्रिमूर्ती ऑइल इंडस्ट्रीज यांच्याकडे ४ लाख



२१ हजार ९४५ रुपये, तर मालमत्ता क्रमांक १९५९, शिव दाल ऑइल इंडस्ट्रीज यांच्याकडे २ लाख ३१ हजार ८०१ रुपये मालमत्ता कर थकीत होता. त्यामुळे या दोन्ही मालमत्ता सील करण्यात आल्या.तसेच वॉर्ड C१ मधील त्रिवेणी कॉलनी येथील मालमत्ता क्रमांक ३११६, अमरावती जिल्हा दूध उत्पादक सहकारी संस्था यांच्याकडे १ लाख १ हजार ३२३ रुपये थकबाकी असल्याने संबंधित मालमत्ताही सील करण्यात आली.या तिन्ही मालमत्तांकडे एकूण ७ लाख ५५ हजार ०६९ रुपये मालमत्ता कर थकीत होता.

ही कारवाई झोन क्रमांक ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी प्रवीण ठाकरे, दीपक सरसे, श्रीकृष्ण ढगे, आकाश चौधरी, तसेच वसुली लिपिक विनोद स्वर्गी आणि महबूब मांजरे, सिद्धांत गाडे उपस्थित होते.महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांनी तातडीने कराचा भरणा करावा, अन्यथा नियमानुसार जप्ती व सील करण्याची कारवाई करण्यात येईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

आ. प्रविण पाटील यांचा वाढदिवशी दुष्काळग्रस्तांना मदतीचा संकल्प

सामूहिक विवाह सोहळ्यातून शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना देणार आधार

अमरावती/का.प्र.

राज्यातील शेतकरी बांधव पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत आमदार प्रविण पोटे पाटील यांनी यंदाचा वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून हा निधी दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजूर कुटुंबांच्या मदतीसाठी वापरण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.



येत्या ६ नोव्हेंबर रोजी आमदार प्रविण पोटे पाटील यांचा वाढदिवस असून, यानिमित्त कोणतेही भव्य कार्यक्रम, फ्लेक्स, बॅनर किंवा जाहिराती न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढदिवशी सर्व हितचिंतक, आप्तेष्ट, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी अमरावती येथील कॅम्प रोडवरील जनसंपर्क कार्यालयात येऊन केवळ सदिच्छा भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून तो निधी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करावा, तसेच दुष्काळग्रस्त शेतकरी आणि शेतमजूर बांधवांना विविध माध्यमांतून मदत करावी, असे आवाहन आमदार पोटे पाटील यांनी केले आहे.

याशिवाय स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे पाटील ट्रस्ट च्या वतीने आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी व शेतमजूर कुटुंबांतील विवाहयोग्य मुला-मुलींसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करून त्यांना मदतीचा हात देण्याचाही निर्धार त्यांनी केला असून आनंदाचा क्षण केवळ वैयक्तिक उत्सवापुरता मर्यादित न ठेवता गरजूंच्या जीवनात आधार निर्माण करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्यांनी पुष्पगुच्छ, किंवा फ्लेक्स जाहिरातींवर खर्च करण्याऐवजी सामाजिक कार्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मराठी भाषा विद्यापीठात दीपोत्सव

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

अमरावती/का.प्र.

मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे आयोजित दीपोत्सवाचा कार्यक्रम विविध सांस्कृतिक उपक्रमांनी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर होते, तर अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



विद्यार्थ्यांमधील कला, कौशल्य, सर्जनशीलता आणि सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी छाया वाईदेशकर हिच्या सुरेल स्वागतगीताने झाली. यानिमित्त रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, नाटक स्पर्धा आणि आनंद मेळावा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.गीतगायन स्पर्धेत मयुरी देशमुख, विद्या इलरकार, अंकिता देशमुख, सुकेशनी निमगडे, दिनेश गोहत्रे, सुजाता मेश्राम, रोशनी वानखडे तसेच प्रा. अजय पाटील यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित राहून विविध कलांचे सादरीकरण केले. रांगोळी आणि मेहंदीच्या आकर्षक कलाकृतींसह गायन, नृत्य व नाटकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची झलक दाखविली. आनंद मेळाव्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे विशेष कौतुक केले.अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी आपल्या मनोगतात दीपोत्सव हा केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा उत्सव नसून आनंद, सर्जनशीलता, एकोपा आणि सकारात्मकतेचा उत्सव असल्याचे अधोरेखित केले.दीपोत्सवाचे औचित्य साधून विद्यापीठ परिवाराच्या वतीने उपस्थित सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिवाळी भेटवस्तू देण्यात आल्या. या उपक्रमातून विद्यापीठ परिवारातील आपुलकी, स्नेहभाव आणि एकोपा अधोरेखित झाला.संचालन प्रा. सुशील वानखडे आभार प्रदर्शन आखरेयांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

जोधपूरला झाली अ.भा. कृषक परिषदेची बैठक

नद्या जोडणी प्रकल्पाला शासनाने प्राधान्य देणे गरजेचे-डॉ. वसंत लुंगे



अमरावती/का.प्र.

राष्ट्रीय भारत कृषक समाजाची ७० वी बैठक नुकतीच राजस्थानमधील जोधपूर येथे संपन्न झाली. देशभरातून आलेल्या कृषक परिषदेच्या सदस्यांनी आणि शेतकरी प्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा केली. तसेच या समस्या व मागण्या केंद्र सरकारसमोर मांडण्यासाठी आणि सरकारशी चर्चा करण्यासाठी शिफारशींचा मसुदा तयार केला.

कोरड्या दुष्काळामुळे देशभरात दर महिन्याला ७०० ते ८०० शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात दर महिन्याला सुमारे ३५० शेतकरी आत्महत्या होत असून, ही संख्या दिवसाला १० ते ११ इतकी आहे. केंद्र व राज्य शासनाने नदीजोड प्रकल्प प्राधान्याने हाती घेतल्यास कोरड्या दुष्काळावर मात करता येईल आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास मदत होईल, असे प्रतिपादन भारत कृषक समाज, महाराष्ट्र राज्याचे संघटक डॉ. वसंत लुंगे यांनी केले.बैठकीच्या अध्यक्षस्थानी भारत कृषक समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजयवीर जाखड होते. बैठकीला देशातील विविध राज्यांतील शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुरलीधर पाटील (नाशिक), रविंद्र पाटील (कोल्हापूर), धुलीराम शेंडे (भंडारा), श्री शिंदे (लातूर), संजय मराठे (जळगाव), बाळासाहेब मराठे (जळगाव) आणि मुकुंद लोंदासे (नागपूर) आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

ट्रान्सपोर्ट नगरलगतच्या कब्रस्तानातील मृत्यू नोंदींसाठी संस्था नियुक्त करणार!

नगरसेविका ललिता सुरेश रतावा यांचा प्रस्ताव

अमरावती/का.प्र.

वलगाव रोडवरील ट्रान्सपोर्ट नगरला लागून असलेल्या कब्रस्तानात दफनविधी करण्यात आलेल्या मृत व्यक्तींची अधिकृत नोंद घेऊन महानगरपालिकेमार्फत मृत्यूचा दाखला देण्याच्या प्रक्रियेसंदर्भात अमरावती महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला आहे.

१२ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत विषय क्रमांक ६९ अंतर्गत हा विषय मांडण्यात आला होता. नगरसेविका सौ. ललिता सुरेश रतावा यांनी यासंदर्भातील प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला नगरसेवक श्री. प्रशांत महल्ले आणि नगरसेविका अस्मा फिरोजखान यांनी अनुमोदन दिले.वलगाव रोडवरील ट्रान्सपोर्ट नगरला लागून असलेल्या कब्रस्तानात दफनविधी झालेल्या मृत व्यक्तींची नोंद घेऊन महानगरपालिकेकडून मृत्यूचा दाखला देण्याची परवानगी देण्याबाबत या प्रस्तावात मागणी करण्यात आली होती.या प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर सभेने सर्वानुमते असे ठरविले की, स्मशानभूमी येथील मृत्यूच्या नोंदी घेण्याकरिता संस्था नियुक्त करण्याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

आनंदाचे डोही आनंद तरंग- प्राचार्य अनिल प्रांजळे

'कॉफी विथ कौन्सिलर'अंतर्गत उपक्रम

अमरावती/का.प्र.

'आनंदाचे डोही आनंद तरंग' अर्थात आपला माईंड सेट आपण कसा तयार करतो, दैनंदिन जीवनातील आव्हाने कशी स्वीकारतो, निर्माण होणाऱ्या संकटांचा कसा सामना करतो, आपले हितसंबंध जोपासताना कोणती कौशल्य वापरावी, दैनंदिन ताणतणाव कसा कमी करता येईल, या सर्व पैलूंवर अतिशय सोप्या भाषेत सकारात्मकतेचे मानसशास्त्र मानले स्वतःचे आत्मनिरीक्षण करणे इतरांप्रती संवेदना दाखवणे स्वतःचा आत्म विष्कार करण्यासाठी काय करता येईल? याबाबतचे सखोल मार्गदर्शन प्राचार्य अनिल प्रांजळे यांनी



पहिल्या व्याख्यानात केले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आनंदाने जगणे दुरापास्त होत आहे. सुदृढ आरोग्य असेल, मानसिक स्वास्थ्य असेल, तरच आपण आनंदाने जगू शकतो जगण्यातील आनंद अधिक बुद्धीगत कसा करावा यासाठी युनिक कौन्सिलिंग सेंटर अमरावतीच्या वतीने डॉ. सुरेश राहाटे हे दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी कॉफी विथ कौन्सिलर हा उपक्रम आयोजित करीत असतात. दैनंदिन जीवनातील आव्हाने दडपणे दूर करून सर्वांना सुखी व आनंदमय जीवन कसे जगता येईल जीवनात येणाऱ्या मनोसामाजिक, मानसिक, आरोग्य विषयक समस्यांवर कशी मात करता येईल, ताण तणाव कसा कमी करता येईल ,यासाठी हे समुपदेशन केंद्र कार्य करते. कार्यक्रमाचे संचालन अनिकेत अर्मळ यांनी तर आभार प्रदर्शन ॲड सुरेंद्र गावंडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ साहित्यिक सुनील यावलीकर, आमले,आकाशवाणी अमरावती प्राचार्य बबन राऊत,समुपदेशक पाटणकर, मुख्याध्यापिका डॉक्टर पातकर ,वंदना रहाटे,खाडे व इतर गणमान्य नागरिक यांनी सक्रिय सहभाग घेतला.

संक्षिप्त

ज्युदो स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अमरावती-स्वर्णिम गुजरात स्पोर्टस् युनिव्हर्सिटी, देसार, वडोदरा येथे २१ ते २२ नोव्हेंबर, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ ज्युदो (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची प्राची जेधे, बी.बी. आर्टस्, एन.बी. कॉमर्स ॲन्ड बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रसची कु. वैष्णवी मुधोळकर व अश्विनी जाधव, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची दिपाली डोंगरे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची जस्मित कौर राहल, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावतीची श्रृतिका गवई व चांदणी कुमारी हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. १२ ते १८ नोव्हेंबर, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे.

विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल येथे पालकसभा



लेहेगाव-विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल, नेरपिंगळाई येथे पालक सभा आणि वर्ग १ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा प्रथम सत्र परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.या कार्यक्रमामध्ये पालकांच्या शाळेसंबंधित समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यात आले आणि गुणवंत विद्यार्थ्यांची नावे जाहीर करण्यात आली तसेच पालकांना विद्यार्थ्यांनी सोडवलेले पेपर दाखवण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राहुल मंगळे तर विशेष अतिथींचे स्थान शाळेच्या संचालिका सोनाली नवले यांनी स्वीकारले. पालक प्रतिनिधी म्हणून प्रवीण चौधरी,प्रीती सावरकर, मोहन बहुरूपी,मुर्तुजा शेख उपस्थित होते.संचालन शाळेचे मुख्याध्यक्ष सिद्धांत दाभेकर यांनी तर आभार प्रदर्शन राधिका जोशी यांनी केले.कार्यक्रमाला शाळेच्या सर्व शिक्षिका प्रतिक्षा कोहळे,मयुरी बुरंगे,सायली इंगळे,पल्लवी तायडे,प्रतिक्षा यावले,प्रिया झोडगे,समिक्षा बेहरे,गायत्री राऊत, निकिता संभे,रोशनी भालेराव,सविता होले,बुशरा शेख,शितल काकस, शिक्षकेत्तर कर्मचारी सुवर्णा पातुरकर आणि शिला उपरीकर उपस्थित होत्या.पालकांच्या व शिक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामध्ये हा कार्यक्रम पडला.

'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथाचा समारोपीय कार्यक्रम



खल्लार-दर्यापूर येथिल रमाबाई आंबेडकर नगर, येथे न्यू भिमज्योत मंडळाच्या वतीने आयोजित 'बुद्ध आणि त्यांचा धम्म'या पवित्र ग्रंथाचा समारोपीय कार्यक्रमा मोठ्या उत्साहात पार पडला.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून इंजि. नितेश वानखडे, महाराष्ट्र प्रदेश महासचिव, युवक काँग्रेस उपस्थित होते.यावेळी पूज्य भन्ते जी यांचे आशीर्वाद लाभले. दर्यापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष पप्पू पाटील होले, अमरावती जिल्हा ग्रामिणचे सचिव आतिष शिरभाते, मिलिंद वानखडे, सुनिल इंगळे अनिल इंगळे,गौरव गेठे, राहुल शामस्कार, रोशन इंगळे. निखिल रायबोले. सोहम चक्रनारायण. प्रेमदीप आठवले चंदन गेठे राज इंगळे जगदीश कांबे व धम्म उपासक उपासिका उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आयोजन न्यू भिमज्योत मंडळाने यशस्वीपणे केले होते.

धामोरी विद्यालयात सेवानिवृत्तीपर सत्कार



अमरावती/का.प्र

धामोरी येथील धामोरी विद्यालयात नियमित मुख्याध्यापक एस. एम. ठाकरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त भावपूर्ण निरोप समारंभ, तर नवनियुक्त मुख्याध्यापक एन. जी. डहाके यांच्या स्वागताचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संस्था, विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात ठाकरे सरांनी विद्यालयाची जबाबदारी अत्यंत निष्ठेने, तन-मन-धनाने पार पाडली. 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रम, शिष्यवृत्ती परीक्षा, माजी विद्यार्थी मेळावे, परसबाग, SQAAF यांसारख्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यालयाला विद्यालयाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.यावेळी ठाकरे, पाकधणे कुटुंबीय, संस्थेचे प्रतिनिधी, कुरळ पूर्णा विद्यालयाचे मुख्याध्यापक, नवनियुक्त मुख्याध्यापक एन. जी. डहाके, इंगळे, रवी चव्हाण, वाठ, गायधणे, कणकदंडे, शिक्षकेतर कर्मचारीअरबट, कावरे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.संचालन व आभारप्रदर्शन चव्हाण यांनी केले. तसेच नवनियुक्त मुख्याध्यापक एन. जी. डहाके यांचे स्वागत करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

पाच हजारांच्या मदतीने शेतकऱ्यांचे अश्रू पुसणार की त्याच्या घामाला योग्य दाम देणार सत्ताधारी आणि विरोधकांनी उत्तर द्यावे

शेतकऱ्यांना भीक नको, हमीभाव द्या!

शेतकरी म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा, पण दुर्दैवाने याच कण्याला वाकविण्याचे काम वर्षानुवर्षे सुरू आहे. शेतकरी शेतात राबतो, घाम गाळतो, कर्ज काढतो, पिकासाठी पैसा ओततो आणि शेवटी बाजारात माल विकायला गेला की त्याच्या कष्टांची किंमत कवडीमोल ठरते. दुसरीकडे त्याच मालाची ग्राहकांना विक्री करताना किंमत वाढते. मग प्रश्न असा पडतो की, शेतकरी आणि ग्राहक यांच्या मधला हा आर्थिक खेळ नेमका कोणाच्या फायद्यासाठी सुरू आहे.

शेतकऱ्याच्या मनाचा मोठेपणा तरी किती सांगावा! तुरीचे पीक शेतात उभे असताना मित्रांना म्हणतो, चला शेतात, पाहिजे तेवढ्या शेंगा तोडा. टमाटरचे भाव पडले तर रस्त्यावर फेकतो किंवा फुकट वाटतो. स्वतःच्या कष्टाने पिकवलेला माल दुसऱ्याला देताना त्याचा हात आखडत नाही. पण हाच शेतकरी आपला माल बाजारात विकायला गेला की त्याला भावासाठी हात पसरावे लागतात. हा विरोधाभास नाही तर आपल्या व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवरचा गंभीर प्रश्न आहे.

राजकारणांच्या भाषणात शेतकरी कुठे?

काँग्रेस असो, भाजप असो, शिवसेना असो किंवा राष्ट्रवादी काँग्रेस असो, प्रत्येक पक्षाच्या भाषणात शेतकरी असतो. निवडणुकीत शेतकऱ्यांच्या नावाने घोषणा होतात. कर्जमाफीची आश्वासने दिली जातात. दुष्काळी पॅकेज जाहीर होतात. पंचनामे होतात. मदतीच्या घोषणा होतात. मात्र शेतमालाला योग्य भाव मिळण्याची वेळ आली की प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबितच राहतो.

सत्ताधारी पक्षाने उत्तर द्यावे की शेतकऱ्याला दरवर्षी मदतीसाठी सरकारी दारात का उभे राहावे लागते, विरोधी पक्षांनीही सांगावे की सत्तेत असताना शेतमालाला हमीभाव देण्याच्या प्रश्नावर नेमके किती ठोस निर्णय घेतले.शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राजकारण करण्यासाठी प्रत्येकाला वेळ आहे. पण शेतकऱ्याच्या उत्पादनाला योग्य किंमत मिळवून देण्यासाठी सर्वपक्षीय एकजूट कधी दिसणार?

वर्धा जिल्ह्यात ११९ कोटींचा मदतीचा हिशेब; मग हमीभावाच्या थोरणाचे काय

यंदा वर्धा जिल्ह्यात दुष्काळाचे सावट आहे. पावसाच्या लहरीपणामुळे पिकांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित उत्पन्न आले नाही. शासनाने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर २ लाख ३८ हजार ६५० खातेदारांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचे नियोजन केले. या आकड्यानुसार सुमारे ११९ कोटी ३२ लाख रुपयांची रक्कम होते.ही मदत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची असली तरी एक प्रश्न अनुत्तरित राहतो. पाच हजार रुपये देऊन शेतकऱ्याचे वर्षभराचे आर्थिक संकट संपणार आहे का? बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, डिझेल आणि मशागतीचा खर्च वाढत असताना शेतमालाचा भाव मात्र शेतकऱ्याच्या हातात नाही.



सरकारने मदत द्यावी, याबद्दल दुमत नाही. पण मदतीच्या घोषणांपेक्षा शेतकऱ्याला स्वतःच्या उत्पादनातून जगण्याची ताकद देणे अधिक आवश्यक नाही का? दुष्काळ पडला की मदत, अतिवृष्टी झाली की मदत, पीक गेले की मदत आणि भाव पडला की पुन्हा मदतीची मागणी. शेतकऱ्याचे आयुष्य केवळ सरकारी मदतीच्या प्रतीक्षेतच संपायचे का?

ग्राहक महागाईवर ओरडतो, शेतकरी भावासाठी ओरडतो; ऐकणार कोण

बाजारात टोमॅटोचे भाव वाढले की ग्राहकांच्या खिशाला झळ बसते. कांदा महागला की सरकारवर टीका होते. भाजीपाला स्वस्त झाला की ग्राहक आनंदी होतो. पण त्याच वेळी शेतकऱ्याच्या उत्पादन खर्चाची वसुली होत आहे का, याचा विचार किती जण करतात?शेतमालाचा भाव वाढला तर ग्राहकाला दिलासा हवा असतो आणि भाव पडला तर शेतकऱ्याला आधार हवा असतो. या दोघांमध्ये संतुलन निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची आहे. बाजारपेठेतील मध्यस्थांची भूमिका, कमिशनची पद्धत आणि शेतमालाच्या अंतिम किमतीतील शेतकऱ्याचा वाटा यावरही पारदर्शक चर्चा झाली पाहिजे.

शेतकरी दयेचा धनी नाही,हक्काचा दावेदार

शेतकऱ्याला अनुदान देऊन त्याची बोळवण करू नका. त्याच्या नावाने राजकीय मेळावे घेऊ नका. त्याच्या बांधावर जाऊन फोटो काढण्यापुरते शेतकरीप्रेम दाखवू नका. त्याच्या उत्पादन खर्चाचा हिशेब करा. त्याला रास्त भाव मिळेल अशी बाजारव्यवस्था निर्माण करा. हमीभावाने खरेदीची प्रभावी यंत्रणा उभी करा. बाजारभाव कोसळल्यास शेतकऱ्याला संरक्षण द्या.

आज शेतकऱ्याला पाच हजारांच्या मदतीपेक्षा आपल्या मालाला योग्य भाव मिळण्याची खात्री हवी आहे. त्याला सरकारच्या दारात हात पसरून उभे राहायचे नाही. त्याला आपल्या कष्टाच्या पैशावर स्वाभिमानाने जगायचे आहे.आता राजकीय पक्षांनी एक गोष्ट स्पष्ट करावी. शेतकरी केवळ निवडणुकीतील मतदार आहे की देशाच्या अर्थव्यवस्थेचा खरा भागीदार?

कारण शेतकऱ्याच्या घामावर देशाचे पोट भरते. पण त्याच शेतकऱ्याच्या घरात चूल पेटण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल तर ही केवळ शेतीची समस्या नाही, तर संपूर्ण समाजव्यवस्थेची शोकांतिका आहे.

शेवटी सरकारला एकच प्रश्न...

शेतकऱ्याला दरवर्षी पाच हजारांची मदत देण्यापेक्षा त्याच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त हमीभाव मिळेल, अशी व्यवस्था उभी करणे शक्य नाही का?शेतकऱ्याला मदतीच्या तुकड्यांवर जगायला लावू नका. त्याच्या घामाचा हिशेब द्या. त्याच्या कष्टाला किंमत द्या.

रवींद्र लाखे

डिजिटायझेशन परिवर्तनाची नांदी

भूमी अभिलेखचे डिजिटायझेशन ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाची सुरुवात आहे. मात्र या संपूर्ण परिवर्तनाचा केंद्रबिंदू तंत्रज्ञान नसून शेतकरी असला पाहिजे.

जमीन ही केवळ उत्पादनाचे साधन नाही, तर ती शेतकऱ्याच्या आर्थिक सुरक्षिततेचा, सामाजिक प्रतिष्ठेचा आणि पुढील पिढीच्या भविष्याचा आधार आहे. त्यामुळे जमिनीची मालकी, क्षेत्रफळ, हद्द, पीक, बोजा, वारसाहक्क, फेरफार आणि वापर यांची अचूक नोंद असणे महत्त्वाचे आहे. गेल्या काही वर्षांत भूमी अभिलेखांच्या डिजिटायझेशनमुळे या क्षेत्रात मोठा बदल झाला आहे. महाभिलेख, महाभूमी, ई-फेरफार, ई-हक्क, ई-मोजणी, डिजिटल नकाशे आणि डिजिटल स्वाक्षरीयुक्त अभिलेख यामुळे नागरिकांना जमिनीशी संबंधित माहिती अधिक सुलभपणे उपलब्ध होऊ लागली आहे. त्याचा सर्वांत मोठा परिणाम भविष्यातील शेतीवर होणार आहे.

आजपर्यंत भूमी अभिलेख म्हणजे प्रामुख्याने ७/१२, ८-अ, फेरफार नोंद, गाव नकाशा आणि इतर कागदी कागदपत्रे अशी त्याची संकल्पना होती. मांत्र डिजिटल युगात प्रत्येक जमिनीला एक विशिष्ट डिजिटल ओळख, भौगोलिक स्थान, डिजिटल नकाशा आणि अद्ययावत हक्क माहिती जोडण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. महाराष्ट्रातील डिजिटल भूमी अभिलेख व्यवस्थेत डिजिटल स्वाक्षरीयुक्त अभिलेख, महाभूनकाशा, ई-हक्क, ई-मोजणी, ई-रेकॉर्ड, मालमत्ता पत्रक आणि फेरफार स्थिती यांसारख्या सेवा एकमेकांशी जोडल्या जात आहेत. यामुळे भविष्यात शेतकऱ्याला 'माझी जमीन कोणती?' या प्रश्नाचे उत्तर केवळ कागदावरील गट क्रमांकाने मिळणार नाही, तर गट क्रमांक, डिजिटल नकाशा, भौगोलिक निर्देशांक मालकी हक्क माहिती उपलब्ध होईल.

डिजिटायझेशनची पुढील महत्त्वाची दिशा म्हणजे अधिकार अभिलेख आणि नकाशे यांचे पूर्ण एकत्रीकरण. महाराष्ट्रात भूमापन नकाशांचे डिजिटायझेशन आणि भूसंदर्भीकरण करण्याचे काम पुढे नेले जात आहे. यामुळे ७/१२ मध्ये दाखविलेले क्षेत्रफळ आणि डिजिटल नकाशावरील प्रत्यक्ष सीमा यांचा परस्पर संबंध अधिक स्पष्ट होईल. भविष्यात उपग्रह, ड्रोन, जीआयएस आणि अचूक भूमापन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जमिनीच्या प्रत्येक तुकड्याचे अधिक अचूक डिजिटल चित्र तयार करता येईल. यामुळे नागरिकांच्या कार्यालयीन फेऱ्या कमी होतील, प्रक्रिया जलद होईल आणि प्रशासन अधिक पारदर्शक व उत्तरदायी बनेल. कृत्रिम बुद्धिमत्ता भविष्यातील व्यवस्थापनात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकते. जुन्या हस्तलिखित अभिलेखांचे ओसीआरद्वारे वाचन, जुन्या नकाशांचे डिजिटल रूपांतर, अभिलेखांमधील विसंगती शोधणे, संशयास्पद फेरफार ओळखणे, समान मालकाच्या विविध ठिकाणच्या जमिनी शोधणे आणि अभिलेखार्तील परस्पराविरोधी माहिती दर्शविणे यासाठी एआयचा वापर करता येईल.

जलद कर्ज प्रक्रिया

डिजिटल भूमी अभिलेखांचा सर्वांत मोठा आर्थिक परिणाम कृषी कर्जाच्या क्षेत्रात दिसून येईल. बँकेला जमिनीचा हक्क, क्षेत्रफळ, मालकी, बोजा आणि संबंधित अभिलेख डिजिटल पद्धतीने पडताळता आले तर कर्ज मंजुरीची प्रक्रिया अधिक जलद होऊ शकते. कागदपत्रांची संख्या कमी होईल आणि शेतकऱ्याला बँकेच्या अनेक फेऱ्या मारण्याची गरज कमी होईल. डिजिटल जमीन अभिलेख, शेतकरी ओळख आणि कृषी डेटा यांचे एकत्रीकरण झाल्यास सरकारी योजनांचा लाभ अधिक अचूकपणे लक्षित करता येईल. पीकविमा, नुकसानभरपाई, अनुदान, सिंचन योजना, नैसर्गिक आपत्ती मदत आणि कृषी डेटा यांचे एकत्रीकरण झाल्यास सरकारी योजनांचा लाभ अधिक अचूकपणे लक्षित करता येईल. पीकविमा, नुकसानभरपाई, अनुदान, सिंचन योजना, नैसर्गिक आपत्ती मदत का क्षेत्रफळ याची प्रमाणित डिजिटल माहिती वापरता येईल. यामुळे लाभार्थी निश्चिती अधिक वेगवा आणि पारदर्शक होऊ शकते. भूमी अभिलेखां भवितव्य केवळ कागदपत्रांपुरते नसून प्रत्य भूभागाच्या अचूक मोजणीशी जोडलेले आहे. GIS आधारित ई-मोजणी, CORS, रोज आणि इतर आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरा जमिनीची मोजणी अधिक अचूक करता शकते. भविष्यात हीच तंत्रज्ञान व्यवस्था प्रिस शेतीसाठी उपयुक्त ठरू शकते. शेताच्या सीमांवर आधारित सॅटेलाइट नकाशा नकाशा, पाण्याची उपलब्धता आणि पिक आरोग्याची माहिती एकत्रित केल्यास शेतातील वेगवेगळ्या भागासाठी वेगवेग निर्णय घेता येतील. डिजिटायझेशन समस्या संपणार नाहीत. उलट काही न निर्माण होतील. चुकीची डिजिटल सायबर हल्ले, डेटा चोरी, बनावट डिजिटल्य आणि तांत्रिक ज्ञानाचा अभाव हे चुकीचे जीआयएस निर्देशांक, डिजि असतील.

भविष्यात ड्रोनच्या साहाय्याने शेतकरी आपल्या शेताची पाहणी करेल, उपग्रह जमिनीतील बदल ओळखले, एआय पिकाच्या आरोग्याचे विश्लेषण करेल, डिजिटल जमीन अभिलेख मालकी व सीमा स्पष्ट करतील आणि बाजारपेठेतील मागणीनुसार उत्पादनाचे नियोजन केले जाईल. मात्र या संपूर्ण परिवर्तनाचा केंद्रबिंदू तंत्रज्ञान नसून शेतकरी असला पाहिजे.

भूमी अभिलेखांचे डिजिटाय नसून भविष्यातील ग्रामीण 'कागदाचे डिजिटल रूपांतर' करण्याची प्रक्रिया नसून भाविष्यार्तील ग्रामीण अर्थव्यवस्थेची पायाभरणी आहे.

शेखर गायकवाड

भारतीय शेयर बाजाराची स्थिती

सेन्सेक्स गेल्या पाच सेशन्स मध्ये ४००० अंशांनी म्हणजे ५ पेक्षा जास्त टक्क्यांनी वधारला!सेन्सेक्स ज्यावेळी घसरत होता , त्याला बरीच कारणे होती पण त्यातील एक होते परकीय गुंतवणूकदार संस्था (एफपीआय) भारतीय शेयर बाजारातून अंग काढून घेत आहेत.जानेवारी २०२६ पासून ऑक्टोबर मध्यापर्यंत एफ पी आय भारतातील शेअर बाजारात नेट विक्रेते होते.या काळात त्यांनी ३२ बिलियन डॉलर्स म्हणजे तीन लाख कोटी रुपयांचे नेट शेअर्स विकले (नेट म्हणजे खरेदी केलेल्या शेअर्सची खरेदी वजा करून)

भारतातून हे भांडवल काढून घेऊन ज्या देशात जास्त नफा मिळू शकतो अशा देशात या गुंतवणूकदार संस्था शेअर्सची खरेदी करत होत्या.आताच नाही,त्या नेहमीच करतात. एका अंगणातून दुसऱ्या अंगणात गेले काही महिने त्यांचे आवडते डेस्टिनेशन होते अमेरिका, तैवान, दक्षिण कोरिया हेच देश का?तर या देशातील स्टॉक मार्केट वर आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्सचे भाव वेगाने वाढत होते.कारण या देशात आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कंपन्या जोरात होत्या.दर दिवसाला, दर आठवड्याला या एआय कंपन्याचे शेअर्स ऐतिहासिक उंचीवर जाऊ पाहत होते.

भारतात आर्टिफिशियल इंटेलिजन्स कंपन्या नसल्यामुळे भारतातील शेअर्स परकीय गुंतवणूकदार संस्थांना अनाकर्षक वाटत होत्या.म्हणून या संस्था भारतातून भांडवल काढून घेत होत्या.फाईन! पण आता?

गेल्या काही आठवड्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स कंपन्यांचे शेअर्स आपटी खाऊ लागले आहेत. कारण या एआय कंपन्याचे कॅश फ्लो अपेक्षेप्रमाणे वाढत नाही तर दुसऱ्या बाजूला यांच्या डोक्यावरची कर्जे आकाशाला भिडत आहेत. इंटेलिजन्स कंपन्यांचा फुगा कधीतरी फुटेल अशा चर्चा गेली काही महिने होतच होत्या. त्या फुग्याला पिन लागली की काय अशी भीती गेल्या काही आठवड्यात व्यक्त होत आहे.

-संजीव चांदोरकर



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २२ प्रतिज्ञा आणि आजचा आंबेडकरी व बहुजन समाज

धर्मांतर म्हणजे केवळ धर्म बदलणे नव्हे, तर विचार, आचार आणि जीवनपद्धतीत परिवर्तन घडवून आणणे होय. मग बाबासाहेबांना अपेक्षित असलेले वैचारिक परिवर्तन आपण खरोखरच स्वीकारले आहे का? त्यांच्या २२ प्रतिज्ञांचा अर्थ समजून घेऊन त्या आपल्या जीवनात उतरवल्या आहेत का? आज या प्रश्नांवर प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि लाखो अनुयायांना धम्मदीक्षा दिली. हा केवळ धार्मिक परिवर्तनाचा प्रसंग नव्हता, तर हजारो वर्षांच्या सामाजिक विषमता, जातीय श्रेष्ठत्व, अंधश्रद्धा आणि मानसिक गुलामगिरीविरुद्ध उभारलेली ऐतिहासिक सामाजिक क्रांती होती. या परिवर्तनाला वैचारिक दिशा देण्यासाठी बाबासाहेबांनी २२ प्रतिज्ञा दिल्या.मात्र आज प्रश्न असा आहे की, आपण या प्रतिज्ञांचा खरा अर्थ समजून घेतला आहे की केवळ धम्मदीक्षा सोहळ्यात त्यांचे पठण करण्यापुरतेच त्यांना मर्यादित ठेवले आहे?

बाबासाहेबांच्या The Buddha and His Dhamma या ग्रंथाचा आणि त्यांच्या धर्मांतरविषयक विचारांचा अभ्यास केला, तर धर्मांतरामागील त्यांची भूमिका स्पष्ट होते. धर्म हा माणसाच्या नैतिक आणि सामाजिक उन्नतीचे साधन असला पाहिजे. धर्माच्या नावाखाली विषमता आणि शोषण टिकवून ठेवणारी व्यवस्था त्यांना मान्य नव्हती. म्हणूनच त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला.

२२ प्रतिज्ञा : धर्मांतर नव्हे, वैचारिक परिवर्तन!

बाबासाहेबांच्या २२ प्रतिज्ञा म्हणजे केवळ धार्मिक नियम नाहीत, तर समता, नैतिकता, विवेक आणि माणुसकीवर आधारित जीवन जगण्याचा मार्ग आहेत. या प्रतिज्ञांचा मूळ आशय समजून घेण्यासाठी त्या पुन्हा वाचणे आवश्यक आहे.१. मी ब्रह्मा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.२. मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.३. मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देव-देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.४. देवाने अवतार घेतले, यावर माझा विश्वास नाही.५. गौतम बुद्ध हा विष्णूचा अवतार होय, हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय असे मी मानतो.६. मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही ७. मी बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेही आचरण करणार नाही.८. मी कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाच्या हातून करवून घेणार नाही.९. सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो.१०. मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.११. मी तथागत बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.१२. तथागताने सांगितलेल्या दहा पारमिता मी पाळीन.१३. मी सर्व प्राणिमात्रांवर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.१४. मी चोरी करणार नाही.१५. मी व्यभिचार करणार नाही.१६. मी खोटे बोलणार नाही.१७. मी दारू पिणार नाही.१८. ज्ञान (प्रज्ञा), शील, करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन व्यतीत करीन.१९. माझ्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या व मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बौद्ध धम्माचा स्वीकार करतो.२०. तोच सद्धम्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.२१. आज माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.२२. इतःपर मी बुद्धाच्या शिकवणुकीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो.

या प्रतिज्ञांकडे बारकाईने पाहिले, तर त्यांचा व्यापक अर्थ लक्षात येतो. विशेषतः नवव्या ते बाविसाव्या प्रतिज्ञांमध्ये समता, नैतिकता, अष्टांग मार्ग, दया, प्रामाणिकपणा, प्रज्ञा, शील आणि करुणा यांसारख्या जीवनमूल्यांवर भर दिलेला आहे.मात्र दुर्दैवाने आपल्या समाजात पहिल्या आठ प्रतिज्ञांवर अधिक चर्चा होते; पण नवव्या ते बाविसाव्या प्रतिज्ञांमधील विचार आणि आचरण याकडे तुलनेने कमी लक्ष दिले जाते. पहिल्या आठ प्रतिज्ञांच्या आधारे आपण आपली धार्मिक ओळख ठळक करतो; पण पुढील प्रतिज्ञांमध्ये सांगितलेली समता, नैतिकता आणि माणुसकी आपल्या व्यवहारात किती उतरवतो, हा खरा प्रश्न आहे.

प्रतिज्ञा केवळ ओठांवर, नको त्यांना स्थान, आचरणातून दिसू द्या, समतेचे महान भान। बुद्धविचार जगताना, घडू द्या नवा समाज,
शील, प्रज्ञा, करुणेतून, उजळू द्या जीवनसाज।

केवळ काही प्रतिज्ञांचा उल्लेख करून स्वतःला आंबेडकरी अनुयायी म्हणवून घेणे पुरेसे नाही. सर्व २२ प्रतिज्ञांचा अर्थ समजून घेऊन त्यानुसार जगण्याचा प्रयत्न करणे हीच खरी जबाबदारी आहे.

आंबेडकरी अनुयायी म्हणजे नेमके कोण?

बाबासाहेबांचे अनुयायी असणे म्हणजे केवळ त्यांच्या नावाचा जयघोष करणे, जयंती साजरी करणे, निळा झेंडा हातात घेणे किंवा त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करणे एवढेच नाही. त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे आणि ते आपल्या जीवनात आचरणात आणणे अधिक महत्त्वाचे आहे.

बाबासाहेबांनी दिलेला Educate, Agitate and Organize म्हणजेच शिक्षित व्हा, संघर्ष करा आणि संघटित व्हा हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. शिक्षणातून वैचारिक प्रगल्भता, संघर्षातून अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद आणि संघटनेतून सामाजिक परिवर्तन घडविण्याची शक्ती निर्माण करणे, हा या संदेशाचा उद्देश आहे.

निळ्या ध्वजाखाली, एकतेचा विचार हवा, जयभीमच्या घोषणेला, कृतीचा आधार हवा। महापुरुषांच्या नावाने, नको केवळ जयघोष, विचारांच्या आचरणातून, घडू द्या परिवर्तनाचा घोष।

मात्र आज आंबेडकरी चळवळीत गटबाजी, व्यक्तिपूजा, राजकीय स्वार्थ आणि परस्परांवरील टीका वाढताना दिसते. बाबासाहेबांच्या नावाने व्यासपीठे उभारली जातात; पण त्यांच्या विचारांचे आचरण करण्याची वेळ आली की अनेकजण मागे हटतात. बाबासाहेबांचे छायाचित्र घरात लावणे सोपे आहे; मात्र त्यांच्या विचारांना आपल्या वर्तनात स्थान देणे अधिक महत्त्वाचे आहे.

जन्माने बौद्ध असणे आणि विचाराने बौद्ध असणे!

आज जन्माने बौद्ध असलेल्या नव्या पिढीची संख्या वाढत आहे. त्यांच्या कुटुंबात बुद्धवंदना, धम्माचे संस्कार आणि बाबासाहेबांच्या विचारांची परंपरा आहे. ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. मात्र जन्माने बौद्ध असणे आणि जाणीवपूर्वक बौद्ध विचार स्वीकारणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.बाबासाहेबांनी आपल्या My Philosophy of Life या लेखात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांना आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा आधार मानले. हीच मूल्ये त्यांच्या विचारविश्वाचा महत्त्वाचा भाग होती.एखाद्या व्यक्तीचा जन्म बौद्ध कुटुंबात झाला म्हणून ती आपोआप २२ प्रतिज्ञांचे पालन करते असे नाही.धर्मांतरित कुटुंबात जन्मलेली प्रत्येक व्यक्ती आपोआप आंबेडकरी विचारांची वाहक होईल असेही नाही.

जन्माने मिळतो धम्म, पण विचाराने घडतो माणूस, ज्ञानाच्या प्रकाशाने, दूर होतो अज्ञानाचा फास।
पिढ्या?पिढ्या चालावी, विचारांची समृद्ध वाट, बुद्ध-भीमांच्या विचारांनी, उजळावी प्रत्येक पहाट।

जन्माने मिळालेली ओळख ही कौटुंबिक परंपरा असते; परंतु वैचारिक ओळख अभ्यास, जाणीव आणि आचरणातून निर्माण होते. त्यामुळे जन्माने बौद्ध असलेल्या नव्या पिढीने बाबासाहेबांचा संघर्ष, धर्मांतरामागील भूमिका आणि २२ प्रतिज्ञांचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. ही जबाबदारी केवळ त्या पिढीची नसून पालकांची आणि संपूर्ण समाजाचीही आहे.

आपल्या आचरणातील विरोधाभास कधी दूर होणार?

२५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेतील आपल्या शेवटच्या भाषणात बाबासाहेबांनी राजकीय लोकशाहीसोबत सामाजिक लोकशाहीचे महत्त्व स्पष्ट केले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही केवळ राजकीय घोषणा न राहता आपल्या जीवनाचा भाग झाली पाहिजेत, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता.मग आपण समतेचा पुरस्कार करताना आपल्या घरात आणि संघटनांमध्ये समानता पाळतो का? बंधुतेचा संदेश देताना वैचारिक मतभेद असलेल्या व्यक्तींचा आदर करतो का? बुद्धाच्या करुणेचा स्वीकार करताना आपल्या सामाजिक व्यवहारातून द्वेष, मत्सर आणि भेदभाव दूर ठेवतो का?एकीकडे २२ प्रतिज्ञांचे पठण करायचे आणि दुसरीकडे त्यांच्याशी विसंगत असलेल्या अंधश्रद्धा, रूढी आणि कर्मकांडांना स्वीकारायचे, हा विरोधाभास आपण दूर केला पाहिजे. कारण प्रतिज्ञांचे महत्त्व केवळ त्या म्हणण्यात नसून त्यानुसार वागण्यात आहे.

आता आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे!

आज गरज आहे ती कोण जन्माने बौद्ध आणि कोण धर्मांतरित बौद्ध, यावरून श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविण्याची नाही. कोण आंबेडकरी आणि कोण आंबेडकरवादी, याची प्रमाणपत्रे वाटण्याचीही नाही. गरज आहे ती प्रत्येकाने स्वतःच्या विचारांचे आणि आचरणाचे परीक्षण करण्याची.२२ प्रतिज्ञा स्वीकारल्यानंतरही आपल्या जीवनात अंधश्रद्धा, जातीय श्रेष्ठ-कनिष्ठ भावना, खोटेपणा, व्यसनाधीनता आणि सामाजिक भेदभाव कायम असेल, तर आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे : आपले खरोखर धर्मांतर झाले आहे की केवळ धार्मिक ओळख बदलली आहे?

बाबासाहेबांच्या विचारांचा खरा सन्मान म्हणजे दुसऱ्यांना प्रतिज्ञांची आठवण करून देण्यापेक्षा स्वतःपासून त्यांचे पालन सुरू करणे होय. जन्माने बौद्ध असलेल्या नव्या पिढीला या प्रतिज्ञांचा अर्थ समजावून सांगणे आणि धर्मांतरित कुटुंबांनी त्यामागील परिवर्तनवादी विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, ही दोघांचीही समान जबाबदारी आहे.बाबासाहेबांना केवळ अनुयायांची गर्दी अपेक्षित नव्हती, तर विचार करणारा, प्रश्न विचारणारा, अन्यायाविरुद्ध उभा राहणारा आणि समताधिष्ठित समाज निर्माण करणारा माणूस अपेक्षित होता.

आज आपण बाबासाहेबांचे नाव पुढील पिढीपर्यंत पोहोचवणार आहोत की त्यांचे विचारही पोहोचवणार आहोत, हा खरा प्रश्न आहे.कारण जन्माने बौद्ध असणे ही परंपरा असू शकते; पण विचाराने बौद्ध होणे ही जाणीवपूर्वक स्वीकारलेली जीवनदिशा आहे. आंबेडकरी अनुयायी असणे ही केवळ ओळख नसून समताधिष्ठित समाजनिर्मितीची जबाबदारी आहे.

नको केवळ जयभीम, विचारांचा दीप पेटू द्या, २२ प्रतिज्ञांचा अर्थ, जीवनामध्ये उतरू द्या। बुद्धाची करुणा, भीमांचा संघर्ष सोबत घेऊ या, समता, स्वातंत्र्य, बंधुतेचा नवा समाज घडवू या।

२२ प्रतिज्ञा केवळ ओठांवर नकोत, त्या आचरणात उतरल्या पाहिजेत. बाबासाहेब केवळ प्रतिमेत नकोत, ते आपल्या विचारांत आणि कृतीत दिसले पाहिजेत. हाच धम्माचा खरा स्वीकार आणि बाबासाहेबांच्या परिवर्तनवादी विचारांचा खरा सन्मान ठरेल.सदर लेख आवडल्यास, जास्तीत जास्त वाचकांपर्यंत व चळवळीतील नागरिकांपर्यंत पोहोचवून समतेच्या रथाला पुढे नेण्याच्या कार्यास सहकार्य करावे.

संदीप ज्ञानेश्वर थुल
डॉ.आंबेडकर साहित्य अभ्यासक
तथा सामाजिक कार्यकर्ता
मोबाइल: ८४२११०१०३४

■ गुरुवार, ५ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

दुष्काळात शेतक-यांचे वीज कनेक्शन तोडू नका!

कृषी पंपांसह घरगुती वीजपुरवठा खंडित न करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यात दुष्काळाचे सावट गडद झाले असताना आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना महावितरणने वीज कनेक्शन तोडण्याचा आणखी एक झटका देऊ नये, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. कृषी पंपांसह गरीब कुटुंबांचे घरगुती वीज कनेक्शन दुष्काळ संपेपर्यंत खंडित करू नये, तसेच स्मार्ट मीटरद्वारे बिल थकबाकीपोटी आपोआप वीजपुरवठा बंद होण्याची प्रणाली तातडीने बंद करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे अकोट तालुकाध्यक्ष चरण इंगळे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (४ नोव्हेंबर) महावितरणच्या अकोट विभागीय कार्यालयातील कार्यकारी अभियंत्यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले. तालुक्यातील शेतकरी आणि शेतमजूर आधीच दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यातच वीज बिल वसुलीसाठी कृषी पंप आणि घरगुती वीज जोडण्या तोडण्याची मोहीम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. दिवाळीचा सण तोंडावर असताना अशा प्रकारची कारवाई करणे अन्यायकारक असल्याचे संघटनेने म्हटले आहे. यावेळी तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन पुंडकर, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे, काशीराम साबळे, मंगेश चिखले, संदेश घनबहादूर, रमेश सरकटे, संभा थोरात, निखिल गावडे,



संजय पुंडकर, संजय बुध, मंदाताई कोल्हे, सुनीताताई हिरोळे, लताताई कांबळे, स्वाती चिखले, डॉ. अनिल गणगणे, अमन गवई, आशिष रायभोल, प्रेमराज भटकर, पंजाबराव पाचपाटील, स्वप्निल घनबहादूर, मयूर सपकाळ, डॉ. श्याम नेमाडे, राजेश वानखडे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कृषी पंप बंद झाल्यास जनावरांच्या पाण्याचा प्रश्न

शेतातील कृषी पंपांचा वीजपुरवठा खंडित केल्यास पिकांना पाणी देण्यासोबतच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती संपेपर्यंत कोणत्याही शेतकऱ्याचे कृषी पंपाचे वीज कनेक्शन तोडू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

दुसरीकडे, आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने अनेक गरीब कुटुंबांना घरगुती वीज बिल भरणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत दिवाळीच्या सणात घरातील वीज बंद करून कुटुंबांना अंधारात ठेवणे कितपत योग्य, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे.

स्मार्ट मीटरच्या प्रणालीवरही आक्षेप

स्मार्ट मीटरद्वारे वीज बिलाचा भरणा न झाल्यास स्वयंचलित पद्धतीने वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रणालीवरही वंचित बहुजन आघाडीने आक्षेप घेतला आहे. कोणतीही प्रत्यक्ष मानवी हस्तक्षेपाची प्रक्रिया न होता घरातील वीज अचानक बंद होणे गरीब कुटुंबांसाठी त्रासदायक ठरू शकते.

त्यामुळे दिवाळी सणाच्या काळात आणि दुष्काळ संपेपर्यंत स्मार्ट मीटरद्वारे होणारी स्वयंचलित वीजखंडित प्रक्रिया तातडीने बंद करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने गरजू व बेघरांना मिठाई व फटाके वितरण



■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यगृह येथे प्रत्यक्ष जाऊन फटाक्यांचे व मिठाईचे वितरण केले. फाउंडेशनचे मार्गदर्शक रमाकांत खेतान यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्ष डॉ पूजा खेतान यांच्या पुढाकारात आयोजित या उपक्रमात ॲड.विनोद इंगळे, अश्विनी परदेशी ,रेणुका झिरपे,श्रुती शिराळे, नंदकिशोर गावंडे,रश्मी घुगे, प्रवीण भोरे,सागर शिंदे, आशिष खिल्लारे,कीर्ती काळे, स्वराज पडोळे,आकाश सूर्यवंशी, आनंद गाढे,अश्विनी काळे,पार्थ गोरे आदींनी सेवाकार्य केले.

सामाजिक व वैद्यकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने यावर्षीही दीपावली पर्वात गरजू व बेघर वर्गास फटाके व मिठाई वितरण उपक्रम आयोजित करण्यात आला. फाउंडेशन च्या सेवाधाऱ्यांनी महानगरातील बेघर निवारा, बाल कारागृह, सूर्योदय बालगृह, शासकीय महिला

पाणीप्रश्नावर शिवसेना आक्रमक; वान धरणाचे पाणी आरक्षित करण्याची मागणी!

अकोला : शहरातील दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली पाणीटंचाई आणि ब्ल्यू लाईन परिसरातील नागरिकांच्या बांधकाम परवानगीचा प्रश्न यावर शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. वान धरणातील पाणी अकोला शहरासाठी पुन्हा आरक्षित करावे, तसेच ब्ल्यू लाईन परिसरातील घरांच्या बांधकाम नकाशांना मंजुरी देण्याची प्रक्रिया पूर्ववत सुरू करावी, अशा मागण्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केल्या आहेत. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले, तर जिल्हाधिकाऱ्यांकडेही वान धरणाच्या पाणी आरक्षणासाठी स्वतंत्र निवेदन सादर करण्यात आले.



ब्ल्यू लाईनमधील बांधकाम नकाशे बंद का?

दुसरीकडे, ब्ल्यू लाईन परिसरातील नागरिकांच्या घरांच्या बांधकाम नकाशांना मंजुरी देण्याची प्रक्रिया बंद करण्यात आल्याने नागरिकांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. यापूर्वी या परिसरातील बांधकाम नकाशे मंजूर केले जात होते, मग आता ही प्रक्रिया बंद का करण्यात आली, असा सवाल शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांसमोर उपस्थित केला. संबंधित नकाशांना मंजुरी देण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा आणि शासनाच्या नियमांच्या अधीन राहून या प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली.

● ब्ल्यू लाईनमधील बांधकाम नकाशांचा प्रश्नही ऐरणीवर
● आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

वान धरणाच्या पाणी आरक्षणाची स्थगिती उठवा!

सन २०१९ मध्ये वान धरणातील पाणी अकोला शहरासाठी आरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, काही कारणांमुळे या निर्णयाला स्थगिती देण्यात आली. आता शहरातील पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती पाहता ही स्थगिती उठवून वान धरणातील पाणी पुन्हा अकोला शहरासाठी आरक्षित करावे, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. यासाठी शासन आणि जलसंपदा विभागाकडे तातडीने पाठपुरावा करण्याची मागणीही करण्यात आली.

यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा धरणातील पाणीसाठा अवघ्या १३ टक्क्यांवर आला आहे. परिणामी, शहरवासीयांना तब्बल १३ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असून, पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने पर्यायी जलस्रोतांचे नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न असो अथवा ब्ल्यू लाईनमधील नागरिकांच्या बांधकाम परवानगीचा प्रश्न, प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता ठोस निर्णय घ्यावेत. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी दोन्ही प्रश्नांना प्राधान्य द्यावे, अशी भूमिका शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली.

यावेळी शिवसेनेचे महानगरप्रमुख राजेश मिश्रा, जिल्हाप्रमुख अश्विन नवले, मंगेश काळे, युवा नगरसेवक मनोज पाटील, डॉ. अशोक ओलंबे, तरुण बगेरे, रमेश गायकवाड, गजानन चव्हाण, गजानन बोराडे, प्रकाश वानखडे, फिरोज पठाण, महिला आघाडीच्या देवश्री ठाकरे, सुनीता श्रीवास, विजया राजपूत, योगेश ढोरे, अंकुश शिंत्रे, महेश बगेरे, तुषार इंगळे, पवन पवार, आशुतोष शेगोकार, किरण शिरसाट, बाळूभाऊ पाटील, संजय अग्रवाल, पंकज बाजोड, मधुकर सोनार, गण पडुळकर, भाऊ राखी पाटेकर, उज्वला इंगळे, संगीता सोनवणे, जयश्री तोंडरमर, अनिल वर्मा, बबलू ओके, मोहम्मद इझहार, अनंत चोपडे, रवी मळावी, राजेश इंगळे, गणेश मालटे आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर नोटीस

वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८०६/२०२६ प्रोसेस नं.१३७५७/२०२६
चौ.ता. ०५/१२/२०२६ दिनांक : २७/१०/२०२६

अर्जदार : १. माया मोहन पाटणे २. पुजा मोहन पाटने ३. जय मोहन पाटने सर्व रा. उत्तरा कॉलनी, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.

मयताचा पत्ता :- मयत : मोहन रामकृष्ण पाटणे

पत्ता :- रा. उत्तरा कॉलनी, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोहन रामकृष्ण पाटणे यांचे दि. १९/०५/२०१७ रोजी राहते घरी लहान उमरी, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

चौकशीची जाहिर नोटीस

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

अर्ज क्रमांक :- २५/२०२६ कलम 50A(i) नेमता तारिख : ०३/१२/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: - श्री पंढरीनाथ संस्थान, मनब्दा, ता. तेल्हारा, जि. अकोला.ए. ३८२ नोदणी क्रमांक. ए. ३८२- बाबत

अर्जदार : १) श्री. प्रविण दिनकरराव भालेराव रा. मनब्दा ता. तेल्हारा जि.अकोला. २) श्री.अशोक दिनकर भालेराव रा. मनब्दा ता. तेल्हारा जि. अकोला.

विरूध्द

गैरअर्जदार :- कुणीही नाही.

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, धर्मादाय उप आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम 50A(i) अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

१) बर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? .

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काहि नाहि

आ) स्थावर मिळकत (वर्णन):- मालमत्ता क्र. १ – मौजे मनब्दा,ता. तेल्हारा जि. अकोला येथील गट क. व उपविभाग क्र.५९ मधील ० हेक्टर ६१ आर शेतजमीन आहे. या शेताची चतु:सिमा. पुर्वेस - मंगेश पाझीकर यांचे शेत, पश्चिमेस :- सुभाष चितारे व श्री राउत यांचे शेत., उत्तरेस - वामन इंगळे यांचे शेत., दक्षिणेस :- शेत रस्ता

मालमत्ता क्र.२ – मौजे मनब्दा, ता. तेल्हारा जि. अकोला. येथील गट क व उपविभाग क्र.६० मधील ०.८ हेक्टर आर शेतजमीन आहे. या शेताची चतु:सिमा -

पुर्वेस – शेत. पश्चिमेस :- शेत. उत्तरेस शेत. दक्षिणेस :- शेत. मालमत्ता क्र. ३ - मौजे मनब्दा, ता. तेल्हारा जि. अकोला. येथील गट क व उपविभाग क्र. १२७ मधील ० हेक्टर ४१ आर शेतजमीन जिचे बाजार मुल्य एकत्रित रू. ५,१४०००/- आहे. सदर सार्वजनिक न्यासास शेतीपासुन सरासरी वार्षिक उत्पन्न रूपये २ लक्ष रूपये मिळते.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्कयानीशी आज दिनांक ०४.११.२०२६ रोजी दिली.

शिक्का

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

बाळापूर मतदारसंघात खड्डेमय रस्त्यांनी घेतले ३३४ बळी!

११० नागरिक गंभीर जखमी; आ. नितीन देशमुखांनी मुख्यमंत्र्यांकडे मांडली भयावह आकडेवारी



■ प्रतिनिधी | अकोला ■

बाळापूर विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांची दुरवस्था आता नागरिकांच्या जीवावर बेतत आहे. सन २०१९ पासून २०२६ पर्यंतच्या कालावधीत मतदारसंघातील पाच पोलीस ठाण्यांच्या हद्दीत झालेल्या रस्ते अपघातांमध्ये तब्बल ३३४ नागरिकांचा मृत्यू झाला असून ११० जण गंभीर जखमी झाले आहेत. रस्त्यांच्या भयावह परिस्थितीचे वास्तव समोर आणत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार नितीन देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. मतदारसंघातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती आणि मजबुतीकरण करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

बाळापूर मतदारसंघातील रस्त्यांवरील खड्डे आणि दुरुस्तीअभावी वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या समस्येची तीव्रता लक्षात आणून देण्यासाठी आमदार देशमुख यांनी पोलिसांकडून प्राप्त झालेली अपघातांची आकडेवारीच मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. बाळापूर, पातूर, उरळ, चान्नी आणि अकोट फैल या पाच पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात सन २०१९ पासून आतापर्यंत घडलेल्या अपघातांची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी, बाळापूर यांनी २७ जून २०२६ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार ३३४ नागरिकांना प्राण गमवावे लागले, तर ११० नागरिक गंभीर जखमी झाले आहेत.

खड्ड्यांमुळे आरोग्याचेही प्रश्न

रस्त्यांची दुरवस्था केवळ अपघातांपुरती मर्यादित राहिलेली नाही. दररोज खड्ड्यांतून प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांना मणक्याचे आजार, स्पॉन्डिलायटिस तसेच अन्य शारीरिक व्याधींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रस्त्यांच्या प्रत्यक्ष स्थितीचे जिओटॅगिंग केलेले छायाचित्रही पुरावा म्हणून जोडण्यात आले आहेत. त्यामुळे मतदारसंघातील रस्त्यांचा प्रश्न केवळ विकासकामांचा नसून नागरिकांच्या सुरक्षिततेशी निगडित असल्याचे देशमुख यांनी अधोरेखित केले आहे.

रस्ते दुरुस्तीसाठी तातडीने निधी द्या!

मतदारसंघातील जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व मजबुतीकरण करण्याची मागणी आमदार देशमुख यांनी केली आहे. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून संबंधित विभागांना त्वरित आदेश देण्यात यावेत, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. रस्त्यांच्या दयनीय अवस्थेमुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी नाराजी वाढत असल्याचेही त्यांनी निवेदनातून स्पष्ट केले.

आता शासनाच्या निर्णयाकडे लक्ष

पाच पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील अपघातांची आकडेवारी पाहता बाळापूर मतदारसंघातील रस्त्यांचा प्रश्न किती गंभीर बनला आहे, हे स्पष्ट होते. ३३४ नागरिकांचा मृत्यू आणि ११० जण गंभीर जखमी झाल्यानंतर तरी रस्त्यांच्या दुरुस्तीला प्राधान्य मिळणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. मुख्यमंत्र्यांकडे निवेदन सादर झाल्यानंतर संबंधित विभागाकडून कोणती कार्यवाही केली जाते आणि प्रत्यक्ष रस्ते दुरुस्तीची कामे कधी सुरू होतात, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बालहक्कांचे धडे देत 'सुरक्षित बचपन'चा जागर!

किड्स पॅराडाईज स्कूलमध्ये विधी सेवा समितीचा जनजागृती उपक्रम

■ प्रतिनिधी | पातूर ■

बालकांचे हक्क, सुरक्षितता आणि कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पातूर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलमध्ये 'सुरक्षित बचपन' अभियानांतर्गत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. पातूर तालुका विधी सेवा समितीच्या वतीने आयोजित या उपक्रमात न्यायाधीशांसह विधी क्षेत्रातील मान्यवरांनी बालहक्क, वैयक्तिक सुरक्षितता आणि कायद्याच्या महत्त्वाचे धडे दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष संदीप मोरे होते. प्रमुख वक्ते म्हणून सरकारी अभियोक्ता विश्वंभर गरड, ॲड. दिनेश काळपांडे आणि गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव उपस्थित होते. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे, कार्यकारी संचालिका ज्योत्स्ना गाडगे, विस्तार अधिकारी गौतम बडवे, विषयतज्ज्ञ संतोष राठोड, विधिज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. किरण सरदार, ॲड. रुपाली राऊत आणि



न्यायाधीश संदीप मोरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

ॲड. काजी साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'सुरक्षित बचपन' अभियानाच्या माध्यमातून बालकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, तसेच संभाव्य धोके ओळखून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सक्षम करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी मान्यवरांनी बालवयातील काळजी, वैयक्तिक सुरक्षितता, बालहक्कांचे संरक्षण आणि अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना न्यायाधीश संदीप मोरे यांनी कायद्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. बालवयात नकळत घडणाऱ्या चुकीच्या कृती, त्यातून उद्भवणारे कायदेशीर परिणाम, योग्य-अयोग्य यातील फरक आणि कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी घाबरून न जाता जागरूक राहावे आणि योग्य व्यक्तींकडून मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. प्रास्ताविक गोपाल गाडगे यांनी केले. संचालन मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे यांनी केले, तर विद्यार्थिनी अक्षरा शेंडे हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे शिक्षक व कर्मचारी तसेच तालुका विधी सेवा समितीचे कर्मचारी आणि विधी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

ड्रेनेज स्वच्छतेसाठी अत्याधुनिक जेटिंग मशिन मनपाच्या ताफ्यात

आमदार सावरकर, महापौर खेडकर यांच्या हस्ते लोकार्पण; अमृत अभियानाला मिळणार गती

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील मलनिःसारण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासह ड्रेनेजच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी अकोला महानगरपालिकेच्या ताफ्यात अत्याधुनिक सीवर सक्शन कम जेटिंग मशिन दाखल झाले आहे. बुधवारी (४ नोव्हेंबर) आमदार रणधीर सावरकर, महापौर शारदा रणजीत खेडकर, मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या



हस्ते वाहनाचे पूजन करून लोकार्पण करण्यात आले.शहरातील सांडपाणी वाहिन्यांची नियमित स्वच्छता, तुंबलेल्या ड्रेनेज लाईन मोकळ्या करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत मलनिःसारण व्यवस्थेतील अडथळे दूर करण्यासाठी या अत्याधुनिक यंत्राचा उपयोग होणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अमृत अभियानांतर्गत शहरात सुरू असलेल्या स्वच्छता आणि जलव्यवस्थापनविषयक विकासकामांनाही या यंत्रामुळे गती मिळण्याची अपेक्षा आहे.

शहरातील बंद अथवा तुंबलेल्या ड्रेनेज वाहिन्यांची स्वच्छता करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येणार असल्याने मनपाच्या स्वच्छता व्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. तसेच सांडपाण्यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर नियंत्रण मिळविण्यास मदत होणार आहे. स्वच्छ आणि आरोग्यदायी अकोला घडविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, सभागृहनेते पवन महल्ले, नगरसेवक नितीन ताकवाले, देवाशिष काकड, सामाजिक कार्यकर्ते संजय गोटफोडे उपस्थित होते. तसेच मनपा उपायुक्त गणेश शहाणे, स्वच्छता विभागप्रमुख प्रशांत राजुरकर, संजय खोसे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

समृद्धी महामार्गावर आता ४२० पोलिसांचा पहारा, पंकज भोयर यांच्या पाठपुराव्याला यश

१५ पोलीस मदत केंद्रांसह स्वतंत्र नियंत्रण कक्षाला मंजुरी

वर्धा/जनमाध्यम

अपघातांचे वाढते सत्र, वाहनचालकांची बेदरकार धावपळ,वाहतूक नियमांची पायमल्ली आणि वाटमारीच्या घटनांमुळे चर्चेत आलेल्या समृद्धी महामार्गावर आता पोलिसांचा कडक पहारा राहणार आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या सुरक्षेसाठी राज्य शासनाने १५ महामार्ग पोलीस मदत केंद्रे आणि एका स्वतंत्र नियंत्रण कक्षाच्या स्थापनेला मंजुरी दिली आहे. यासाठी तब्बल ४२० नियमित पदांची निर्मिती करण्यात येणार आहे. गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.



गृह विभागाने ३ नोव्हेंबर रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. समृद्धी महामार्गावर अपघात घडल्यानंतर तातडीने मदत मिळणे, वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे आणि गुन्हेगारी घटनांना आळा घालणे यासाठी स्वतंत्र पोलीस यंत्रणेची मागणी सातत्याने होत होती. अखेर शासनाच्या निर्णयामुळे या मागणीला मूर्त स्वरूप आले आहे.

४२० अधिकारी-कर्मचाऱ्यांची फौज

नव्या पोलीस यंत्रणेत १६ सहायक पोलीस निरीक्षक, ३२ पोलीस उपनिरीक्षक, ४८ सहायक पोलीस उपनिरीक्षक, २७६ पोलीस शिपाई आणि ४८ पोलीस शिपाई वाहनचालकांचा समावेश आहे. या पदांसाठी ४३ कोटी ४७ लाख ३३ हजार ४२४ रुपयांचा आवर्ती खर्च, तर ७ कोटी ४५ लाख ८८ हजार ९६६ रुपयांचा अनावर्ती खर्च मंजूर करण्यात आला आहे.

विदर्भापासून मुंबईच्या दिशेने १५ मदत केंद्रे

समृद्धी महामार्गावर वायफळ, येळाकेळी (वर्धा), धामणगाव-आसेगाव, गावनेर-तळेगाव-शिवणी, कारंजा लाड, मालेगाव-जहांगीर, दुसरबीड, सिंदखेड राजा, निढोणा (जालना), सावंगी (छत्रपती संभाजीनगर), हडस-पिंपळगाव, कोकमठाण (शिर्डी), गोंदे-सिन्नर, पिंपरी सद्रोद्दीन (इगतपुरी) आणि शहापूर-खुटघर येथे ही मदत केंद्रे उभारण्यात येणार आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे स्वतंत्र महामार्ग पोलीस नियंत्रण कक्ष कार्यान्वित केला जाणार आहे.

या केंद्रांमुळे महामार्गावर नियमित गस्त, अपघातस्थळी तातडीची मदत, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई आणि संशयास्पद हालचालींवर नजर ठेवणे शक्य होणार आहे. विशेष म्हणजे, लांब पल्ल्याच्या प्रवासात अडचणीत सापडलेल्या प्रवाशांना पोलिसांची मदत मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे.

मुख्यमंत्र्यांचे आभार

समृद्धी महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेऊन गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शासनस्तरावर या प्रस्तावासाठी पाठपुरावा केला होता. या प्रस्तावाला मंजुरी दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.मात्र, केवळ पोलीस मदत केंद्रे उभारून प्रश्न संपणार नाही. त्यांची नियमित गस्त, तातडीचा प्रतिसाद, प्रभावी नियंत्रण आणि प्रत्यक्ष कारवाई किती सक्षमपणे होते, यावरच समृद्धी महामार्गावरील प्रवाशांची सुरक्षितता अवलंबून राहणार आहे.

प्रशासनाने जगवलेली झाडे अज्ञातांकडून भुईसपाट

झाडे तोडणाऱ्यांचा शोध घेऊन कठोर कारवाईची नागरिकांची मागणी

वर्धा/जनमाध्यम

एकीकडे पर्यावरण संवर्धनासाठी प्रशासनाकडून 'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश दिला जात असताना दुसरीकडे शहरातील वाढलेली झाडेच अज्ञातांकडून कापली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पावडे चौक ते आर्वी नाक्याकडे जाणाऱ्या मार्गावरील दुभाजकात लावण्यात आलेल्या झाडांची अज्ञात व्यक्तींनी कत्तल केली आहे.

या मार्गावरील दुभाजकात प्रशासनाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले होते. केवळ झाडे लावून प्रशासन थांबले नाही, तर त्यांचे नियमित संगोपन आणि संवर्धन केल्याने ही झाडे आता चांगलीच मोठी झाली होती. मात्र, मंगळवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी अनेक झाडे अर्धवट कापून टाकल्याचे निदर्शनास आले. दुभाजकातील अनेक झाडांना लक्ष्य करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, उन्हाचा तडाखा कमी करण्यासह शहराचे सौंदर्य वाढविणाऱ्या या झाडांची अशा प्रकारे कत्तल करणाऱ्यांना नेमके काय साध्य करायचे आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासन हजारो रुपये खर्चून वृक्षारोपण करते, त्यांच्या संगोपनासाठी प्रयत्न करते; मात्र काही समाजकंटकांच्या कृत्यामुळे या प्रयत्नांवर पाणी फेरले जात आहे.



झाडे लावा, झाडे जगवा म्हणायचे आणि दुसरीकडे झाडे तोडायची, हा दुटप्पीपणा थांबला पाहिजे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून संबंधितांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

संक्षिप्त

न्यायालय परिसरात चाकू घेऊन फिरणारा तरुण ताब्यात

वर्धा- न्यायालयासमोरील मैदानात हातात चाकू घेऊन फिरणाऱ्या तरुणाला वर्धा शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. शाहीद शाकीर पठाण (वय २१, रा. प्रबुद्धनगर, मसाळा) असे आरोपीचे नाव आहे.३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.२५ वाजताच्या सुमारास पोलिसांना न्यायालयासमोरील मैदानात एक तरुण हातात चाकू घेऊन फिरताना दिसला. पोलिसांनी पंचांसमक्ष त्याला ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्याच्याकडून चाकू जप्त करण्यात आला. जप्त केलेला चाकू काळ्या रंगाचा असून त्याची एकूण लांबी २७ सेंटीमीटर आहे. त्याच्या एका बाजूला धारदार पाते तर दुसऱ्या बाजूला दाते आहेत. चाकूची किंमत अंदाजे ३०० रुपये आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

लाडकी घाटातून रेतीची अवैध वाहतूक; ६.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंगणघाट- पोथरा नदीच्या पात्रातून विनापरवाना काळ्या रेतीचे उत्खनन करून अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर हिंगणघाट पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ट्रॅक्टर, ट्रॉली आणि रेती असा एकूण ६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ३ नोव्हेंबर रोजी पोलिसांना लाडकी घाटातून सातेफळकडे अवैध रेती वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह सापळा रचला. यावेळी विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह येताना दिसला. तपासणी केली असता ट्रॉलीमध्ये काळी रेती आढळली. चालक दीपक महादेवराव उईके याच्याकडे वाहतुकीचा परवाना किंवा रॉयल्टी पावती नव्हती. त्याने मालक पिटू सहानी याच्या संगनमताने रेतीची चोरी केल्याचे सांगितले. पोलिसांनी ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती जप्त केली. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

जुन्या तक्रारीच्या वादातून मारहाण

वर्धा- पूर्वी पोलिसांत तक्रार का केली, असा जाब विचारत चौघांनी एका तरुणाला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना भाईमारे लेआउट परिसरातील सिमेंट रस्त्यावर घडली. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. समीर युसुफ खान (वय २७, रा. शांतिनगर, सिद्धी लेआउट) यांच्या तक्रारीनुसार, २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ते पानठेल्यावर गेले असताना आरोपीचा चुलत भाऊ काल्या याने त्यांना दुसऱ्या ठिकाणी जाण्यास सांगितले. त्यानंतर भाईमारे लेआउटमधील सिमेंट रस्त्यावर साहिल गावंडे याने दुचाकी आडवी लावली.

क्षणिक आनंदासाठी कष्टाची कमाई धुरात का उडवता

फटाके फोडणे म्हणजे श्रमाच्या पैशाची राखरांगोळी-गजेंद्र सुरकार

वर्धा/जनमाध्यम

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि आपुलकीचा सण. मात्र, क्षणिक आनंदासाठी हजारो रुपयांचे फटाके फोडून कष्टाने कमावलेल्या पैशाची राखरांगोळी कशासाठी करायची? फटाक्यांच्या आवाजाने वृद्ध, लहान मुले, आजारी व्यक्ती आणि पशुपक्ष्यांना त्रास होतो. त्यामुळे दुसऱ्यांच्या आनंदावर विरजण घालणारे फटाके फोडण्याऐवजी विवेकाने आणि पर्यावरणपूरक पद्धतीने दिवाळी साजरी करा, असे भावनिक आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धा जिल्हा व शहर शाखेच्या संयुक्त विद्यमाने लोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात फटाकेमुक्त दिवाळी प्रबोधन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसमोर प्रबोधन यात्रेची सुरुवातही करण्यात आली. प्राचार्य सुषमा संजय कोटेवार, पर्यवेक्षक कल्पना मंथनवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना सुरकार म्हणाले की, गेल्या ३६ वर्षांपासून समिती बुवाबाजी, अनिष्ट रूढी-परंपरा आणि अंधश्रद्धांविरोधात विवेकी समाजनिर्मितीसाठी कार्यरत आहे. फटाके फोडण्याची अनिष्ट प्रथा रोखण्यासाठीही समिती सातत्याने जनजागृती करीत आहे. फटाक्यांमुळे ध्वनी व वायुप्रदूषण वाढते. आगीच्या घटना घडतात. वृद्ध, लहान मुले, रुग्ण तसेच पशुपक्ष्यांना असह्य त्रास सहन करावा लागतो. क्षणभराचा आनंद मिळविण्यासाठी आपण स्वतःच्या पैशांसोबत इतरांचेही स्वास्थ्य धोक्यात घालतो, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे.



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने शाळा-महाविद्यालयांमध्ये फटाकेमुक्त दिवाळीचा कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यावर्षी वर्धा जिल्ह्यातील आठही शाखांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात ही मोहीम राबविण्याचा संकल्प केला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सुषमा कोटेवार यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कल्पना मंथनवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी निलेश डहाके, एस. व्ही. कुचेवार, पी. ए. येवूलकर, आर. आर. धात्रक, सारिका पारधी, नंदिनी कुंभरे, निमाजी, आय. बी. मेटे, रुपाली चौधरी यांनी परिश्रम घेतले.

पक्ष्यांच्या किलबिलाटाने आठ दिवस गजबजणार जिल्हा

बहार, वन विभाग व बोर व्याघ्र प्रकल्पाचा संयुक्त पुढाकार

वर्धा/जनमाध्यम

पक्ष्यांचे संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यासाठी जिल्ह्यात ५ ते १२ नोव्हेंबरदरम्यान पक्षी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बहार नेचर फाउंडेशन, वन विभाग आणि बोर व्याघ्र प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवस जिल्ह्यातील विविध नैसर्गिक अधिवासांमध्ये पक्षी निरीक्षणासह विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

गुरुवारी (५ नोव्हेंबर) सकाळी ९ वाजता सेवाग्राम येथील आनंद निकेतनमध्ये जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या हस्ते सप्ताहाचे उद्घाटन होईल. दररोज सकाळी ७ ते ९ या वेळेत सेवाग्राम, ऑक्सिजन पार्क, आयटीआय टेकडी, रोठा तलाव, मदन धरण, दिग्रस तलाव, इंझापूर टेकडी आणि पवनार येथील धाम नदी परिसरात पक्षी निरीक्षण केले जाणार आहे. १२ नोव्हेंबरला बोर व्याघ्र प्रकल्प परिसरात समारोप होईल.

अरण्यऋषी मारुती चितमपल्ली आणि पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांच्या जन्मदिवसांचे औचित्य साधून पक्षी सप्ताह साजरा केला जातो. बहारच्या पुढाकारातून महाराष्ट्राने देशात प्रथमच अधिकृतरीत्या पक्षी सप्ताह जाहीर केला. जिल्ह्याची पक्षीसूची प्रकाशित करणे, पक्ष्यांची शिल्पे उभारणे असे उपक्रमही फाउंडेशनने राबविले आहेत. विद्यार्थ्यांनी व निसर्गप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



दोनशे रुपयांच्या वादातून काठीने मारहाण

हिंगणघाट - दोनशे रुपये परत मागितल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका व्यक्तीला लाकडी काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना काचनगाव येथे घडली. याप्रकरणी हिंगणघाट तालुक्यातील काचनगाव येथील खंडुजी मेश्राम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, फिर्यादी गोपाल शिवराम स्पाट हे घरी झोपले असताना आरोपीने त्यांना उठविले. यावेळी फिर्यादीने पूर्वी घेतलेले दोनशे रुपये परत मागितले. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. आरोपीने शिवीगाळ करीत घरातील लाकडी काठीने फिर्यादीच्या गालावर आणि डाव्या भुवईजवळ मारहाण केली. यात ते जखमी झाले.

चार दिव्यांगांना बॅटरी ट्रायसायकलचा आधार

निडमॉर्टी फाउंडेशन व मेहेर संस्थेचा स्तुत्य उपक्रम; स्वावलंबनाच्या दिशेने चार पावले



वर्धा/जनमाध्यम

अपंगत्व शरीराला मर्यादा घालू शकते; मात्र जिद्द आणि आत्मविश्वासाला नाही. चार दिव्यांगांच्या आयुष्यात स्वावलंबनाचा नवा प्रकाश निर्माण करीत निडमॉर्टी फाउंडेशन व मेहेर सेवाभावी संस्थेने माणुसकीचा अनोखा आदर्श घालून दिला. संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सालोड येथील मेहेराश्रय येथे चार गरजू दिव्यांगांना मोफत बॅटरी ट्रायसायकलचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा स्थानिक समितीच्या अध्यक्ष ॲड. अनिता ठाकरे होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर उपस्थित होत्या. यावेळी सचिन वानखेडे (वर्धा), भुजंग घोडे (वायगाव निपाणी), अरविंद तडस (सिंदी रेल्वे) आणि गजेंद्र गरड (वुरझडी, जामठा) यांना ट्रायसायकलच्या चाव्या, मेहेरबाबांची प्रतिमा व ग्रामगीता देऊन सन्मानित करण्यात आले.

या बॅटरी ट्रायसायकलची क्षमता एका चार्जमध्ये सुमारे २० किलोमीटर प्रवास करण्याची आहे. अभियंता नितीन आटे यांनी सायकलचे प्रात्यक्षिक करून दाखविले. दिव्यांगांना दुसऱ्याच्या मदतीची वाट पाहण्याऐवजी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी देणे, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे संस्थेचे संस्थापक अमित यांनी सांगितले.

दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच आमच्या सेवेची खरी पावती आहे,' अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली. संजय ठाकरे यांनी संचालन केले, तर ॲड. नंदकुमार वानखेडे यांनी आभार मानले. मेहेरबाबांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

९ लाखांचा पांदण रस्ता गेला कुठे? कागदावर विकास, प्रत्यक्षात भकास

३१६ मीटर रस्त्याच्या कामात अनियमिततेचा ग्रामस्थांचा आरोप

ग्रामसभेचा चौकशी ठराव आठ महिन्यांपासून धूळखात असल्याचा दावा

सेलू /जनमाध्यम

निधी नऊ लाखांचा, रस्ता अवघा ३१६ मीटरचा; मात्र प्रत्यक्षात रस्त्याची अवस्था पाहिली तर विकासकाम झाले की केवळ सरकारी पैशांची विल्हेवाट लावली, असा प्रश्न उपस्थित होतो. सालई कला येथे जिल्हा वार्षिक योजना जनसुविधेंतर्गत मंजूर झालेला पांदण रस्ता सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कागदोपत्री काम पूर्ण झाल्याचे दाखवून कंत्राटदाराला देयक अदा करण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे 'आमचा रस्ता चोरीला तर गेला नाही ना' असा प्रश्न गावकरी प्रशासनाला विचारत आहेत.

रस्त्याचे काम की केवळ वरवरची मलमपट्टी

मोरेश्वर शेंडे ते नंदकिशोर ठोंबरे या ३१६ मीटर पांदण रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी नऊ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. कामाच्या फलकावर १९ जानेवारी २०२६ ते १७ मार्च २०२६ अशी कालमर्यादा नमूद आहे. मात्र प्रत्यक्ष रस्त्याची अवस्था पाहता कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक व्यवस्था नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. वरवरची मलमपट्टी करून लाखोंचा निधी खर्च दाखविण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



ग्रामसभेचा ठरावही प्रशासनाच्या दप्तरात कैद

या प्रकरणाची चौकशी व्हावी, यासाठी २५ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी एकमुखाने ठराव मंजूर केला. मात्र या ठरावानंतरही प्रशासनाकडून प्रत्यक्ष पाहणी किंवा चौकशी झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सेलू येथील मूळ कंत्राटदार आणि हिंगणी येथील पेटी कंत्राटदार आनिस शेख यांच्या कामकाजाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मोजमाप पुस्तिका उघडा, सत्य बाहेर येऊ द्या

कामाचे प्रत्यक्ष मोजमाप, अंदाजपत्रक, गुणवत्ता तपासणी अहवाल आणि कंत्राटदाराला अदा केलेल्या देयकांची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे. नऊ लाखांचा निधी नेमका कुठे आणि कसा खर्च झाला, याचा हिशेब प्रशासनाने ग्रामस्थांसमोर मांडावा, अशी मागणी आहे. विकासकामांच्या नावाखाली सरकारी निधी खर्च झाल्याचे कागद सांगत असतील, तर प्रत्यक्षात त्याचा लाभ गावकऱ्यांना का दिसत नाही? ग्रामसभेच्या ठरावालाही प्रतिसाद मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कुणाकडे असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणाची तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

जनमाध्यम न्युज ॲन्ड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

तलाठ्याला धमकावणे भोवले

आरोपीला एक वर्षाचा सश्रम कारावास

अमरावती/प्रतिनिधीः- शासकीय कर्तव्य बजावण्यासाठी निघालेल्या तलाठ्याला रस्त्यात अडवून शिवीगाळ करणे, मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देणे आरोपीला चांगलेच भोवले आहे. या प्रकरणात न्यायालयाने आकाश दीपकराव भेंडे (३०, रा. धामणगाव रेल्वे) याला दोषी ठरवत एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. याशिवाय दोन्ही गुन्ह्यांसाठी एकूण तीन हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक ७ बी. ए. गायकवाड यांनी बुधवारी (४ नोव्हेंबर) हा निर्णय दिला. सन २०२३ मध्ये फिर्यादी तलाठी म्हणून बोरगाव निस्ताने येथे कार्यरत होते. तहसीलदारांच्या आदेशानुसार त्यांची गौण खनिज कारवाई पथकात नियुक्ती करण्यात आली होती. यापूर्वी शासकीय कामात अडथळा आणल्याच्या दुसऱ्या प्रकरणात तलाठ्याच्या सहकाऱ्यांनी आकाश भेंडेविरुद्ध तक्रार दिली होती. त्यावरून त्याच्याविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल झाला होता.याचाच राग मनात धरून आरोपीने तलाठ्याला लक्ष्य केल्याचे अभियोग पक्षाच्या पुराव्यातून पुढे आले. २३ जून २०२३ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास तलाठी गौण खनिज कारवाईसाठी जात असताना एलआयसी कार्यालयासमोर आरोपीने त्यांना अडविले. अश्लील शिवीगाळ करून मारहाण केली आणि अंगावरील शर्ट फाडला. तसेच शासकीय कर्तव्यावर कसा जातोस, ते पाहून घेण्याची धमकी दिली.



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२२२६/२०२६
Vaibhav Balwant Nagarnaik + 3 Versus NIL
पुढील ता.२४.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. **Vaibhav Balwant Nagarnaik,** Age 42 yrs. Occ.- Service
2. **Shripad Balwant Nagarnaik,** Age 39 yrs. Occ.- Service
3. **Gaurav Balwant Nagarnaik,** Age 36 yrs. Occ.- Service
All R/o. 48-A Madhuban, Vimal Near Chatri Talao Road, Near Farshi Stop, Amravati, Tq. & Dist. Amravati

--Versus--

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Anjali Balwant Nagarnaik** हे दिनांक ०१.०९.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. **Vaibhav Balwant Nagarnaik +3 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Vaibhav Balwant Nagarnaik +3 Versus NIL** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२७.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

-सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी

आर.एम.जे.सी.क्र.६७१/२०२६ **ने.ता.१७.११.२०२६**

अर्जदार -
१. **श्रीमती रेखाबाई प्रभाकरराव पेदे,** वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम
२. **अविनाश प्रभाकर पेदे,** वय ४१ वर्षे, धंदा - मजुरी
दोघेही रा.कसारपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ. स्वाती नितिन पिटकर,** वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गोठाणगांव, ता.कुही, जि.नागपूर

-- **विरुध्द** --
निल (कुणीही नाही)

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/S २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ चे पती तर अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिल नामे **प्रभाकर हरिभाऊ पेदे** यांचा **दि. २२/०९/२०१९** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झालेला आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०३.११.२०२६

शिक्का
आदेशान्वये,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर),मोर्शी

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५०९/२०२६ **ने.ता.२६.११.२०२६**

अर्जदार :
१. **नुरहुसना शेख सरदार,** वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.परसोडा रोड, वार्ड न.२, घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **शेख निसार शेख सरदार,** वय ४९ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.वार्ड नं.२ शिंदी बु.शिंदी खुर्द, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **मोहम्मद नासीर शेख सरदार,** वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजूरी
४. **मो.शाकिर शेख सरदार,** वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजूरी
अर्जदार क्र.३ व ४ रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. **बिस्मील्ला बी शे.सलाम,** वय ४६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड क्र.१ ब्राम्हणवाडा कसबा, पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. **फरजाना परवीन अब्दुल हफिज,** वय ३९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.ताजनगर, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
७. **रिजवान बी शे.जमील,** वय ४३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.मजीद जवळ, ईस्लामपुरा, मोर्शी,ता.मोर्शी, जि.अमरावती
८. **रुबीना परवीन मोहम्मद शकिल,** वय ३५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा. वार्ड क्र.१ ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक शेख सरदार शेख मोहम्मद** यांचा **मृत्यू दि.०५/१२/२०१८** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५०९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.३१.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. - 668/22/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व - वाईल्ड राईट अलायन्स, गुरुकुंज मोझरी, ता.तिवसा
नोंदणी क्रमांक जि.अमरावती, एफ- २१५४२
अर्जदार - डॉ.मधुकर नामदेवराव गुंबळे
गैरअर्जदार - १. श्री प्रकाश जॉन पाळंदे
२. श्री अनिल रायभान बोरकर

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा दयायचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीच्या आत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ३०.१०.२०२६रोजी दिली.

सही/-
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.७३/२०२६ **ने.ता.०३/१२/२०२६**

अर्जदार- **राजु महादेवराव कापडे,** वय ६० वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.वार्ड नं.१ मोखड, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

... **विरुध्द**...

गैरअर्जदार- **सचिव तथा जन्म - मृत्यू अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मोखड,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

ज्याअर्थी अर्जदार नामे **राजु महादेवराव कापडे** यांचा जन्म दिनांक १६/०७/१९६६ रोजी मोखड, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नामे **राजु महादेवराव कापडे** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत मोखड, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू नोंदवही मध्ये जन्माची नोंद करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जदाराने त्यांची जन्माची नोंद जन्म - मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर, येथील न्यायालयात **दिनांक १४/१०/२०२६** रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी **दिनांक ०३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०२/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. - 619/22/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व - माहेश्वरी शिक्षा सहयोग समिती, अमरावती
नोंदणी क्रमांक ता.जि.अमरावती, एफ- २१५९८
अर्जदार - श्री रितेश गणेशदास बुब
गैरअर्जदार - १. श्री राजेश घनश्याम कासट
२. श्री दामोधर भवरलालजी बजाज
३. श्री प्रशांत श्रीप्रकाश करवा

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा दयायचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीच्या आत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ३०.१०.२०२६रोजी दिली.

सही/-
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३१३/२०२६
चंदा अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.०५.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. चंदा दिपक ठाकरे, वय ४९ वर्षे, कामधंदा - नोकरी
रा.भोलेश्वर मंदिरासमोर, जुनी टाकसाळ, अमरावती
२. स्नेहल दिपक ठाकरे, वय ३१ वर्षे, कामधंदा - नोकरी
रा.भोलेश्वर मंदिरासमोर, जुनी टाकसाळ, अमरावती
३. पियुष दिपक ठाकरे, वय २८ वर्षे, कामधंदा - शिक्षण
रा.भोलेश्वर मंदिरासमोर, जुनी टाकसाळ, अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दिपक नारायणराव ठाकरे** हे दिनांक 19.05.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चंदा दिपक ठाकरे अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंदा दिपक ठाकरे अधिक दोन** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२८७/२०२६
माया अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.०२.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Maya Wd/o Gajanan Akolkar, Age about 75 Yrs. Occu.: Housewife
R/o Mudliyar Nagar, Sabda Plot, Rukhmini Nagar, Amravati.
2. Madhuri Dipak Shete, Age about 37 Yrs. Occu.: Labour
R/o Malvi Pura, Pimpalgaon Raja, Buldhana
3. Sandesh S/o Gajanan Akolkar, Age about 33 Yrs. Occu.: Labour
R/o Near L.I.C. Chhabada Plot, Rukhmini Nagar, Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Gajanan Babuappa Akolkar हे दिनांक 19.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Maya Wd/o Gajanan Akolkar + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Maya Wd/o Gajanan Akolkar + 2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२६२/२०२६
Shubhrakanta Haridas Bochare **-वि- निरंक**
पुढील ता.२०.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Shubhrakanta Haridas Bochare
Age 79 Yrs. Occu.: Homemaker
R/o Near Tapar Hostel Narhari Nagar, Rajapeth, Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Haridas Shyamrao Bochare हे दिनांक 06.08.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shubhrakanta Haridas Bochare - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shubhrakanta Haridas Bochare - Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४९९/२०२६
Smt.Vanita Nana Bobade+1 **-वि- निरंक**
पुढील ता.११.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Smt.Vanita Nana Bobade, Age 57 Yrs. Occu.: Household
R/o Pandurangji Bobade, Galli No.3, Pravin Nagar, Amravati.
2. Tanmay Nana Bobade, Age 20 Yrs. Occu.: Household
R/o Pandurangji Bobade, Galli No.3, Pravin Nagar, Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Nana Pandurangji Bobade हे दिनांक 24.07.2024 रोजी मयत झाले. अर्जदार Smt.Vanita Nana Bobade+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Vanita Nana Bobade+1 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२४२/२०२६
Abdul Iqbal Abdul Jabbar+1 **-वि- निरंक**
पुढील ता.२५.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Abdul Iqbal Abdul Jabbar Age about 38 Yrs. Occu.: Labour
2. Buna Bee Shaikh Jabbar, Age about 56 Yrs. Occu.: Housewife
Both R/o Gulistan Nagar, Amravati-444601

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shaikh Jabbar Shaikh Sattar Alias Abdul Jabbar Abdul Sattar हे दिनांक 15.10.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Abdul Iqbal Abdul Jabbar+1 -Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Abdul Iqbal Abdul Jabbar+1 -Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

वि.ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०१)

कि.कि.अर्ज क्रमांक १२४०/२०२६

अर्जदार : वैशाली विजयकुमार देशमुख
वय ५० वर्षे, रा.१२, आनंद हाऊसिंग सोसायटी, प्रेरणा कॉलनीजवळ, राधा नगर, शिवाजी नगर, अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार: मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत शिराळा, ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **वैशाली विजयकुमार देशमुख** यांनी **वैशाली विजयकुमार देशमुख** यांच्या जन्माची नोंद दिनांक **२७.०२.१९७६** रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का
आदेशान्वये,
कनिष्ठ लिपिक
सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३४५/२०२६
वर्षा अधिक तीन -वि- निरंक
पुढील ता.०८.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Varsha Udayrao Gulalkari, Age about 70 Yrs. Occu.: Housewife
2. Sanket Udayrao Gulalkari, Age about 75 Yrs. Occu.: Pvt.Job/Business
3. Rushal Udayrao Gulalkari, Age about 75 Yrs. Occu.: Pvt.Job/Business
4. Arpit Udayrao Gulalkari, Age about 75 Yrs. Occu.: Pvt.Job/Business
All R/o Nehru Chowk, Baripura, Anjangaon Bari, Tq.Dist.Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Udayrao Sundarsa Gulalkari हे दिनांक 06.09.2026 रोजी **अंजनगांव बारी, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Varsha Udayrao Gulalkari+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Varsha Udayrao Gulalkari+3 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२५०/२०२६
Sachin Sharadrao Kanikar **-वि- निरंक**
पुढील ता.२०.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Sachin Sharadrao Kanikar
Age 44 Yrs. Occu.: Pvt.Job
R/o 101, Silver Heights Apartment Near Amar Colony, Meghdoot Colony, Amravati

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sharad Keshavrao Kanikar हे दिनांक 26.08.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sachin Sharadrao Kanikar -Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sachin Sharadrao Kanikar -Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर नोटीस

सर्व लोकांना सूचित करण्यात येते की माझे पक्षकार सौ प्रांजली भानुदास कुचे यांचे वतीने जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे :

मिळकतीचे वर्णन - नोंदणी पोटतुकडी अमरावती ग्रामीन वि. कचेरीचे कक्षेतील व ग्रामपंचायत विर्षी चे हद्दीतील मौजे विर्षी. ता. भातकुली जि. अमरावती येथील मालमत्ता क्रमांक ४०७ (मालमत्ता अनुक्रमांक ४४६) ज्याचे क्षेत्रफळ ४२०० चौरस फूट असून मालमत्तेची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस - कुचे
पश्चिमेस - मंगला कुचे .
उत्तरेस - रोड
दक्षिणेस - चंदा खरड

सदर मिळकत माझे पक्षकारांनी श्री नरेंद्र केशवराव कुचे याजकडून खरेदीदस्त क्रमांक १४३७ दिनांक १४.०७.२०२३ अन्वये खरेदी केली आहे. सदर मिळकतीचे पूर्वीचे खालील दोन मूळ खरेदी खत माझे पक्षकार यांचे कडे उपलब्ध नाहीत.

१) खरेदीदस्त क्रमांक ३१४ दिनांक १४.०२.२०२२
२) खरेदीदस्त क्रमांक २७ दिनांक ०१.०१.२०२१

सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोजा, वारसहक्क, जप्ती, कर्ज ताबा, सरकारी, निमसरकारी वा वित्तीय संस्थेचे कर्ज किंवा कुठल्याही प्रकारचा अधिकार, हक्क असल्यास किंवा खरेदीखत कुणालाही सापडल्यास ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह खालील पत्त्यावर माझेशी संपर्क साधून आक्षेप नोंदवावा. वरील मुदतीनंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

अमरावती

ॲड. एन पी अग्रवाल
कावेरी कॉम्प्लेक्स, बस स्टँड रोड, अमरावती
मोबाईल क्रमांक ९९२२५१५५३५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 176/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **लुंबिनी सार्वजनिक बुध्द विहार, पिंपरी यादगिरे, ता.जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.सूरज विजयराव रामटेके**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - ग्रामपंचायत पिंपरी, पंचायत समिती, अमरावतीच्या हद्दीतील मौजा पिंपरी (यादगिरे) मधील मालमत्ता नं.२४ (जुना घर नं.१९) येथील आर.सी.सी.पध्दतीची ईमारत ४७ ₹ १४ ₹ ६५८ चौ.फुट व खुली जागा याची चतुःसिमा-

पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - मेश्राम यांचे घर, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - रस्ता

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०२.११.२०२६** रोजी दिली.

शिक्का
अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२७९/२०२६
छोटीबाई अधिक चार -वि- निरंक
पुढील ता.०२.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Chotibai Ramalakhan Yadav, Age about 74 Yrs. Occu.: Ni.
2. Pramila Vijay Yadav, Age about 61 Yrs. Occu.: Household
3. Mahendra Vijay Yadav, Age about 43 Yrs. Occu.: Labour
4. Shailesh Vijay Yadav, Age about 38 Yrs. Occu.: Labour
5. Mukesh Vijaykumar Yadav, Age about 36 Yrs. Occu.: Labour
All R/o Khatri Road, Behind Khatri Complex, Bombary File, Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Vijay Ramlakhan Yadav हे दिनांक 14.06.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Chotibai Ramlakhan Yadav+4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Chotibai Ramlakhan Yadav+4 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मालमत्तेबाबत माझ्या पक्षकाराने **सुषमा मुरलीधर ढोमणे**, रा.श्रीकृपा कॉलनी, नवसारी, सावरकर वाडी, विमवि, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्यासोबत खालील नमुद मिळकत खरेदी करण्याचा सौदा झाला होता. त्याची रजि.ईसारचिठ्ठी दि.१८.०८.२०२६ रोजी दस्त नं.७५१२/२०२६ नुसार झाली होती.

मिळकतीचे वर्णन - नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपाच्या हद्दीतील मौजे नवसारी, प्रगणे नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.४/१ मधील जमिनीतील मा.प्रशासक व नियोजन प्राधिकरण यांचे दि.१९.०३.१९९० चे आदेशान्वये व दि.२२.०३.१९९० चे पत्रातील शर्ती व अटीनुसार सहायक संचालक नगर रचना अमरावती यांनी लेआऊट मंजूर केलेले व वि.जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांचे फाईलावरील रे.के.नं. एन.ए.पी.३४/नवसारी-१३/१९८९-९०, नि.ता.२९.०३.१९९० नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेला प्लॉट नं.७५ याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे याचे एकुण क्षेत्रफळ १२९२ चौ.फुट (१२० चौ.मी.) आहे. याची चतुःसिमा-

पुर्वेस - प्लॉट नं.७४, पश्चिमेस - प्लॉट नं.७६, उत्तरेस - रोड, दक्षिणेस - ओपन स्पेस.

सदरहू मिळकतीची माझे पक्षकार हे लवकर खरेदी उचलणार आहेत. तरी वरील मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, कूळ, हितसंबंध, न्यायालयीन प्रकरण व इतर कोणतीही भानगड असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत सल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १० दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी सुचनेद्वारे किंवा प्रत्यक्ष भेटून कागदपत्रासह कळवावे. त्यानंतर सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही अथवा माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण - अमरावती
दिनांक ३१.१०.२०२६

स्वा/-
ॲड.बी.एस.तिवारी,
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६२
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९६६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



अ.भा.लोकलेखा समिती परिषदेमध्ये आ.संजय खोडके यांचा सहभाग

तिरुवनंतपुरम- येथे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित अखिल भारतीय लोकलेखा समिती परिषदेला विधान परिषद आ. संजय खोडके यांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला. केंद्राची आणि राज्याची अर्थव्यवस्था अधिक सुदृढ करण्यासाठी आयोजित या अखिल भारतीय लोकलेखा समिती परिषदेमध्ये भविष्यातील पायाभूत सुविधांचा आढावा, शासकीय योजना, आणि विविध विकास प्रकल्पांच्या कामांना गती देण्याला घेऊन मंथन करण्यासह महत्त्वाच्या शिफारसी देखील करण्यात आल्या. या परिषदेला महाराष्ट्र लोकलेखा समितीचे अध्यक्ष-विजय वडेट्टीवार तसेच सदस्य आ.संजय खोडके, आ.अनिल परब,आणि आ. समीर कुणावार सुद्धा उपस्थित होते.



आंतरमहाविद्यालयीन पुरुष कबड्डी स्पर्धेत सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालयाचा विजय

अमरावती- कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथे आयोजित क्रीडा महोत्सव निवड फेरी २०२६ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धेत सेंट थॉमस प्रशासकीय महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पुरुष कबड्डी स्पर्धेत दमदार कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांना कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. रोशन अलो, डॉ. हरेकृष्ण अगस्ती आणि डॉ. ऋषिकेश दलाई यांच्या हस्ते ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले.या यशासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सिकंदर मनवरे, महाविद्यालयाच्या प्राचार्य संजीवनी मनवरे तसेच क्रीडा शिक्षक प्रा.स्वप्नील इखार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांनी केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाविद्यालय परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयाच्या वतीने सर्व विजयी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



दुर्गा इंग्लिश स्कूलमध्ये 'पाणी बचत' उपक्रम उत्साहात

शिराळा - येथील दुर्गा इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव निर्माण करण्यासाठी आणि पाण्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी 'पाणी बचत' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पाणी बचतीबाबत सामाईक शपथ देण्यात आली, तसेच दैनंदिन जीवनात पाण्याचा थेंब थेंब जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमप्रसंगी बोलताना शिक्षकांनी सांगितले की, पाणी हेच जीवन आहे. भविष्यात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आतापासूनच पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. लहान वयातच मुलांवर असे संस्कार झाले, तर ते घरात आणि समाजातही पाणी बचतीचे संदेशवाहक म्हणून काम करतील.याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी भविष्यात पाण्याचा अपव्यय न करण्याचा आणि पाण्याचा पुनर्वापर व बचत करण्याचा दृढ संकल्प केला. पाणी बचत शपथ: विद्यार्थ्यांनी 'आम्ही पाण्याचा एकही थेंब वाया घालवणार नाही व इतरांनाही पाणी वाचवण्यासाठी प्रवृत्त करू,' अशी शपथ घेतली. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

हँडबॉल (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अमरावती- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठव्दारा आयोजित श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे ०१ ते ०४ डिसेंबर, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूमध्ये सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाची शितल गावंडे,आरती उमक,साक्षी माटोडे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची अर्पिता वाघमारे,निधी मेश्राम,आचल मुरळे, बॅरि.आर.डी.आय.के.महाविद्यालय,बडनेराची राणी सोलंकी, आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वेची खुशी ठवरे,कला महाविद्यालय, बुलढाणाची उज्ज्वला कोटनके,स्नेहल कोटनके, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन,अमरावतीची नंदिनी पंधराम व शगुन जमडू, इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगांवची नंदिनी भगत, श्रीराम कला महिला महाविद्यालय,धामणगांव रेल्वेची सलोनी यादव व राजनंदनी इंगोले, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोलाची मनश्री सांगळे, इंदिरा महाविद्यालय, कळंबची साक्षी गुजर व राधिका राऊत,एस.एस.जी.एम.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवची प्राजक्ता सराग, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोलाची मुक्ता नागले हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे दि. २० ते २९ नोव्हेंबर, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

रब्बी हंगामत शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी व्हावे-डॉ.नाईक

अमरावती/का.प्र.

एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये अधिसूचित चार पिकांसाठी अमरावती विभागातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होऊन पीक विमा घेण्याचे आवाहन विभागीय अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. प्रशांत नाईक यांनी केले आहे. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना या योजनेत गहु (बागायत), हरभरा व रब्बी कांदा या पिकाकरिता १५ डिसेंबर २०२६ पर्यंत सहभागी होता येणार असून उन्हाळी भुईमूग पिकाकरिता ३१ मार्च २०२७ पर्यंत सहभागी होता येणार आहे. त्यासाठी https://pmfby.gov.in पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी राज्य शासनाद्वारे उत्पादनावर आधारीत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२६ व रब्बी हंगाम २०२६-२७ या १ वर्षाकरीता अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये गहू (बागायत), हरभरा, उन्हाळी भुईमुग व रब्बी कांदा ही ४ पिके या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित महसूल मंडळ, क्षेत्रात शेतकऱ्यांना सहभाग घेता येणार आहे. कर्जदार शेतक-यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकामार्फत योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरुन देणे आवश्यक आहे. जर कर्जदार शेतकरी योजनेत सहभागी होणार नसेल तर नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या https://pmfby.gov.in या अधिकृत पोर्टलवर वर स्वत: शेतकऱ्यांना,बँक,विमा कंपनीने नियुक्त केलेले एजेंट, क्रॉप इन्शुरन्स ॲप व सामुहिक सेवा केंद्र (सीएससी) यांच्या मार्फत योजनेतील सहभाग नोंदविता येणार आहे. अधिक माहितीसाठी संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसिलदार/तालुका कृषि अधिकारी, जिल्हाधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधता येणार आहे. अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांसाठी इफ्को टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ९ वा मजला, ऑफिस ए, नेक्सस वेस्टेंड,सेक्टर १, बिल्डिंग ए, सर्व्हे क्र.१६९/१, परिहार चौकाजवळ, डीपी रोड, औंध, पुणे ही कंपनी नियुक्त करण्यात आली आहे. संपर्कासाठी supportagri@iffcotokio.co.in हा



ईमेल देण्यात आला आहे.

अकोला जिल्ह्यासाठी एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड डी-३०१, तिसरा मजला, इस्टर्न बिझनेस डिस्ट्रिक्ट (मॅग्नेट मॉल), लाल बहादूर शास्त्री मार्ग, भांडुप (पश्चिम), मुंबई. नियुक्त करण्यात आली असून pmfby.maharshtra@hdfcergo.com या ईमेल वर संपर्क साधता येणार आहे. वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यांसाठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड चौथा मजला, टॉवर क्र.७, कॉमरझोन आयटी पार्क, सम्राट अशोक पथ, येरवडा जेल रोड, पुणे ही कंपनी नियुक्त करण्यात आली असून bagichelp@bajajallianz.co.in या ईमेलवर संपर्क साधता येणार आहे.

गहू पिकासाठी बुलढाणा, अकोला आणि वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा हप्त्यापोटी ११२.५० रुपये निश्चित करण्यात आले आहेत. तर अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांसाठी अनुक्रमे ४५० व ४२५ रुपये विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे. हरभरा पिकासाठी बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा हप्त्यापोटी १८० रुपये,अकोला जिल्ह्यासाठी ३४१.८० रुपये, वाशिमसाठी १७०.९० रुपये, अमरावतीसाठी ३६० तर यवतमाळसाठी ५४० रुपये निश्चित करण्यात आले आहेत. रब्बी कांद्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा हप्त्यापोटी ४७५० रुपये, अकोला जिल्ह्यासाठी २१९ तर अमरावतीसाठी १६४० रुपये निश्चित करण्यात आले आहेत. उन्हाळी भुईमूगासाठी अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा हप्त्यापोटी ६०९ रुपये, वाशिमसाठी १०१.५० रुपये,अमरावतीसाठी ४०६ तर यवतमाळसाठी ६०९ रुपये निश्चित करण्यात आल्याचे कृषी विभागाकडून कळविण्यात आले आहे.

बी.एस.पाटील महाविद्यालयातील खेळाडूंची क्रीडा स्पर्धत उल्लेखनीय कामगिरी

परतवाडा- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थीनी पायल तिरनदास नागे हिने १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय स्थान मिळवून रजत पदक प्राप्त केले. तसेच ५००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय स्थान मिळवून कांस्य पदक मिळविले. स्वाती शांतराम पळसकर हिने १०००० मीटर धावा स्पर्धेत द्वितीय स्थान मिळविले व १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत स्वाती पळसकर ने तृतीय स्थान पटकावून कांस्य पदक मिळविले. तसेच या स्पर्धेत ४१०० मीटर रिले स्पर्धेत



महाविद्यालयाच्या रिले संघाने तृतीय स्थान पटकावले.या संघातील विद्यार्थीनी वैदवी सिडाम, समीक्षा मुंडे, स्वाती पळसकर व पायल नागे या खेळाडूंचा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, प्रा.डॉ.तनुजा राऊत, संचालक, खेळ व शारीरिक शिक्षण, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य व सिनेट सदस्य डॉ.सुभाष गावंडे, आर.डी.आय.के. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश देशमुख, सिनेट सदस्य प्रा.डॉ.शुभांगी दामले, तसेच ऐथलेटिक प्रशिक्षक डॉ.अनिल बोंडे यांनी कांस्य पदक देऊन सन्मान केला. खेळाडूंनी केलेल्या या उल्लेखनीय कामगिरी करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर, सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग तसेच ह्युमीनीटी स्पोर्टिंग क्लब चे सचिव गजानन जयस्वाल यांनी अभिनंदन केले व भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या.

पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

अमरावती/का.प्र.

पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती तर्फे कपाशी लागवड तंत्रज्ञान व पिक संरक्षण तसेच सध्या परिस्थितीत तुर पिकाचे पुर्ण कोरडवाहु व संरक्षित ओलीत क्षेत्रातील शेतकरी बांधवांना पिक संरक्षण विषयी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन बैलमारखेडा,चेचरखेडा तसेच वाठोडा शुक्लेश्वर येथे करण्यात आले होते. सध्या तुरीवर शेंगा पोखरणार्या अळीचा प्रादुर्भाव सुरु झाला असुन आर्थिक नुकसान पातळी खाली आहे. पिक कळी व फुलोरावस्थेत आहे. तसेच कपाशीच्या राशी स्वीफ्ट व ईत्तर सरळ वाणावर पांढरी माशी आर्थिक नुकसान पातळीचे वर असून फुलकिडे व कोळी (माईटस) आर्थिक नुकसान पातळी जवळ ६-८ प्रति पान



आणी मावा आर्थिक नुकसान पातळी खाली २-३ प्रति पान तसेच लाल्या व कवडी (अन्थ्रक्नोज) रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आला. पुर्ण कोरडवाहु कपाशी क्षेत्रात ७५३ बोंडे फुटलेली असुन राहिलेली २५३ बोंडे १५ दिवसात फुटतील पाण्याचा या क्षेत्रात मागील अडिच ते तीन महिन्या पासुन अभाव असल्यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती आहे त्यामुळे पिकसंरक्षण किवा कोणताही उपाय करण्याची गरज नाही परंतु ज्यांचे कडे संरक्षितओलिताची व्यवस्था आहे फवारणी करावी असे मार्गदर्शन पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य व सेवानिवृत् वरिष्ठ किटक शास्त्रज्ञ डॉ.अनिल ठाकरे यांनी केले. चेचरवाडी येथे कपाशी प्रक्षेत्र भेट वेळी सराड, मंडळ कृषि अधिकारी व देशमुख सहाय्यक कृषि अधिकारी तर बैलमारखेडा तुर पिक प्रक्षेत्र भेट दरम्यान श्री देशमुख सहाय्यक कृषि अधिकारी धामोरी तसेच वाठोडा शुक्लेश्वर येथे कपाशी प्रक्षेत्राला भेट दरम्यान सराड,मंडळ कृषि अधिकारी,देशमुख सहाय्यक कृषि अधिकारी धामोरी व पोटे कृषि अधिकारी यांची उपस्थिती होती.

मनपा शिक्षकांची वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण कार्यशाळा उत्साहात

विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे शिक्षकांना मार्गदर्शन

अमरावती/का.प्र.

अमरावती महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षकांना वाहतूक सुरक्षा, रस्ता सुरक्षा आणि नागरी संरक्षण या विषयांचे प्रभावी प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली विशेष कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात झाली. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणे, वाढत्या रस्ते अपघातांना प्रतिबंध घालणे, आपत्कालीन परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे तसेच विद्यार्थ्यांना जबाबदार व सुजाण नागरिक म्हणून घडविणे, या व्यापक उद्देशाने या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेला विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यामध्ये समुपदेशक चंद्रशेखर गुलवाडे, सदस्य तथा निरीक्षक सायबर सेफ्टी सेल चंद्रकांत गुल्हाने, विभागीय



समादेशक सागरसिंह ठाकूर,मनपा समादेशक योगेश पखाले,वैभव निमकर,सुशांत गायकवाड आदी मान्यवरांनी उपस्थित शिक्षकांना विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.कार्यशाळेमध्ये आत्मसुरक्षा, रस्ता सुरक्षा, वाहतुकीचे नियम, हेल्मेट वापरण्याचे महत्त्व, अपघात प्रतिबंधात्मक उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाचे निर्णय, प्रथमोपचार, आग विझविण्याच्या पद्धती, अपघातग्रस्तांना तात्काळ मदत, जलसुरक्षा, सायबर सुरक्षा तसेच आरोग्यदायी जीवनशैली अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश करण्यात आला होता.

मनपा आयुक्त मंगेश गोंदावले, शिक्षण सभापती ॲड. प्रीती रेवणे,अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती महानगरपालिका स्तरावर राबविण्यात येत आहे.विद्यार्थी नोंदणी : २,५००,नोंदणी झालेल्या शाळा : ७०,नोंदणी पथके : ८५ या उपक्रमाच्या माध्यमातून महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळांमध्ये वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षणविषयक जनजागृती करण्यात येणार आहे. शिक्षकांना प्रशिक्षित करून त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सदर कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी सल्लागार प्रशांत नालसे, चित्रा खोब्रागडे, आरएसपी अधिकारी अजय शर्मा, मोहम्मद मुजाहिद, मोहम्मद मुजम्मील, शिरीष फसाटे, हाफिज खान, प्रज्ञा ढंगारे, माधुरी बिजवे, मनीषा घाटे व वनमाला भास्कर यांनी विशेष परिश्रम घेतले.

डॉ.प्रकाश मेश्राम,
शिक्षणाधिकारी, मनपा अमरावती

'मुलांना शालेय जीवनातच वाढते रस्ते अपघात रोखण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले प्रशिक्षण देणे, समाजविघातक प्रवृत्तींना आळा घालण्यासंदर्भात जागरूक करणे आणि भविष्यातील सुजाण, जबाबदार व सुरक्षित नागरिक घडविणे हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे. आजच्या काळात केवळ पुस्तकी ज्ञान देणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारे ज्ञान व कौशल्ये देणे आवश्यक आहे.'

सहारे कुटुंबाचे घर शिवसेनेच्या मध्यस्थीने खुले

अमरावती/का.प्र.

धामणगाव रेल्वे तालुक्यातील जळका पटाचे येथील सहारे कुटुंबावर आर्थिक संकटामुळे मोठी आपत्ती ओढवली होती. एस.आर.जी. स्मॉल फायनान्स बँकेने कर्जवसुलीच्या कारवाईत त्यांचे घर सील केल्याने संपूर्ण कुटुंब अडचणीत सापडले होते. विशेष म्हणजे, घरात गरोदर महिला आणि अर्धांगवायूग्रस्त रुग्ण असतानाही घर सील करण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला होता. त्यामुळे कुटुंबाची मोठी गैरसोय होत होती.

या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच सहारे कुटुंबाने शिवसेनेकडे मदतीची मागणी केली. त्यानंतर शिवसेना जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, तालुकाप्रमुख निलेश तिवारी, योगेश थाळे, दिलीपभाऊ ठाकरे आणि पंकज राठोड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. शिवसेनेच्या



पदाधिकाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, अवघ्या काही तासांत सील केलेल्या घराचा ताबा सहारे कुटुंबाला पुन्हा मिळवून देण्यात आल्याचा दावा शिवसेनेकडून करण्यात आला. आर्थिक अडचणींमुळे सर्वसामान्य कुटुंबांवर बेघर होण्याची वेळ येऊ नये. बँकांनी कर्जवसुली करताना मानवी दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. अन्यायग्रस्त कुटुंबाच्या पाठीशी शिवसेना खंबीरपणे उभी राहील,' असा विश्वास शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी युवासेना तालुकाप्रमुख शुभम ठाकरे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

राज्यात मार्चअखेर कृषिपंपांना शंभर टक्के दिवसा वीजपुरवठा

अमरावती/का.प्र.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी दिवसा वीजपुरवठा करण्याच्या हेतूने सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या बळावर राज्यात आता ८० टक्के कृषिपंपांना दिवसा वीज पुरवठा होत आहे. आगामी मार्च अखेर १०० टक्के कृषिपंपांना सौरऊर्जेद्वारे दिवसा वीजपुरवठा करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मंगळवारी (३) केले.

नवी दिल्ली येथे भारत रिन्यूबल एनर्जी समिट अँड एक्स्पो २०२६ या केंद्र सरकारच्या नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील चर्चासत्रात लोकेश चंद्र बोलत होते. 'डिस्ट्रीब्यूटेड एनर्जी फॉर एनर्जी सिक्युरिटी, सेल्फ रिलायन्स अँड विकसित भारत २०४७' या चर्चासत्रात त्यांनी महाराष्ट्राने विकेंद्रीत स्वरूपात सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभे करून कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी कशी कामगिरी केली आहे, हे स्पष्ट केले. या चर्चासत्रात पंतप्रधानांचे सल्लागार तरुण कपूर यांचे मुख्य भाषण झाले.

इंटरनॅशनल सोलर अलायन्स असेंब्लीच्या नवव्या सत्रात आयोजित 'पंप्स टू प्रोग्रॅम्स:



अध्यक्ष लोकेश चंद्र यांची माहिती

स्केलिंग सोलरायझेशन ऑफ ॲग्रीकल्चर इन द ग्लोबल साउथ' या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजना यांची यशोगाथा आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसमोर मांडली. सोलर अलायन्सचे महासंचालक आशिष खन्ना यांनी यावेळी लोकेश चंद्र यांच्याशी संवाद साधला.

लोकेश चंद्र यांनी सांगितले की, महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना ही पीएम कुसुम या केंद्राच्या योजनेच्या आधारे सुरू करण्यात आली असून या योजनेत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प विकेंद्रीत स्वरूपात उभारण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॉटचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यातून उपलब्ध होणारी वीज आणि अन्य तांत्रिक उपायांच्या आधारे आता ८० टक्के कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा सुरु आहे. शंभर टक्के कृषी पंपांना दिवसा सौरऊर्जेचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ते मार्चअखेर पूर्ण होईल.

त्यांनी सांगितले की, कृषिपंपांना दिवसा व रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा करण्यातून निर्माण होणारी समस्या सर्व देशातील सर्व वीज वितरण कंपन्यासमोर आहे.कृषी पंपांना दिवसा दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध होईल. त्याचबरोबर राज्य सरकारचा अनुदानाचा खर्च कमी होईल.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी केलेले नियोजन आणि तांत्रिक उपाय योजना याची लोकेश चंद्र यांनी आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींना माहिती दिली. त्यासोबतच त्यांनी सांगितले की, सौर कृषी पंप लावण्यात राज्याने आघाडी घेतली असून देशातील एकूण सौर कृषी पंपांपैकी ६५ टक्के सौर कृषिपंप राज्यात बसवण्यात आले आहेत. सौर ऊर्जेमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी हक्काचे साधन मिळत आहे. त्यांना हवे तेव्हा सिंचन करता येत असल्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळला जात आहे. सोबत शेतीची उत्पादकताही वाढत असल्याचा अनुभव येत असल्याचे त्यांनी सांगितले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अमरावतीत कॉंग्रेसला शिक्षक मतदारसंघातील पराभवाचे शल्य

विधान परिषदेतील कामगिरीचा शोध घेण्यासाठी चार सदस्यीय समिती गठीत

अमरावती/प्रतिनिधीः- विधान परिषद निवडणुकीत अमरावती शिक्षक मतदारसंघात कॉंग्रेसच्या उमेदवार अदिती पोहरे यांना स्वीकाराव्या लागलेल्या पराभवाचे शल्य कॉंग्रेसच्या वरिष्ठ वर्तुळात तीव्रतेने जाणवत आहे. या पराभवासह नागपूर व पुणे पदवीधर मतदारसंघातील निकालांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीने चार सदस्यीय उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. अमरावतीत पक्षांतर्गत सहकार्य, प्रचारातील त्रुटी आणि पराभवाची नेमकी कारणे शोधून तीन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश पक्षाने समितीला दिले आहेत.



अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे शिंदे गटाचे किरण सरनाईक यांच्याकडून अदिती पोहरे यांचा पराभव झाला.

नुकत्याच झालेल्या या निवडणुकांमध्ये तीन जागांवर महाविकास आघाडीने, तर दोन जागांवर महायुतीने विजय मिळवला. निकालाचे राजकीय विश्लेषण करण्याबरोबरच संबंधित मतदारसंघांमध्ये पक्षाची कामगिरी नेमकी कशी राहिली, याचा तपशीलवार अभ्यास समिती करणार आहे. निवडणूक प्रक्रियेपासून प्रचाराच्या नियोजनापर्यंत प्रत्येक टप्प्याचा आढावा घेतला जाणार आहे.

समितीत यांचा समावेश

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर कॉंग्रेसने संघटनात्मक पातळीवर महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नागपूर पदवीधर, पुणे पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघातील निवडणुकांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीने चार सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. निवडणुकीतील विजय आणि पराभवाची कारणे, प्रचाराची दिशा, पक्षांतर्गत समन्वय तसेच संघटनात्मक पातळीवरील त्रुटींचा शोध ही समिती घेणार आहे. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेवरून या समितीची स्थापना करण्यात आली आहे. कॉंग्रेस कार्यकारिणीचे सदस्य बाळासाहेब थोरात, खासदार चंद्रकांत हंडोरे, आरिफ नसीम खान आणि अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे.

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत नागपूर वरून आयात केलेला उमेदवार ऐन प्रचाराच्या टप्प्यात गायब झाला होता. ती निवडणूक देखील कॉंग्रेस पार्टी न लढताच हरली होती. त्यानंतर आता शिक्षक मतदार संघात पुन्हा कॉंग्रेसचा पराभव झाला. कॉंग्रेसच्या एकामागून एक होणाऱ्या पराभवाला नेमके जबाबदार अंतर्गत आणि बाह्य घटक कोणते? यावर ही समिती दृष्टी टाकणार का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. जिंकता येणाऱ्या निवडणुका ही कॉंग्रेस सहज हरत असल्यामुळे केंद्र आणि राज्याचे पक्ष नेतृत्व खरंच या बाबीची दखल घेणार, की केवळ समितीचा अहवाल सुपूर्द केला एवढीच औपचारिकता पूर्ण करणार, याकडेही लक्ष लागले आहे. कधी उमेदवार गायब तर कधी पक्षातील स्थानिक नेतृत्वातील चढाओढीचे राजकारण कॉंग्रेसच्या पराभवाला जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही हाच कार्यक्रम कॉंग्रेसने सुरू ठेवला तर....अशी चर्चाही सुरू आहे.

प्रचार रणनीती प्रभावी ठरली की त्यामध्ये काही कमतरता राहिल्या, तसेच पक्षातील नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये योग्य समन्वय होता की नाही, याचीही तपासणी ☞(पान २ वर)

गोदामातून १,०९४ पोती गायब

पाळा परिसरात ४० लाखांवर डल्ला

बडनेरा/प्रतिनिधीः- शेतकऱ्यांच्या घामातून पिकविलेला लाखो रुपयांचा शेतमाल सुरक्षित राहावा म्हणून उभारलेल्या गोदामातच चोरट्यांनी हात साफ केला. पाळा परिसरातील खासगी गोदामातून सोयाबीन आणि तुरीची तब्बल एक हजार ९४ पोती चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. चोरी गेलेल्या मालाची किंमत ४० लाख रुपयांहून अधिक असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील मालाची वाहतूक करताना चोरट्यांनी मोठे नियोजन केल्याची शक्यता व्यक्त होत आहे. पाळा गावात केंद्रीय भांडारण निगमच्या गोदामालगत परमानंद सिंघानिया यांची सहा गोदामे आहेत. सरकारी कापसाच्या गाठी साठविण्यासाठी ही गोदामे भाड्याने देण्यात आली आहेत. याच परिसरात न्यू मेहराना शक्ती या खासगी गोदामात सोयाबीन आणि तुरीचा साठा ठेवण्यात आला होता. या गोदामाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी स्टार ॲग्री वेअरहाउसिंग प्रा. मॅनेजमेंट लिमिटेडकडे आहे.

सोमवारी सायंकाळपर्यंत गोदामातील माल सुरक्षित असल्याची माहिती होती. मात्र, रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गोदामाच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात पोती बाहेर काढून नेली. मंगळवारी सकाळी पर्यवेक्षक रोशन अब्रुक यांच्या निदर्शनास कुलूप तुटल्याचा प्रकार आला. गोदामाची पाहणी केल्यानंतर साठ्यात मोठी तफावत असल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी व्यवस्थापक कल्पेश काळे☞(पान २ वर)

दिवाळीसाठी रघुवीरची 'स्वर्ण शंख' शाही मिठाई

राजस्थानच्या कुशल कारागिरांनी केली तयार

अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव, नात्यांमधील गोडवा आणि आनंदाची देवाण-घेवाण! या आनंदोत्सवात मिठाईला केवळ खाद्यपदार्थ म्हणून नाही तर प्रेम,आपुलकी आणि शुभेच्छांचे प्रतीक म्हणून विशेष महत्त्व आहे. याच उत्सवाला शाही अंदाजाचा तडका लावण्यासाठी अमरावतीकरांचा परिचित आणि विश्वसनीय ब्रँड रघुवीर स्वीट ॲंड नमकीनने यंदा दिवाळीसाठी एक अनोखी शाही मिठाई तयार केली आहे. २४ कॅरेट सोन्याच्या वर्कने सजलेली आणि राजस्थानच्या कुशल कारागिरांच्या कलाकारीने





तयार 'स्वर्ण शंख' मिठाई या दिवाळीचे खास आकर्षण ठरणार असल्याची माहिती आज बुधवार ४ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषद मध्ये संचालक चंद्रकांत पोपट यांनी दिली.

पत्रकार परिषदेला तेजस पोपट, वसंत ठक्कर, गोपाल पोपट, सुरेश वसानी, आकाश वसानी, रितेश बेलसरे यांच्यासह रघुवीर परिवारातील सदस्य उपस्थित होते. ☞(पान २ वर)

पेढी नदीत बुडून नऊ वर्षीय शिवाचा मृत्यू

भावासोबत नदीपात्राजवळ गेला अन् काळाचा घाला

भातकुली/प्रतिनिधीः- शाळेतून घरी परतल्यानंतर मित्रांसोबत खेळण्यासाठी बाहेर पडलेल्या नऊ वर्षीय बालकाचा पेढी नदीच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. भावासोबत नदीपात्राजवळ गेलेल्या शिवाचा पाय घसरून तो पाण्यात पडल्याची प्राथमिक माहिती आहे. सोमवारी सायंकाळपासून सुरू झालेली शोधमोहीम रात्रभर चालली. मात्र, अंधारामुळे शोधकार्यात अडथळे आले. अखेर मंगळवारी सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला. या घटनेने कानफोडी गावावर शोककळा पसरली आहे. शिवा निलेश आमझरे (वय ९, रा. कानफोडी, ता. भातकुली) हा जिल्हा परिषद शाळेत तिसऱ्या वर्गात शिकत होता. घटनेच्या दिवशी त्याचे आई-वडील शेतातील कामासाठी घराबाहेर गेले होते. शिवा आणि त्याचा मोठा भाऊ श्रेयस हे शाळेतून परतल्यानंतर कपडे बदलून गावातील इतर मुलांसोबत खेळण्यासाठी बाहेर पडले होते.

घटनेची माहिती मिळताच वडील निलेश आमझरे, दीप पखाले आणि गावातील नागरिकांनी नदीपात्रात शोध सुरू केला. मात्र, बराच वेळ शोध घेऊनही शिवाचा शोध लागला नाही. त्यानंतर भातकुली पोलिसांना ☞(पान २ वर)

पाटबंधारे विभागाचा कारभार वाऱ्यावर!

सकाळी साडेअकरा वाजताही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्या

नागरिकांची मात्र गैरसोय

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची कामे वेळेत व्हावीत, यासाठी शासनाने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निश्चित कार्यालयीन वेळ ठरवून दिली आहे. मात्र, चांदूर रेल्वे येथील पाटबंधारे खाते कार्यालयाच्या कारभारावरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पाटबंधारे खाते कार्यालय, शाखा अधिकारी पाटस्थळ व्यवस्थापन, चांदूर रेल्वे शाखा या कार्यालयात आठवड्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी तब्बल ११.३० वाजताच्या सुमारास पाहणी केली असता अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्या असल्याचे चित्र दिसून आले. विशेष म्हणजे, शासकीय नियमानुसार कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ९.४५ वाजताची असताना साडेअकरा वाजूनही एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले.



नेमके अधिकारी-कर्मचारी गेले कुठे? कार्यालयीन वेळेत कार्यालय बंदसदृश परिस्थिती का? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पाटबंधारे विभागाशी संबंधित कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या शेतकऱ्यांना ☞(पान २ वर)

हयापूर येथे अवैध देशी दारू पकडली

दोघांविरुध्द गुन्हा दाखल, खल्लार पोलिसांची कारवाई

खल्लार/प्रतिनिधीः- खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील हयापुर येथे अवैध देशी दारूविक्रीवर खल्लार पोलिसांनी धाड टाकून ४७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेतला.

काल (दि.३) रात्रीच्या सुमारास हयापूर येथे अवैध देशी दारु विक्रीसाठी आल्याची गुप्त माहिती खल्लार पोलिसांना मिळाली. त्यानुसार हयापुर येथे अवैध देशी दारुवर धाड टाकली असता दारु विक्रेत्याकडून ४७ हजार ५०० रुपये किंमतीच्या ९० मिलीच्या ९५० पावट्या (१० खोके) मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. आरोपी अविनाश बाजीराव धुळे रा. हयापूर, अमोल दामले रा. कसबेगव्हाण, यांच्यावर अपराध क्र



१५०/२६ कलम ६५(ई) बिएनएस २२१ नुसार खल्लार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई ठाणेदार अमोल मुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ नुरुद्दीन शेख, पोलिस अंमलदार प्रताप दिवेकर, सैनिक गोलू राठोड यांनी केली.

जिल्ह्यात १२ डिसेंबरला 'राष्ट्रीय लोकअदालत'

प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने मिटवण्याची संधी

अमरावती/प्रतिनिधीः- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (नालसा), दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या निर्देशानुसार, शनिवार, १२ डिसेंबर २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये 'राष्ट्रीय लोकअदालत' आयोजित करण्यात आली आहे. या लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली दाखल तसेच दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने आणि कायदेशीर तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व नागरिक आणि पक्षकारांनी तडजोडपात्र प्रलंबित खटल्यांचा निपटारा करण्यासाठी या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीच्या अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्ज्वला एम. नंदेश्वर, आणि प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे ☞(पान २ वर)

भाजपचे 'लोकशाही वाचवा' आंदोलन म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा

अमरावती शिवसेना शहरप्रमुख प्रवीण हरमकर यांचा घणाघात

अमरावती/प्रतिनिधीः- देशात व राज्यात सत्ता हातात असतानाही स्वतःच्याच सरकारविरोधात 'लोकशाही वाचवा' म्हणून रस्त्यावर उतरून भाजपने जे राजकीय नाटक केले आहे, ते महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान करणारे आहे, असा संतप्त आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने या नौटंकीचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. ११ वर्षांपासून पंतप्रधान, गृहमंत्री आणि सर्व केंद्रीय यंत्रणा ताब्यात असतानाही सत्ताधाऱ्यांना आंदोलन करावे लागत असेल, तर ते सत्ता चालवण्यात सपशेल अपयशी ठरल्याची टीका



हा प्रकार म्हणजे 'चोराच्या उलट्या बोंबा होय. स्वतःच सगळ्या यंत्रणा हातात ठेवायच्या आणि स्वतःच लोकशाही धोक्यात आहे म्हणून बोंब मारायची, यापेक्षा मोठी नौटंकी नाही. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर, संत गजानन महाराज, तुकडोजी महाराजांच्या विचारांचा महाराष्ट्र आहे. इथली जनता सुज्ञ आहे, या नाटकाला बळी पडणार नाही. आम्ही शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने या नौटंकीचा जाहीर निषेध करतो आणि भाजपने महाराष्ट्राच्या खऱ्या प्रश्नांवर बोलावे, अशी मागणी करतो.

-प्रवीण वसंतराव हरमकर, शिवसेना शहरप्रमुख, अमरावती

अमरावती महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते तथा शिवसेना शहरप्रमुख प्रवीण वसंतराव हरमकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी स्वतःच्याच सरकार विरोधात 'लोकशाही वाचवा' म्हणून रस्त्यावर उतरून जे नाटक केले आहे, त्याचा आम्ही महाराष्ट्राच्या साडे तेरा कोटी जनतेच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करतो. गेल्या ११ वर्षांपासून देशाची सत्ता तुमच्याच हातात आहे. पंतप्रधान तुमचे, गृहमंत्री तुमचे, सर्व यंत्रणा तुमच्या ताब्यात आहे. अशा वेळी जर तुम्हालाच रस्त्यावर उतरून लोकशाही वाचवावी लागत असेल, तर याचा अर्थ तुम्ही सत्ता चालवण्यात सपशेल अपयशी ठरला आहात,असे प्रविण हरमकर म्हणाले.

हरमकर यांनी महाराष्ट्रातील जनतेच्यावतीने ☞(पान २ वर)

५७१ गंभीर आजारी रुग्णांची दिवाळी अंधारात?

१५ हजारांची वैद्यकीय मदत खात्यात जमा करा

जिप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर प्रकाश साबळे आक्रमक!

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजुरांना दिवाळीपूर्वी औषधोपचारासाठी मिळणारी १५ हजार रुपयांची आर्थिक मदत त्यांच्या बँक खात्यात तत्काळ जमा करण्यात यावी, अशी जोरदार व आग्रही मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे यांनी अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे. दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आली असतानाही निधी अद्याप वितरीत न झाल्याने प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर सवाल उपस्थित करत प्रकाश साबळे यांनी दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी जिप सीईओ यांची प्रत्यक्ष भेट घेऊन



या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

आरोग्य विभाग जिल्हा परिषद अमरावतीच्या बजेटमध्ये सेस फंडातून दीड कोटी रुपयांची तरतूद सन २०२६-२७ साठी करण्यात आली होती. परंतु या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, लेखा अधिकारी जिल्हा परिषद तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अमरावती यांच्यामार्फत दिवाळी तोंडावर आली असताना सुद्धा जिल्ह्यातील ५७१ हृदयरोग, किडनी व कॅन्सर आजाराने ग्रस्त असलेले शेतकरी व शेतमजूर रुग्ण यांच्या खात्यावर अद्याप पर्यंत ही रक्कम जमा झाली नाही. यामुळे दि.४ नोव्हेंबर २०२६ रोजी तात्काळ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांनी भेटून अनुदान देण्याची जोरदार ☞(पान २ वर)

शहरातील कचरा संकलन करणारे कर्मचारी संपावर

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती महानगरपालिका क्षेत्रात कचरा संकलन व वहन करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी अचानक संप पुकारल्याने शहराची स्वच्छता व्यवस्था कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दिवाळीपूर्वी वेतन देण्यात यावे या मागणीसाठी कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत, त्यामुळे स्वच्छता व्यवस्था कोलमडलण्याची शक्यता आहे. आज बुधवार ५ नोव्हेंबर रोजी ☞(पान २ वर)

विद्यापीठातील संस्कृत विभाग सक्षम करा

विद्यापीठ विकास मंच व संस्कृत भारतीची मागणी

अमरावती/प्रतिनिधीः- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभागाचा शैक्षणिक, संशोधनात्मक आणि आर्थिक विकास साधण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात याव्या, अशी मागणी विद्यापीठ विकास मंच व संस्कृत भारतीच्या शिष्टमंडळाने बुधवारी (दि.४) कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्याकडे निवेदनातून केली. भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा जपणाऱ्या संस्कृत विभागाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्याच्या कार्याचा विस्तार



विद्यापीठासह संलग्न महाविद्यालयांपर्यंत करण्यावर निवेदनात भर देण्यात आला.

यावेळी सदर विभागात पूर्णवेळ विभागप्रमुखांची नियुक्ती करण्यासाठी विविध पर्यायांवर सखोल चर्चा झाली. विभागाला आवश्यक निधीसाठी वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न करणे, त्यासाठीचे प्रस्ताव तयार करणे व शासनस्तरावर पाठपुरावा करण्यावर बैठकीत एकमत झाले. संस्कृत विभागाच्या वतीने २८ फेब्रुवारी २०२५ रोजी इंडियन नॉलेज सिस्टिम (IKS) संदर्भातील ☞(पान २ वर)

शेतमजूर युनियनची निदर्शने



अमरावती/प्रतिनिधीः- दुष्काळी परिस्थितीत शेतमजुरांना नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियनच्या वतीने आज बुधवार ५ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची ☞(पान २ वर)

अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातून मोटार व केबल लंपास

मोर्शी/प्रतिनिधीः- अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातून शेतात पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या मोटार व केबल वायर अज्ञात चोरट्यांनी चोरून जवळपास ९०,००० रुपयाचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना दि.४ नोव्हेंबर रोजी घडली. अरुनकुमार रामविलास राठी (वय ७२) यांचे मौजा येरला सर्वे नं ५९ येथे १४ एक्कर शेती असुन शेतात संत्रे,मोसंबीची झाडे लावलेली आहे. झाडाला पाणी देण्याकरीता अप्पर वर्धा





जलाशयातुन झीरो पॉईटचे बाजुला टेक्समो कंपनीची १२.५० एचपी पॉवरची मोटार लावलेली आहे व त्या मोटारला केबल लावलेला आहे.

दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ७.३० वा. मोटरचे पाणी देण्याकरीता शेतकरी राठी शेतात गेले होते.शेतीला पाणी देवुन झाल्यावर सायंकाळी ५:३० वा.घरी परत आले तेव्हा मोटर व्यवस्थीत सुरु होती.दि.४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ७.३० वा. चे दरम्याण ते पुन्हा मौजा येरला येथे शेतीला पाणी देण्याकरीता गेले. पाणी देण्याकरीता मोटर सुरु केली मात्र मोटर सुरु ☞(पान २ वर)

चार वर्षाच्या मुलासह आई रहस्यमयरीत्या बेपत्ता

अंजनगाव सुर्जी बस स्टँड परिसरातील घटना

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- स्थानिक बस स्टँड परिसरातून एक महिला आपल्या चार वर्षीय मुलासह संशयास्पद परिस्थितीत बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. नातेवाईक आणि परिचितांनी मोठ्या प्रमाणात शोध घेतल्यानंतर आई- मुलाचा कोणताही थांगपत्ता लागलेला नाही. यानंतर कुटुंबियांनी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार रोहित उमेश धांडे (वय २२) यांच्या बहिणीचा आपल्या पतीसोबत कौटुंबिक वाद सुरू आहे. याच कारणामुळे ती आपल्या भावाकडे राहत होती. महिलेला दोन मुले असून त्यापैकी एक चार वर्षाचा मुलगा आणि एक ☞(पान २ वर)